TEXT FLY
WITHIN THE
BOOK ONLY

THE BOOK WAS
DRENCHED

UNIVERSAL
LIBRARY
OU_192831
UNIVERSAL
LIBRARY

# इंग्रजांनीं हिंदुस्थान कसें घेतलें ?

[ इतिहासांतील एक शतक ]

लेखक

**श्री० रामकृष्ण गोपाळ भिडे,**

निकोलाय लेनिन, स्वातंत्र्यदीप, सुभाषचंद्र बोस, पं० जवाहरलाल नेहरू, पं० मदनमोहन मालवीय, श्री० नारायण महाराज इ० पुस्तकांचा कर्ता.

प्रस्तावनाकार

**श्री० आबा चांदोरकर**

प्रकाशक

**मॉडर्न बुक-डेपो,**

बुकसेलर्स व पब्लिशर्स, आनंदाश्रमासमोर, पुणें २.

शके १८५९

१९३८ ] [ रु. १-८-०

CHECKED 1955

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| हृदयनिवेदन | २ - ४ |
| प्रस्तावना | १ - १६ |
| बंगाल कसा बुडविला ? | १ - १६ |
| मराठीसाम्राज्याचें पूर्वटोंक कसें गळलें ? | १७ - ३० |
| मराठीसाम्राज्य कोणीं बुडविलें ? | ३१ - ५३ |
| मराठीसाम्राज्याच्या आदिपीठाचा ग्रास | ५४ - ८१ |
| नागपूरच्या राजसत्तेची अखेर | ८२ - ९४ |
| अयोध्येची आहुति | ९५ - ११४ |
| १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध | ११५ - १४२ |


Checked 1965

---

# हृदय-निवेदन

—:०:—

व्यक्तीच्या, समाजाच्या व राष्ट्राच्या उन्नतीला पोषक असे शौर्यवीर्यादि गुण, बुद्धिमत्ता, धनसंपदादि साधनें ऋद्धि-सिद्धीप्रमाणे हातीं खेळत असतां हिंदुस्थान आज कित्येक शतकें दुःस्थितींत कां खितपत पडला आहे ? जे गुण इतरत्र राष्ट्रकल्याणकामीं उपयुक्त होतात ते या भारतवर्षांतच निरुपयोगी कां ठरावे ? याच्याकारणांकडे पाहत असतांना एक गोष्ट प्रामुख्यानें नजरेस येते व ती ही कीं हिंदु मनुष्य (हिंदुस्तानांत राहणारा तो हिंदु) वरील गुणांत वैयक्तिकपणे श्रेष्ठ असेल व आहेहि परंतु राष्ट्रकाजाच्या कामी उपयोग करण्याइतकी व्यापक दृष्टि त्याजपाशीं नसून संकुचित धोरण, स्वार्थपरायणता, स्वकीयाविषयीं अनादर, व परधार्जिणे,णा यांनीं तो इतका व्यापून गेला आहे कीं, स्वसमाज व स्वदेश यांविषयीं आपलें कांहीं कर्तव्य आहे याची जाणीवच त्याला नाहींशी झाली आहे. आणि त्यामुळें तो गुणसंपन्न असूनहि त्याचे गुण स्वराष्ट्र दास्यपंकांत रुतविण्याच्या कामींच आतांपर्यंत लागत आले आहेत. हिंदुस्थानच्या ज्ञात इतिहासांतील कोणताहि कालखण्ड पाहा त्यांत हीच गोष्ट प्रामुख्यानें दिसून येईल !

आपल्यांत अमुक दोष आहेत याचें ज्ञान, त्याची जाणीव, मनुष्यास झाली अगर करून दिली तर ते अवगुण पालटण्याची आशा ! आणि लेखकाची अल्प समजूत अशी कीं, इतिहास याच कारणासाठीं वाचला पाहिजे. विशेषतः हिंदुस्थानासारख्या पारतंत्र्यमग्न देशांतील जनतेनें तरी. याच दृष्टीनें आपल्या इतिहासांतील विशिष्ट शंभर वर्षांचा कालखण्ड प्रस्तुत विषयासाठीं निवडला आहे. याचें दुसरें कारण असें कीं, आज हिंदुस्थानांत स्वातंत्र्य, स्वराज्य संपादनाच्या गोष्टी बोलल्या जात आहेत व ज्यांच्यापासून हें स्वातंत्र्य वा स्वराज्य संपादन करावयाचें आहे त्यांचा या कालखण्डाशीं प्रामुख्यानें संबंध आलेला आहे. हा एक शतकाचा इतिहास वाचीत असतांना अनेक गोष्टी नजरेस येतात. इंग्रज मनुष्याचें स्वदेशप्रेम ही गोष्ट अत्यंत ठळकपणें किंबहुना प्रामुख्यानें नजरेस भरते. आज इंग्रज भारतावर राज्य करीत असले म्हणून त्यांस ' सैतानी सरकार ' असें संबोधण्यापूर्वी, हिंदुमनाला एकराष्ट्रीयत्वाचा अभाव या सैतानानें पछाडल्यामुळें त्याला आजची अवदशा प्राप्त झाली; त्या सैतानाची पाळेमुळें खणून काढतां आली तर पुढें स्वराज्याच्या गोष्टी !. केवळ याच हेतूनें स्वदोषाविष्करण करण्यासाठींच व आत्मनिरीक्षणसाठींहि हा कालखण्ड निवडला. दुसऱ्यास दोष देण्यापूर्वी आपल्यांतील दोष नष्ट करण्याचा प्रयत्न प्रथम झाला पाहिजे व लेखकाच्या मताप्रमाणें इतिहासवाचनाचा व अभ्यासाचा हाच हेतु असतो, निदान असावयास पाहिजे.

इंग्रजांनीं मराठे व मुसलमान यांचेपासून हिंदुस्तान कसा जिंकला हें हिंदी इतिहासवाचकांना सामान्यपणें ठाऊक आहे; सामान्य वाचकांना मात्र तितकेंसे माहीत नाहीं. आजच्या कांहीं अधिकारी इंग्रजांचें म्हणणें असें आहे कीं, आम्ही हिंदुस्थान हा फक्त मुसलमानांपासूनच तरवारीच्या बळावर जिंकला; पण मुत्सद्दी इंग्रज मात्र या प्रश्नास बगल देऊन गुपचिप बसतात. त्यांच्या जातींत जे थोडेसे सत्याला जागणारे लेखक आहेत ते मात्र खरी वस्तुस्थिति आपल्या ग्रंथांत मांडतात; तथापि अशांची संख्या फार थोडी आहे आणि असले ग्रंथहि तुरळक आहेत; ते ग्रंथ सुद्धां सांप्रत दुर्मिळ होत चालले आहेत व या कारणामुळें ते हिंदी सामान्य वाचकांना दुर्लभ झाले आहेत. आमच्या पुस्तकांत स्वराज्यनाशाचें जें विवेचन केलें आहे त्यास आपल्या देशी ग्रंथांचा आधार आहेच पण या वरील इंग्रजी दुर्मिळ ग्रंथांचाहि आधार घेतला आहे.

इंग्रज कंपनीनें हिंदुस्थानांतील व्यापारी धोरण सोडून राजकीय आक्रमणास

धोरण स्वीकारलें तें श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दीपासून. त्याचा पहिला व डोळ्यांत भरेल असा बसलेला पहिला तडाखा प्लासीच्या लढाईतील होय. इंग्रज लोक या प्रसंगाचें मोठें स्तोम माजवितात; पण या लढाईचें खरें स्वरूप डोळे उघडून पाहिलें तर तींत इंग्रजी शौर्यापेक्षां हिंदी फितुरीच प्रभावशाली झाली होती हें दिसून येईल. प्लासी म्हणजेच बंगालचा नाश. या नाशानंतर अखिल हिंदुस्थानांतील निरनिराळीं देशीं राज्यें इंग्रजी कुटिलनीतीस कशीं बळी पडलीं त्याचें विवेचन ओघास येतें; म्हणून या पुस्तकांत प्लासीचे युद्धापासून साताऱ्चे नाशापर्यंतची हकीकत दिली आहे. या राज्यांच्या नाशामुळें पुढें हिंदी लोकांचे डोळे उघडले व त्यांनीं आपली सत्ता पुन्हां मिळविण्यासाठीं एक जोराचा प्रयत्न केला पण तो फसला. हें स्वातंत्र्ययुद्धच काय पण वरील निरनिराळीं राज्यरक्षणाचीं युद्धेंहि ज्या अनेक कारणांनीं हरलीं गेलीं, त्यांच्याबद्दल इतिहासज्ञांत मतभेद आहेत; मात्र त्यांतील एका कारणाबद्दल तरी सर्वांचें मतैक्य आहे; तें कारण म्हणजे हिंदी लोकांत एकराष्ट्रीयत्वाची भावना नसणें हें होय ! असो.

हा इतिहास देतांना भावनावश न होतां दरएक विधान प्रसिद्ध व सर्वमान्य लेखकाचा आधार घेऊन करण्याचें धोरण राखण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या हेतूनें प्रेरित होऊन हा इतिहास लिहिला तो साध्य व्हावा एवढीच जगदीशचरणीं नम्र प्रार्थना आहे.

माझे मित्र प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री० आबा चांदोरकर यांनीं मूळ लेख वाचून त्यासंबंधीं मार्मिक सूचना केल्या; त्याचप्रमाणें उत्कृष्ट प्रस्तावना लिहून मला ऋणी करून ठेवलें आहे. श्री० नारायणराव भिडे यांनीं पुस्तक प्रसिद्ध करण्याचें अंगावर घेतलें म्हणून तें प्रकाशांत तरी येत आहे नाहींतर तें अंधारांतच पडून राहतें; याबद्दल त्यांचे मी आभार मानीत आहें.

पुणें–ता. १-१-३८. रामकृष्ण गोपाळ भिडे.

---

[ या व पुढील आवृत्तींचे सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. ]

प्रकाशक—ना. त्रिं. भिडे. बी. ए. मॉडर्न बुकडेपो, पुणें. २.
मुद्रक—प्र. भा. काळे, प्रतिभा प्रेस, ३३५ शनवार पेठ, पुणें. २.

# प्रस्तावना

॥ श्रीरामसमर्थ ॥

" यान्यस्माकँ सुचरितानि
तानि त्वयोपास्यानि नो इतराणि ॥"

—तैत्तिरीय-शीक्षोपनिषद्, अनुवाक १०, दशक २.

( १ ) प्राचीन काळीं, एकाद्या प्रसिद्ध विद्यापीठांतून एक तप-म्हणजे बारा वर्षे-विद्याभ्यास करून आणि त्या विद्येंत पारंगत होऊन विद्यार्थि स्नातक म्हणून बाहेर पडला, म्हणजे, त्या विद्यापीठाचे आचार्य आणि कुलपति, त्यास असा निरोप देत जे:—

" आमच्या चांगल्या कृत्यांची च त्वां उजळणी करावीस, इतर ( वाईट ) कृत्यांचा भडा गिरवूं नयेस !"

या शिक्षासंदेशांत एक मोठें तत्त्व गोंवलें आहे असें मला वाटतें; म्हणून त्याचा थोडासा ऊहापोह करून पाहूं.

( २ ) जग हें त्रिगुणात्मक आहे. वेदान्ती मतांत जगाची उत्पत्ति पुढीलप्रमाणें सांगितली आहे. ब्रह्म→ माया→ त्रिगुण→ पंचमहाभूतें→ जग. याचा सारांश असा जे, जग हें त्रिगुणांपासून झालेलें आहे; म्हणजे जगांत त्रिगुणांची कालवा-कालव झालेली आहे. जें ब्रह्मांडीं तें पिंडीं, या न्यायानें, ब्रह्मांडांतील ह्या त्रिगुणांचा कर्दम, त्या च ब्रह्मांडाचा एक अंश जो पिंड किंवा जीव, त्याच्या हि अंगास लिडबिडलेला असणार च. जीवसृष्टींतील पूर्णावस्थेस पोहोंचलेला जो मनुष्य, त्याचीहि सुटका, अर्थात च या कर्दमांतून कशी होणार ? तो सुद्धां या कर्दमानें लिप्त असणार ! दैवी संपत्तीनें युक्त असलेला मनुष्य सोडल्यास, अवांतर माणसांच्या ठायीं या सत्त्व-रज-तम-त्रिगुणांचा वास सदोदित असतो. मनुष्याची प्रकृति या प्रमाणें त्रिगुणात्मक बनल्यानें, त्याच्या हातून जीं कृत्यें घडतील, तीं हि, साहजिक त्रिगुणात्मक असणार. असल्या सात्त्विक-राजस-तामस कृत्यांनीं, माणसें आजपर्यंत जगाचा कारभार करीत आलीं आहेत; एवढें च नव्हे तर, सध्यां करीत आहेत आणि यापुढें हि करतील. तथापि, या कृत्यां पैकीं कोणत्या कृत्यांना जग नावाजतें ? कोणत्या कृत्यांची जगाकडून स्तुति गायिली जाते ? कोणत्या कृत्यांचें

पुराण बनून, त्याचें पिढ्यान्‌पिढ्या, समाजाकडून पठण केलें जातें ? आणि कोणत्या कृत्यांचा आदर्श पुढें ठेवून पुढील पिढ्या आपलें वर्तन उत्कृष्ट बनवूं इच्छितात ? तर, राजस आणि तामस या कृत्यांना टाळून सात्त्विक कृत्यें. या सात्विक कर्मांचा जगाच्या धारणपोषणास अधिक लाभ होतो. लोकसमाजास या च कर्मानें शांति–पुष्टि–तुष्टि लाभते. कोणत्या हि धर्माचें हें मुख्य अंग आहे जे, त्या धर्माच्या आचरणानें, तो आचरणाऱ्या समाजास शांति–पुष्टि–तुष्टि लाभली पाहिजे. यासाठीं, समाजाच्या नेत्यांनीं–पूर्वीच्या किंवा आजच्या–ही रत्नत्रयी किंवा त्रयीविद्या आपण स्वतः आचरली पाहिजे, म्हणजे असली त्रयी ज्यांनीं लाभते तीं कृत्यें सदोदित केलीं पाहिजेत आणि समाजा कडून करवून घेतलीं पाहिजेत. नेते, जर स्वत: या गोष्टी करणार नाहींत आणि केवळ लोकांना उपदेश करीत बसतील तर त्याचा अंतिम परिणाम फलदायी होणार नाहीं. कारण उपदेशकाचें स्वतःचें वर्तन निराळें आणि त्याचा उपदेश निराळा असा अनवस्था प्रसंग यामुळें उद्भवेल ! आतां, असें हि कदाचित् होईल–नव्हे होत असलेलें आपल्या दृष्टीस पडतें सुद्धां–जे, कांहीं काळ असल्या "बोलणें एक, चालणें एक" नेत्याच्या उपदेशाचा पगडा समाजावर बसेल. पण, तो किती काळ ? समाजास जेव्हां समजेल, जे, या नेत्याचें बोलणें–चालणे "नेमक नव्हें," तेथ पर्यंत ! समाजानें ओळखलें जे, याच्या बोलण्या–चालण्यांत, म्हणजे दुसऱ्यास उपदेश करण्यांत आणि स्वतःच्या आचरण्यांत अंतर आहे, नव्हे हा स्वतःच्या उपदेशाच्या विरुद्ध स्वतःचे आचरण सदोदित ठेवतो, तेव्हां, समाज या नेत्याच्या उपदेशाकडे खचित दुर्लक्ष करील. श्रीसमर्थांच्या म्हणण्याप्रमाणे, मग हा नेता "हलु" पडेल; समाजांतील विद्वान् माणसें च काय पण पोरेंसोरें सुद्धां असल्या नेत्याची टर उडवितील ! सारांश, समाजाला उपदेश करणारांनीं आपलें स्वत:चें वर्तन त्या प्रमाणें ठेविलें पाहिजे. तथापि, असलीं महनीय माणसें फार थोडीं असतात, आणि म्हणून त्यांचा मान पहिल्या प्रतीचा असतो. यांची प्रकृति सात्त्विक असते. जगांत केवळ सात्त्विक वृत्तीचीं माणसें थोडीं असल्यानें मिश्रगुणी म्हणजे त्रिगुणमिश्र माणसें च अधिक आढळतात. असल्या मनुष्यांनीं, समाजास उपदेश करावा काय ? वर दिलेल्या कसोटीवर यांची पारख केल्यास, त्यांना उपदेशकांचा अधिकार रहाणार नाहीं असें वाटेल; आणि कांहीं अंशीं तसें वाटणें खरें हि आहे. तथापि, या अडचणींतून

बाहेर पडण्यास एक तोड आहे; आणि ती म्हणजे सत्यकथन ! असल्या नेत्यांनीं समाजास असें स्पष्ट, कांहीं एक आडपडदा न ठेवतां, सांगावें जे, " आमची प्रकृति त्रिगुणमिश्र आहे आणि त्यामुळें आमच्या हातून असलीं त्रिगुणात्मक कार्यें घडलेलीं आहेत, सध्यां घडत आहेत आणि पुढे घडतील हि. तेव्हां त्या सर्वांचा आदर्श, आपण पुढें ठेऊं नका. निव्वळ त्यांतील चांगल्या कृत्यांचा धडा आपण गिरवा आणि वाईट कृत्यांना डावलून टाका. कारण, चांगलीं कृत्यें केलीं तर त्याचा परिणाम समाजावर चांगला होईल, वाईट कृत्यांचा परिणाम समाजावर वाईट होईल. चांगल्या कृत्यांनीं समाजास शांति-पुष्टि-तुष्टि म्हणजे च ऐहिक आणि पारलौकिक मोक्ष लाभून, हा समाज, स्वतः आनंदस्वरूप बनून सर्व जगास ऐहिक आणि पारलौकिक मोक्ष मिळवून देण्यास कारणीभूत होईल ! वाईट कृत्यें केलीं तर हा समाज, वरील सर्व लाभांना मुकून उलट परवशतारूपी निरयगतीस स्वतः तर जाईल च, परंतु इतर समाजांस, किंबहुना जगास हि त्या गतीकडे खेचून नेण्यास साहाय्य करील ! " असल्या प्रकारचा उपदेश या त्रिगुणी नेत्यांनीं केला तर त्यांना दोष लागणार नाहीं आणि समाजाचा बुद्धिभेद केल्याचें पातक हि त्यांचे माथीं बसणार नाहीं ! सारांश, ही महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवून प्राचीन काळचे नेते वागत होते आणि प्राचीन विद्यापीठांतील आचार्यादि अधिकारी हि याच मार्गाचा अवलंब करीत होते, आणि त्याचें च प्रतीक त्यांच्या वर उध्दृत केलेल्या सूत्रांत आलेले आहे. पहिल्या परिच्छेदांत या शिक्षासंदेशांत जें एक मोठें तत्त्व गोवलें आहे, असें म्हटलें आहे, तें हें च होय. या सूत्रांत च इतिहासशास्त्राचें बीज सूक्ष्मपणे रुजलेलें आहे !

( ३ ) हें बीज कसें रुजलें आहे ? इतिहास म्हणजे तरी काय ? इतिहासाची सामान्य व्याख्या, साधारण बहुश्रुत माणसास ठाऊक आहे. इतिहास म्हणजे " या या प्रमाणे होऊन गेलेली गोष्ट, कथा, प्रसंग इ० . " सामान्यतः एवढा अर्थ पुरे आहे. तथापि, अधिक खोल अर्थ घेतला, तर प्रत्येक माणसाची, पशूची, पक्षाची, पाण्यांतील जीवाची म्हणजे स्थलचराची, खेचराची, जलचराची किंवा चार्‍ही खाणींतील यच्चयावत् जीवाची प्रत्येक होऊन गेलेली हालचाल, बोलून गेलेला शब्द, घडून गेलेली कृति, एवढें च नव्हे तर मनांत येऊन गेलेला विचार सुद्धां इतिहास होय ! जीवसृष्टि सोडली तर जडसृष्टींत होणारे फेरफार

किंवा प्रत्येक घडामोड ही हि इतिहासांत समाविष्ट होते. म्हणजे अखिल सृष्टीच्या ज्ञानतः वा अज्ञानतः होणाऱ्या अखिल क्रिया यांचा समावेश इतिहासांत होतो. इतपत इतिहासाची व्याप्ति आहे; म्हणजे अनंत प्रकारें नटलेल्या ब्रह्मा प्रमाणें इतिहास हि अनंत प्रकारें नटलेला आहे ! आणि तसें असणें साहाजिक आहे. कारण, त्या ब्रह्माचा च हा इतिहास आहे. म्हणजे त्याच्या विलासाचें च हा वर्णन करीत असतो. अशी इतिहासाची व्याख्या घेतली म्हणजे त्याच्या आवश्यकतेचें वर्णन करण्याचें कारण उरत नाहीं. सृष्टीच्या व्यापाराचें गूढ उकलावयाची इच्छा असल्यास इतिहासाकडे जावें लागेल. या इच्छेच्या पोटीं इतिहासशास्त्राचा जन्म होतो !

( ४ ) मात्र वर सांगितलेला इतिहासाचा व्याप इतका मोठा आहे जे, तितका तो करण्यास मनुष्याची बुद्धि पंगु ठरेल. तेव्हां, त्यांत मग निवड करण्याची पाळी येते. मनुष्याच्या दृष्टीनें सर्व सामान्य सृष्टिकृत्यांचा इतिहास गाळण्यांत येऊन, निवळ अलौकिक सृष्टिकृत्यांचा च इतिहास बनविण्यात येतो. एखाद्या यःकश्चित् माणसाची पापणी हालली किंवा त्यानें जांभई दिली तर त्याचें इतिहासकथन कोणीं करीत नाहीं. वास्तविक वरील व्यापक अर्थाची इतिहासाची व्याख्या घेतल्यास असें कथन करणें अवश्य आहे; तथापि, तें कोणीं करीत नाहीं हें सत्य आहे. उलट, सर्व माणसांच्या पापण्या मिटतात, पण देवांच्या मिटत नाहींत, ही गोष्ट आश्चर्यकारक असल्यामुळें "देवांच्या पापण्या मिटत नाहींत" असा संकेत इतिहासांत समाविष्ट झाला. तसें च, प्रलयकालीं वटपत्रावर शयन करणाऱ्या बालमुकुंदानें जांभई दिली असतां तिच्या ओढीनें मार्कंडेय ऋषि, त्या मुकुंदाच्या पोटांत ओढला गेला आणि तेथें त्यानें अनेक सृष्ट्या पाहिल्या, अनेक प्रलयकाल पाहिले आणि ते पाहण्यात त्यानें अनेक युगें घालविलीं; ही गोष्ट आश्चर्यकारक असल्यानें "भगवान् बालमुकुंदाची जांभई" हा हि संकेत इतिहासांत गोंवला गेला ! सारांश, एवढा च जे सृष्टीचा वा सृष्टींतील जडाजड वस्तूंचा अलौकिक व्यापार तेवढा इतिहासांत समाविष्ट करण्याची चाल पडली आहे आणि ती हि प्राचीन कालापासून पडली आहे.

( ५ ) अलौकिक कृत्यांचा परामर्ष इतिहास घेतो हें खरें आहे. आतां

या अलौकिक कृत्यांत भेद असतात. मागें सांगितल्या प्रमाणें सर्व सृष्टि त्रिगुणांपासून उत्पन्न झाल्या मुळें सृष्टिजन्य जीं अलौकिक कृत्यें घडतात, तीं हि अर्थात् त्रिगुणात्मक असणार. नुसत्या मनुष्यसृष्टीचें उदाहरण आपण घेतलें, तर माणसाच्या हातून घडणाऱ्या कृत्यांत सुद्धां या त्रिगुणांचा अंश असणार च. ज्या व्यक्तीच्या प्रकृतींत जो गुण अधिकांशानें असेल, त्या गुणाचा परिपोष त्याच्या प्रत्येक कृत्यांत अधिक झालेला आढळेल. सात्विक गुणान्वित व्यक्ति असल्यास तिच्या प्रत्येक कृतींत, हालचालींत सात्त्विक गुणाचें आधिक्य दृष्टीस पडेल. याच्या उलट तामस गुणानें भारलेली व्यक्ति आणि तिचा एकंदर आटोप. पण या दोन्हीं व्यक्तींचीं चरित्रें अलौकिक असल्यास त्यांना इतिहासस्वरूप अवश्य प्राप्त होईल. उदाहरणार्थ, श्रीराम आणि रावण. एक पहिल्या कोटींतील तर दुसरी दुसऱ्या कोटींतील व्यक्ति होती. त्यांचीं कृत्यें अलौकिक असल्यानें त्यांचीं चरित्रें इतिहाससमाविष्ट झालीं. याप्रमाणें च प्राचीन अर्वाचीन अशा प्रसिद्ध किंवा अलौकिक व्यक्तींचीं चरित्रें इतिहासविषय बनूं शकतात. जगांत बहुधां मनुष्यसृष्टीचा इतिहास जास्त आढळतो. जडसृष्टीचा इतिहास फार थोड्या प्रमाणांत लिहिला जातो. जडसृष्टीच्या उलाढाली कांहीं थोड्या थोडक्या नसतात पण असें असतां हि तिच्याऐवजीं चलसृष्टीचा, त्यांत हि मनुष्यसृष्टीचा इतिहास लिहिण्याची प्रथा सर्व जगांत अधिक दिसते आणि ती हि आजकालची नसून फार प्राचीन कालापासून आहे ! हें असें कां ?

( ६ ) वरील प्रश्नाचें उत्तर मनुष्याच्या मनांत सांपडतें ! या मनास चांगलें कोणतें, वाईट कोणतें, परोपकार कोणता, परपीडा कोणती, सत्य कोणतें, असत्य कोणतें, सुष्ट कोणतें, दुष्ट कोणतें, इत्यादि परस्परविरुद्ध द्वंद्वें साधारणपणें ओळखूं येतात. तें, आपल्या स्वतःवरून हीं द्वंद्वें दुसऱ्यास लावून त्यांतील भेद जाणूं शकतें, जाणण्या जाणण्यांत तर-तम-भाव आढळेल येवढें च. माणसाचें सारें आयुष्य या द्वंद्वांच्या झगड्यांत व्यतीत होतें. व्यक्ति क्षुद्र असल्यास या द्वंद्वांचा परिणाम तिच्या स्वतःवर आणि तिच्या प्रतिपक्षावर होतो; थोडीशी प्रतिष्ठित व्यक्ति असेल तर परिणामाचें क्षेत्र तिच्या कुटुंबापुरतें आणि तिच्या प्रतिपक्षीयाच्या कुटुंबा पुरतें वाढेल. सुप्रतिष्ठित किंवा अलौकिक व्यक्ति असल्यास हा परिणाम, गांव, समाज, प्रांत, देश आणि शेवटीं जग यांवर श्रेढीच्या प्रमाणांत

वाढत जाईल ! हा परिणाम जसा शुभकारक असेल तसा अशुभदायक हि होऊं शकेल. त्याचें कारण, त्या त्या कर्त्यांच्या त्या त्या कृतींत आढळेल ! जगांत सुष्टांपेक्षां दुष्ट माणसें अधिक आणि त्यामुळें जगांत चांगल्या कृत्यांपेक्षां वाईट कृत्यें च अधिक घडलेलीं आढळतात. चांगल्या कृत्यांनीं समाजाची धारणा चांगली होऊन तो शांति–पुष्टि–तुष्टियुक्त होऊन मोक्षाप्रत जातो; तर वाईट कृत्यांनीं समाजाची धारणा वाईट होऊन तो अशांतिदायक, दुर्बळ आणि रुष्ट बनून निरयगतीस जातो ! पहिल्या स्थिती पेक्षां ही दुसरी स्थिति वाईट आहे; तेव्हां ती समाजावर कोसळूं नये असा ज्ञानवान नेत्यांचा अनेक प्रकारें प्रयत्न चालूं असतो. त्यांतील एक प्रकार म्हणजे हें मनुष्यसृष्टि–इतिहास–लेखन होय !

( ७ ) या मनुष्य–सृष्टि–इतिहासाचें लेखन कसें असावें, म्हणजे तें गुणवर्णनविशिष्ट असावें कां दोषवर्णनविशिष्ट असावें, असे प्रश्न अज्ञ लोकांकडून विचारले जातात. एवढें च नव्हे तर कांहीं विद्वान म्हणविणारीं माणसें सुद्धां यांतील एक एक पक्ष घेऊन वादविवाद करतांना दृष्टीस पडतात. वास्तविक असले प्रश्न उपस्थित करणें हा खुळचटपणा आहे. कारण इतिहासलेखन म्हणजे यथातथ्य दिग्दर्शन किंवा लेखन, ही व्याख्या एकदां गृहीत धरली–आणि ती धरणें च शास्त्रशुद्धपणा होय–म्हणजे मग तेथें एका च अंगाचें विवेचन कसें करतां येईल ? दोन्ही अंगांचें विवेचन अवश्य आहे. निवडानिवड करून, अप्रिय प्रसंग गाळण्याचा वा प्रिय प्रसंग बनवून घुसडण्याचा अधिकार इतिहासलेखकास कसा येईल ? हें तत्त्व न पाळणारे लेखक नाहींत असें नाहीं; उदा० जेते लोक जेव्हां जित लोकांचा इतिहास लिहितात, तेव्हां ते लेखक हें तत्त्व पाळीत नाहींत. पण असल्या भिकारड्या चोपडयांना खरा शास्त्रज्ञ कवडीचें हि मोल देत नाहीं ! तेव्हां खरा इतिहास लिहावयाचा असेल तर वर्ण्यविषयाच्या सर्व अंगांची, सर्व पैलूंची यथातथ्य माहिती त्यांत दिली पाहिजे; म्हणजे वस्तूंचे गुण आणि दोष या दोघांचें हि वर्णन त्यांत आलें पाहिजे. आपल्यास आपल्या देशाचा जर खरा इतिहास लिहावयाचा असेल, तर जो सत्य असेल तो लिहिला पाहिजे.

( ८ ) असल्या प्रकारचे मनुष्यसृष्टि–इतिहास फार अल्प आहेत; कारण त्यांत सृष्टीच्या प्रारंभापासून आज घटके पर्यंत सर्वदेशीय मानवसमाजानें केलेल्या एकोन एक कृत्यांची माहिती आली पाहिजे. हें काम प्रचंड आणि

कठीण असल्यानें तें करण्यास फार करून कोणी धजावत नाहीं. साधारणतः इतिहासलेखक आपापल्या देशाचा इतिहास लिहिण्यास धजतो. कोणत्या हि देशाचा इतिहास लिहावयाचा तर त्यांत त्या देशांतील जाती, वनस्पती, पशु, पक्षी, भूमि, शेती, व्यापार, शिक्षण, कलाकौशल्य, राजकीय घडामोडी, शिल्प इ० इ० जीं अनेकविध अंगें असतात, त्यांची साग्र माहिती यावयास पाहिजे. पण बहुशः असा सर्वांगीण इतिहास आढळत नाहीं; विशेष भर राजकीय अंगावर देण्यांत येतो. अलीकडे राष्ट्राच्या वरील अंगांचें इतिहासलेखन होऊं लागलें आहे; पण ते प्रयत्न अल्प आणि फुटकळ आहेत. राजकीय इतिहास प्रामुख्यानें लिहिले जाण्यास एक कारण आहे. वरील सर्व अंगें भरभराटीस येण्यास, त्या देशांत स्वराज्याची आवश्यकता लागते; स्वराज्याची बैठक असेल तर हीं अंगें फोफावतात, नाहीं तर कोमेजून जातात. म्हणून ज्या देशांत स्वराज्य असेल तेथें या इतर अंगांचा इतिहास जसा प्रसन्नपणें लिहितां येईल तसा परदास्यांत असलेल्या देशाच्या अंगांचा लिहितां येणार नाहीं. सारांश, देशाची सर्व प्रकारची प्रगति त्याच्या स्वराज्याच्या अधिष्ठानावर अवलंबून असते आणि हें अधिष्ठान राजकीय घडामोडींचें असतें. त्यामुळें सर्व प्रकारच्या इतिहासांत या राजकीय इतिहासांची संख्या अधिक भरते.

( ९ ) राजकीय इतिहास म्हणजे राज्यांच्या उलाढाली. या उलाढाली अनेक वर्षां–शतकां–पासून चालू असतात; तेव्हां त्यांची माहिती या इतिहासांत येणार. उलाढाली या स्वतः निर्जीव असतात; त्यांचें कर्तृत्व माणसांत–चतुर मंड्यांत–असतें; म्हणजे या कार्यांच्या मागें सूत्रचालक म्हणून या व्यक्ती असतात. तेव्हां या उलाढालींचा इतिहास म्हणजे प्रच्छन्नपणें या सूत्रचालक व्यक्तींचा च इतिहास होय ! तेव्हां, तो जितका सत्य देतां येईल तितका दिला पाहिजे. या व्यक्ती, माणसें असल्यानें त्या त्रिगुणांनीं भारलेल्या असावयाच्या आणि त्यामुळें त्यांच्या कृत्यांत म्हणजे राजकारणांत त्रिगुणांचा कर्दम आढळावयाचा ! म्हणजे त्यांचा इतिहास लिहितांना वेळीं त्यांचें जसें गुणवर्णन करावें लागेल, तसें प्रसंगीं त्यांचे दोष आढळल्यास दोषवर्णन हि अवश्य करावें लागेल ! वाडवडिलांची केवळ कीर्ति गाणाऱ्यास, पण त्याप्रमाणें स्वतःच्या हातून तसलीं कीर्तिस्पद कार्यें न घडणाऱ्यास श्रीसमर्थांनीं कोणती पदवी अर्पण केली आहे हें

सांगणें नको ! सारांश, राजकीय इतिहास जो लिहावयाचा तो सुद्धां इतर इतिहासां सारखा यथातथ्य लिहिला पाहिजे; आणि तसा तो लिहिला तर च तो, चालू वा भावी पिढ्यांना उपकारक आणि मार्गदर्शक होईल !

( १० ) असला राजकीय इतिहास मार्गदर्शक कसा होतो ? हा प्रश्न विचारणें काय किंवा इतिहासाचा उपयोग काय असा जो प्रश्न भावड्या किंवा अज्ञ लोकांकडून सदोदित विचारण्यांत येतो, तो विचारणें काय, एक च होय. याचें उत्तर सोपें आहे. झालेल्या गोष्टींची खरी माहिती समजली म्हणजे त्यांवर मनन करतां येतें व मनन झाल्या नंतर त्या माहितींतील त्याज्य गोष्टी, मतें, उपाय, युक्त्या टाकून देऊन ग्राह्य गोष्टी इ० स्वीकारण्याकडे मनाची ओढ लावता येते. या निर्णयाचा लाभ चालू परिस्थितींतून जसा मिळवितां येतो तसा भावी परिस्थितींतून हि मिळवितां येतो. समजा, स्वदेश परकीय दास्यांत खरवत आहे, तो परक्यांच्या दावणींत पूर्वजांनीं अडकवून दिला आहे आणि आजच्या पिढीस त्या दावणींतून त्याची मुक्तता करावयाची आहे; अशा वेळीं काय करावयास पाहिजे ? प्रथम कोणत्या गोष्टीं मुळें हा प्रसंग ओढवला त्यांचा शोध लाविला पाहिजे. आपल्या पूर्वजांच्या अंगीं कोणते दोष होते, कीं, ज्यांचा परिणाम, त्यांच्या आणि त्यांच्या भावी पिढ्यांवर परदास्याचे निरंतरचें जोखड बसविण्यांत झाला, त्या दोषांची छाननी झाली पाहिजे. तसें च ज्या परकीय सत्तेनें हें जोखड अडकविलें त्या सत्तेच्या जवळ असे कोणते गुण होते, कीं, ज्यांच्या मुळें ही गोष्ट करणें त्या सत्तेस सुलभ पडलें. सारांश, पूर्वजांचे दोष आणि परकीयांचे गुण यांचा सूक्ष्म अभ्यास झाला पाहिजे; आणि तसा तो झाला म्हणजे मग दोषत्याग आणि गुणग्रहण करून, त्या परकीय सत्तेपुढें तोंड देण्यास उभें ठाकतां येईल; एवढें च नव्हें तर सावधानतेने तिच्याशीं झुंज घेऊन सरते शेवटीं तिला लाथ मारून बाहेर घालवितां येईल ! हा च इतिहासाच्या वाचनाचा लाभ ! हें एक ठोकळ उदाहरण झालें. याप्रमाणें अनेक विषयांविषयीं सांगतां येईल. सारांश एवढा च, आपल्याला जगांतील वाईट गोष्टी, उद्वेगकारक प्रसंग, अशुभ घटना टाळावयाच्या असतील आणि त्यांच्या उलट सर्व प्रकारें शुभदायक असा आत्मीय विकास करावयाचा असेल तर गत इतिहासाच्या अभ्यासाकडे धांव घ्यावी लागेल. त्यानें जसा आत्मीय किंवा व्यष्टीचा विकास होईल तसा राष्ट्रीय म्हणजे समष्टीचा हि होईल.

( ११ ) परदास्यांत पचलेल्या राष्ट्रानें आपल्या पूर्वजांच्या गुणांकडे एक वेळ दुर्लक्ष केलें तरी चकेल पण दोषांकडे मात्र दुर्लक्ष करतां उपयोगी नाहीं. कारण त्या दोषांमुळें राष्ट्रास दास्याच्या कुंभीपाकांत पडावें लागतें. तेव्हां, स्वदेशइतिहास-लेखनाचा प्रसंग जेव्हां या टप्प्यावर येऊन ठेपतो, त्या ठिकाणीं स्वदेशोद्धार करूं इच्छणाऱ्या इतिहासलेखकानें निःसंकोचपणें पूर्वजांच्या या दोषांना उजेडांत आणलें पाहिजे, तेथें भीड मुळींच ठेवतां कामां नये. तथापि, दोषदिग्दर्शनांत आत्मीय भावना पाहिजे; म्हणजे पूर्वजांकडून जे दोष घडले, ते कोणत्या परिस्थितींत त्यांच्या हातून घडले, ते आत्मक्लेशांनीं त्यांना टाळता आले असते काय, तशी संधि आली असतां त्यांनीं केवळ स्वोदरपूरणार्थ ते टाळले नाहींत कीं काय इ० गोष्टी विचारांत घेऊन मग त्यांचेवर दोषांचा ठपका ठेवला पाहिजे. ही दृष्टि येण्यास आत्मीय भावना आवश्यक आहे. आणखी एक गोष्ट लक्ष्यांत घेणें अवश्य आहे. ती म्हणजे, इतिहासलेखक ज्या काळांत वावरत आहे त्या काळाचे दृष्टीनें त्यानें गतकालीन इतिहासाकडे पाहतां कामां नये. कारण, गतकाल आणि आधुनिककाल यांत शास्त्र, दळणवळण, लोकसमजुती, आचार, राजनीति, युद्धनीति इ० गोष्टींत अंतर पडलेलें असतें; म्हणून या लेखकानें ज्या काळाचा इतिहास लिहावयाचा असेल त्या च काळाशीं समरस होऊन मग तो लिहिला पाहिजे. दोषदिग्दर्शक लेखक स्वतः फार मोठ्या योग्यतेचा असावा लागतो. हें दिग्दर्शन करण्यांत त्याचा हेतु, त्याच्या समकालीन समाजांतून या दोषांचें निर्मूलन व्हावें असा असतो. अर्थात् त्याचें स्वतःचें वर्तन या दोषापासून अलिप्त असावें लागतें. उदाहरणार्थ, श्रीमंत नानास्वामि पंतप्रधान आणि त्यांनीं इंग्रेजांचें घेतलेलें साहाय्य आणि त्या प्रसंगावर टीका करणारे इतिहासलेखक. श्रीमंतांनीं, आंग्रे यांचें नाविकदळ, ते सुखासुखी आपल्या स्वाधीन करीत नव्हते, म्हणून इंग्रेजांस मिळवून घेऊन आपला कार्यभाग उरकला, या प्रसंगाविषयीं हा निर्देश आहे. इंग्रेजांस याप्रमाणें नानास्वामि यांनीं च प्रथम घरांत घेऊन आमच्या घरांतील-स्वराज्यांतील-छिद्रें दाखवून दिलीं, या साठीं बहुतेक इतिहासलेखकांनीं त्यांचे वर उग्र किंवा सौम्य टीकास्त्र सोडलें आहे. माझें म्हणणें असें नाहीं जे, नानास्वामिंचें हें वर्तन चुकलें नाहीं; पण त्याचा निर्णय देतांना, श्रीमंतांना ज्या परिस्थितींत ही अपरिहार्य गोष्ट करावी लागली, ती सर्व परिस्थिति लेखकांनीं आपल्या डोळ्यां-

समोर घेतली पाहिजे. छत्रपतीनिर्मित सामंत मंडळी, पंतप्रधानांच्या आज्ञेत वागण्यास मान्य होती काय, मध्यवर्ति राजसंस्था सबळ असावयास सत्ता एकमुखी असणें अवश्य होतें का नाहीं, अवश्य असल्यास श्रीमंतांनीं तसें करण्यासाठीं या प्रसंगांत इतर अनेक सौम्य उपाय केले होते काय, ते साध्य होत नाहींत असें ठरल्यानंतर मग हा उपाय योजला कीं नाहीं आणि तो हि मनाचे विरुद्ध मोठ्या कष्टानें कीं काय, इंग्रेज डोईजड होणार नाहीं अशी सावधानता कितपत घेतली होती इ० अनेक महत्त्वाच्या विषयांचा लेखकांनीं अवश्य विचार करावयास हवा. " आम्ही गनीम, शिवाजी महाराजांचे शिष्य आहों " असें ठांसून सांगणाऱ्या श्रीमंतांना स्वराज्यांतील गृहच्छिद्रांत या टोपीवाल्याचें सहाय्य घेणें भाग पाडणारी अशी कोणती परिस्थिति त्यांचे भोवती पसरली होती, याचा लेखकानें सूक्ष्म अभ्यास करून ती सर्व उकलून दाखवावयास नको काय ? तशी दाखविल्या वर मग निर्णय देणें योग्य ठरेल. सारांश, इतिहासांत गुणवर्णनपर विवेचना पेक्षां दोष-दिग्दर्शनपर विवेचन करणें कठीण आहे आणि तें करणारा योग्यतेचा लेखक आढळणें कठिणतर आहे.

( १२ ) इतिहासलेखक कसा असावा याचें वर्णन आतां पर्यंत मधून मधून आलें आहे. त्याचे अंगीं, सत्याची आवड, असत्याचा तिटकारा, सूक्ष्मदृष्टि, सारासारग्रहणशक्ति, कसल्या हि लोभास बळी न पडण्याइतकी जाज्वल्य निष्काम-वृत्ति, स्वदेश–स्वभाषा—स्वधर्म यांच्या ठायीं उत्कट अभिमान इ० गुणांचें साह-चर्य पाहिजे. तसें च त्याचें स्वतःचें वर्तन, तो आपल्या इतिहासांत निष्कर्षरूपानें जो उपदेश करील त्यास अनुसरून असणें अत्यंत अवश्य आहे. उदाहरणार्थ वरील प्रसंग घेऊं. श्रीमंत नाना स्वामींच्या या कृत्यावर टीकाकारांनीं टीका केल्याचें वर म्हटलें च आहे. बहुतेकांचें म्हणणें, श्रीमंतांचें हें कृत्य देशद्रोहीपणाचें झालें. समजा जे, यांतील कांहीं टीकाकार, सांप्रतच्या परदास्याच्या कालांत, स्वाभिमान न सोडतां कोणत्या हि लोभास बळी न पडतां, आमरण दारिद्र्यांत अर्धपोटीं राहून परकीय नौकरशाहीचे सर्व प्रकारचे आघात शांतपणें सहन करून, देशसेवेंत शरीर झिजवितात पण नोकरशाहीस गृहच्छिद्र दाखवीत नाहींत, तिचे अरेरावीस साहाय्य करीत नाहींत; म्हणजे एका अर्थानें देशद्रोहीपणा करीत नाहींत. पण, समजा, असे हि कांहीं टीकाकार निघतील किंवा निघाले आहेत कीं, जे, स्वाभिमानास

लाथाडून स्वत: नौकरशाहीच्या लाथा खाण्यांत भूषण मानतात, पदव्या-वर्षासनें इ० च्या लोभास बळी पडून आमरण असल्या भ्रष्ट लक्ष्मीच्या सावलींत राहतात, राजकारणाचा प्रसंग आला तर बोलकें राजकारण करण्यांत पुढें पण आत्मक्लेशी राजकारणांत मागें राहतात, एवढें च नव्हे तर तसल्या दिव्य राजकारण करणाऱ्या विभूतींना अडचणींत आणण्यासाठीं, तिच्या मात्सर्यानें, नौकरशाहीस अज्ञानत: वा ज्ञानत: साहाय्य हि करतात, म्हणजे त्यांच्याच (श्रीमंत नानास्वामींवरील) निर्णया-प्रमाणे ते देशाशीं द्रोह करतात. आणि असा आक्षेप जर त्यांच्यावर त्यांचे हें वर्तन त्यांच्या डोळ्यां पुढें ठेऊन कोणीं केला तर त्यास ते काय उत्तर देतील ? आणि त्यांच्या श्रीमंतां वरील टीकेचे महत्त्व हि लोकांना काय वाटणार ? जो दोष, हे टीकाकार श्रीमंतांवर लादणार तोच दोष यांच्या गांठीं बांधलेला असल्या-वर यांच्या टीकेला विचारणार तरी कोण ? "दोष ठेवी पुढिलांसीं । तें चि स्वयें आपणापासीं । ऐसें कळेना जयासी । तो एक पढतमूर्ख ॥" ही श्रीसमर्थांनीं दिलेली पदवी त्यांना आपोआप प्राप्त होते ! तेव्हां असा इतिहासलेखक वा टीकाकार नसावा. सारांश, या दोन प्रकारच्या टीकाकारांत किंवा लेखकांत, पहिलें स्थान पहिल्या लेखकांना मिळेल आणि ढोंगी म्हणून दुसऱ्यांच्या कपाळीं मुद्रा ठोकली जाईल; अस्तु.

( १३ ) वरील प्रकारचे ढोंगी लेखक, वाचक, कथक, वर्तक, राजसंस्थाचालक, जेव्हां एखाद्या देशांत अधिकाधिक निपजतात, तेव्हां त्या देशाच्या स्वातंत्र्यसौभाग्यास ओहटी लागते आणि कांहीं कालानें तो देश, त्यास आपल्या दास्यांत अडकावून टाकण्यासाठीं टपून बसलेल्या एखाद्या धूर्त परकीय देशाच्या तावडींत सांपडतो. पहिल्या देशांत या वेळीं—तावडींत सांपडण्याचे पूर्वीपासून—उच्चतम, उदात्त गुणांचा ऱ्हास होत जातो;पुढाऱ्यांच्या बुद्धीस मांद्य येतें;परकीय लोक आपल्याला कशा उपायानें जाळ्यांत ओढीत आहेत, त्याचें आकलन या पुढाऱ्यांना होत नाहीं; मत्सरामुळें पुढाऱ्यांपुढाऱ्यांत भांडणें लागतात; सैन्यात एकसूत्रीपणा रहात नाहीं; सैनिकांना सेनापतींचें कठोर आज्ञापालन करतां येत नाहीं; सामा-जिक निर्बंध सैल, नव्हे, विस्कळित होतात; त्यामुळें चोर, बंडाळी माजविणारे यांची चलती होते; त्यांच्या भीतीनें धनिक आपलें धन लपवून ठेवतात; राज्यसंस्थेचे अधिकारी हि दुर्बल बनतात. सारांश, असली निर्बंध स्थिति देशांत

माजल्यावर तो देश आपल्या हस्तगत करण्यासाठीं वर दर्शविल्या प्रमाणें एखाद्या धूर्त परदेशानें अनेक युक्त्या योजल्या तर त्यांत काय नवल ? त्यानें तसें केलें म्हणून त्यास दोष काय म्हणून द्यावा ? अशीं बोटें मोडण्यांत काय अर्थ आहे ? दुर्बळांना सबळांनीं पायाखालीं तुडवावें, हा जगाच्या अनेक न्यायां- मधील एक न्याय आहे ! यास एक च उपाय आहे आणि तो म्हणजे आत्म- निरीक्षण; आत्मनिरीक्षणानें आपले दोष आपल्यास अवगत होतात. त्या दोषांचा त्याग केल्यास आणि सद्गुणांचा लाभ जोडल्यास वाईट दशा कदापि येणार नाहीं; एवढयासाठीं च इतिहास लिहावयाचा असतो आणि त्या दृष्टीनें तो वाचावयाचा असतो.

( १४ ) या पुस्तकाचा मुख्य विषय "इंग्रेज कुंपिणीनें" भारतवर्षाचें राज्य कसें घेतलें हा आहे. कसें घेतलें या प्रश्नाचें उत्तर, ग्रंथकर्त्यांनें जें दिलें आहे किंवा मांडलें आहे, त्याची गोळाबेरीज एका शब्दांत सांगतां येते आणि तो शब्द म्हणजे भेद ( फितुरी ) ! पुस्तकांत जे ६१७ प्रसंग दिले आहेत, त्यांत सर्वत्र भेदाचें च साम्राज्य दृष्टीस पडतें; सगळीकडे भेदनीति वावरत आहे ! या भेदनीती- विषयीं पुष्कळ लेखक इंग्रजांस दोष देतात; मी त्यांना दोष देत नाहीं. त्यांना काय म्हणून दोष द्यावा ? इंग्रेज तर बोलून चालून भारतवर्ष हस्तगत करण्यास टपला होता. भारताची अफाट संपत्ति त्याचे डोळे दिपवीत होती. त्याच्या देशांत त्या काळीं काय होतें ? अर्धवट शरीर झांकण्याइतपत वस्त्र निघत होतें, तर अर्धें पोट भरेल इतकें धान्य उपजत होतें. त्याच्या मनांत, जगांत पुढें यावयाचें होतें, त्या- साठीं लागणारे गुणावगुण त्यानें अभ्यासिले. भेदनीति हा त्या अभ्यासाचा एक महत्त्वाचा अंश होता. त्यानें ती नीति वापरली हा त्याचा दोष नसून, आमचे पूर्वज त्या नीतीस बळी पडले हा आमच्या पूर्वजांचा दोष ! बळी पडण्याचीं कारणें दोन; एक, भेदनीति न समजण्या इतपत बुद्धीचें अज्ञान; दुसरें, ज्ञान असून कोणाच्या तरी मात्सर्यानें किंवा स्वतःच्या लाभासाठीं बुद्ध्यां डोळेझांक करून लोभ पुरा करणें. दोन्हीं, देशाच्या स्वातंत्र्यास हानिकारक; पहिल्याहून दुसरें जास्त. या सर्व हानींचें मुख्य कारण "एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा अभाव." हा आमच्यांतील अभाव प्रथम एका फरासीसानें ओळखला पण त्याचा संपूर्ण- तया लाभ इंग्रजानें उठविला. त्यानें पूर्णपणे ताडलें जे. भारतीय (हिंदु-मुसुलमान)

प्रजा स्वतःच्या थोडक्याशा लाभासाठीं देशाचें स्वातंत्र्यावर निखारे ठेवण्यास सदोदित उद्युक्त असते ! तेव्हां त्यानें तें साधन हातांशीं घेतलें ! त्या काळीं इंग्रेज सबळ नव्हता; त्याचें स्वजातीय सैन्य थोडें होतें; लढाया खेळावयास लागणारा पैका त्याचे जवळ भरपूर नव्हता; भारतीयांशीं समोरासमोर लढावयास लागणारें शौर्यहि अल्प होतें (इंग्रेज तसा जातीनें शूर नाहीं, हें महायुद्धांतहि सिद्ध झालें आहे), स्वतःचीं रक्षण करणारीं दुर्गादि साधनें हि त्याचे जवळ फारशीं नव्हतीं. सारांश, अशी त्याची परिस्थिति होती आणि अशा परिस्थितींत त्याला दिल्ली-पुणें येथील सिंहासनें दिसत होतीं; त्यांवर बसण्याची त्याची इच्छा तीव्र होती. मग ती फलद्रूप होण्यास उपाय काय ? एक उपाय होता आणि तो च त्या इंग्रेजानें योजला. तो म्हणजे भेद. आपली कोणत्या हि प्रकारें हानी न होऊं देतां, प्रतिपक्षापासून जेवढा लाभ लाटतां येईल-विशेषतः राजकारणांत-असा जर कोणता उपाय, युक्ति असेल तर ती भेदनीति होय; बरें, राजनीति-शास्त्रांत तिचा प्रामुख्यानें निर्देश केला आहे. भारतीय-राजनीति हि, साम-दाम-दंड-भेद या राजकारणाच्या साधन-चतुष्टयांत भेदाचा निःशंकपणे उच्चार करते.

( १५ ) भेदनीतीचा आणखी एक प्रकार आहे. मोठें राजकारण सिद्ध करण्याचे कामीं भेदाचा उपयोग करावयाचा खरा, आणि त्या वेळीं जो भेद्य गांठावयाचा त्यास, ते राजकारण सिद्धीस गेल्या नंतर ठरविलेलें मूल्य द्यावयाचें हें हि खरें; पण या भेद्यानें पुढें मागें आपल्या हि राजकारणांत पुन्हां भेद करून तें नासूं नये म्हणून नसतें च कुभांड त्याचे वर आणावयाचें आणि त्यास आपल्या मार्गांतून निरंतरचें—वाटल्यास त्यास यमसदनीं धाडून सुद्धां—दूर करावयाचें; हा तो प्रकार होय ! कांहींएक प्रमाणांत हा प्रकार या पुस्तकांत वर्णिलेल्या कांहीं प्रसंगांत आढळेल; मीरजाफर-मीरकासीम, छत्रपति प्रतापसिंह—आप्पासाहेब, इ० प्रसंग पहा. तथापि, हा प्रकार हि कांहीं इंग्रेजानें नवीन शोधलेला नाहीं. यूरोपांतील मॅकिॲव्हिलीचा गुरु शोभणाऱ्या आर्य चाणक्याची सुद्धां असली राजनीति आहे आणि ती इतकी कुटिल आहे जे, त्या वरून चाणक्याला कौटिल्य हें पडनांव प्राप्त झालें. पण या आपल्या घरच्या ठेव्याचा आपणांस विसर पडला आणि म्हणून इंग्रेजांच्या आहारीं आपण गेलों ! मी नेहमीं म्हणत असतों जे, इंग्रेज-कुटिलनीति आम्हांस पूर्णपणें न समजल्या मुळें आम्ही स्वराज्यास मुकलों !

स्वराज्यनाशाचीं इतर कारणें आहेत नाहीं असें नाहीं, पण माझ्या मतें हें कारण प्रमुख होय. एक उदाहरण देतों. " खूप शर्तीनें राज्य राखणाऱ्या" नाना फडणविसांनीं एकदां एक प्रचंड व्यूह रचला; मराठे–निजाम–श्रीरंगपटणवाला या तिघांनीं एक होऊन, इंग्रजांस भारतांतून हांकलून द्यावयाचें, हा तो व्यूह. पण तो फसला आणि तो फसविण्यास कारणीभूत होणारी व्यक्ति, मराठी साम्राज्यांतीलच एक प्रसिद्ध व्यक्ति होती. तिनें इंग्रेजांकडून भरपूर लांच घेऊन देशद्रोहीपणा केला ! कांहीं काळानें या व्यक्तीस आणि तिच्या वंशजांस इंग्रेजांच्या भेदनीतीचा दुसरा प्रकार पहावयास मिळून योग्य प्रायश्चित्त मिळालें ! सांगावयाचें कारण एवढें च जे, आम्ही इंग्रेजांपुढें या " डिप्लोमसी " मध्यें फिके पडलों. " तैनाती फौज," हें काय प्रकरण होतें ? वरील नीतीचा च एक प्रकार. डलहौसी आपल्या एका पत्रांत म्हणतो जे " माझ्या बायकोच्या भाच्याला, जो माझा पूर्वी शरीररक्षक होता, निजामाच्या सैन्यांतील तोफखान्यावर मी मुख्य नेमलें " ( ड० चा खाजगी पत्रव्यवहार. पृ. १७३). ही दूरदृष्टि आम्ही कितीशी पाळीत होतों ? सन १८५१ मध्यें ब्रह्मदेशच्या राजानें डलहौसीशीं मैत्री टिकावी म्हणून पत्रव्यवहार व तसलें वर्तन चालू ठेवलें होतें आणि तें खरें असल्याचें डलहौसीनें मान्य हि केलें आहे. पण त्या च वेळीं कमांडर ल्यांबर्ट हा रंगूनकडे राजाचीं गलबतें पकडीत होता आणि डलहौसी त्यास अडथळा आणीत नव्हता ! याचें कारण, डलहौसीच्या शब्दांत "कांहीं हि करून आम्हांस पूर्व सरहद्द बळकट करावयाची आहे ! " असें आहे. आमचे तत्कालीन राजे कसे होते आणि त्यांचा नायनाट करण्यास डलहौसी कसा टपला होता आणि हीं कृत्यें करतांना तो कोणत्या प्रकारचा आव आणी, याचा थोडासा मासला त्याच्या पुढील मूळ वाक्यांवरून येईल. " In India we are all quiet and everything going prosperously enough. The King of Oude seems disposed to be bumptious. I wish he would be. To swallow him before I go would give me satisfaction. The old King of Delhi is dying. If it had not been for the effete folly of the court I would have ended with

him the dynasty of Timour" (ड० खा० ५०, २६२)! इंग्रजानें आमच्या येथील लोकांच्या मनाचा चांगला अभ्यास केला होता. अलफिष्टननें हेरलें जे, मराठी–साम्राज्य नष्ट केलें तरी महाराष्ट्रीय लोकांच्या मनांवरील त्याची पकड तत्काळ नाहींशी होणार नाहीं; म्हणून त्यानें शहाणपणानें असा जाहीरनामा काढला जे, "आम्ही फक्त बाजीरावसाहेबांना पेशवे-पदावरून दूर करीत आहों; राज्य छत्रपती महाराजांचे च आहे!" एवढें च नव्हें तर "मुख्य प्रधान" या शब्दाचा दर्प मराठी मनांवर अधिराज्य करीत असल्यानें, त्यानें "राजा प्रतापसिंह छत्रपति हर्षनिधान। गौरनाल अलफिष्टण मुख्य प्रधान॥" अशी आपल्या नांवाची मुद्रा करून त्या मराठी मनांस बहुत दिवस झुलविलें! पण याच्या उलट दुसरें हि एक उदाहरण आढळतें. मराठ्यां इतकी, दिखाऊ कां होईना, पण स्वराज्याची आणि त्याच्या प्रतीकाची आवड दिल्लीपतीच्या मुसुलमान प्रजेंत नव्हती आणि म्हणून त्या दिल्लीपतीच्या विषयांत डलहौसीस पुढील उद्गार काढणें सुलभ झालें. तो म्हणतो:—" Even if the title had been abolished on the spot, the Mussulmans would not have cared two straws about the family, though they used it now when they find it convenient to their hand" (उक्त ३८२)! ही पदवी म्हणजे 'बादशहा'! असल्या प्रकारच्या राजनीतींत आम्ही पुढारलेलों नव्हतों; एवढें च नव्हें तर ही इंग्रेज नीति त्यावेळीं आम्हांस उमगली हि नाही आणि जेव्हां उमगली तेव्हां आमच्या हातीं भोपळा आला होता! या नीतीच्या वाटेनें चालल्यामुळें एकट्या डलहौसीला" I have already added four ancient sovereignties and about two millions sterling of fresh annual revenue to their (कुंपिणीच्या) territorial rent-roll" (उक्त. २४१), असली दर्पोक्ती काढतां आली! सारांश भारताचें राज्य ज्या अनेक साधनांनीं इंग्रेजानें घेतलें, त्यांत माझ्या मतें हें साधन प्रमुख आहे; अस्तु.

(१६) हें पुस्तक राजेश्री रा० गो० भिडे यांनीं लिहिलें आहे. त्यांत त्यांनीं भारतीय–साम्राज्य आणि इतर पोटराज्यें इंग्रेजानें कशीं फस्त केलीं त्याचें विवरण केलें आहे, आणि तें आधारांसह केलें आहे. आजच्या काळीं असल्या प्रकारच्या

पुस्तकांची विशेष आवश्यकता आहे; म्हणजे पूर्वजांच्या गुणदिग्दर्शना पेक्षां दोषदिग्दर्शनाची ही वेळ आहे. माझ्या विचारसरणीस अनुकूल अशी लेखकाची विचारसरणी आढळली म्हणून, आणि त्यानें आग्रह केल्या वरून हे चार शब्द प्रस्तावना म्हणून लिहिले आहेत. पुस्तकांत प्रत्यक्ष घडलेले प्रकार किंवा कथा आल्या असल्यानें, प्रस्तावनेंत इतिहासाचें-इतिहासाची व्याख्या, उदय, उपयोग, ध्यावयाचा बोध इ० मुख्य गोष्टींवर-तात्त्विक विवरण केलें आहे. त्याचें आणि पुस्तकांतील प्रसंगांचें वाचन आणि चांगलें मनन कोणी करील आणि बुद्धि अंतर्मुख करून स्वराज्याच्या प्राप्तीस अपकारक असलेले दुर्गुण घालवून उपकारक असलेल्या सद्गुणांचा संग्रह करील, तर पुस्तक-लेखक तथा प्रस्तावनालेखक या दोघांना हि आनंद वाटेल ! आत्मनिष्ठ मुमुक्षुला पारलौकिक मोक्ष जसा दूर नाहीं, तसा त्याग आणि सेवा करणाऱ्या अंतर्निष्ठ देशभक्ताला हि ऐहिक मोक्ष म्हणजे स्वराज्य लांब नाहीं !

> " अंतरनिष्ठ तितुके तरले । अंतरभ्रष्ट तितुके बुडाले ॥
> बाह्याकारें भरंगळले । लोकाचारें ॥ "

—श्रीदासबोध–१८-१-२४.

पुणें—आनंदवनभुवन.
कार्तिक शुद्ध प्रबोधिनी एकादशी
शक १८५९.

आबा चांदोरकर.

# इंग्रजांनीं हिंदुस्थान कसें घेतलें ?

## प्रकरण पहिलें

## बंगाल कसा बुडविला ?

### प्लासी–ब्रिटिश राजनीतीचा एक नमुना

It will be an ill lesson indeed for the people of India, that while they are subjects to Vazir or Subadar we will protect them in their rights, that while they hold him we will stand forth in their favour. If he attempts to oppress you, we will receive you from the hands of your lawful master; but if by conquest or by any other means we became your Sovereign, remember there is none that can guarantee the treaty between you and us. The power of the sovereign is all, the right of the vassal is nothing. You are persons without right, engagement or any political existence, but our will and arbitrary pleasure.

**Charles James Fox.**
Speech on Benares charge.

न्याय, समता आणि विश्वबंधुत्व यांचा शांतिपाठ सदैव गात असणाऱ्या ब्रिटिशांच्या राजनीतीचा नमुना पहावयाचा असल्यास प्लासीप्रकरण पहावें.

सन १७५७ सालीं प्लासीची लढाई ( ! ) झाली व तेव्हां हिंदुस्थानांतील ब्रि० साम्राज्याचा पाया रोवला गेला असें सांगण्याचा परिपाठ पडला आहे. हिंदुस्थानांत ब्रि० सत्ता प्रस्थापित होण्यास ब्रिटिशांची मर्दुमकी ही खरी कारणीभूत केव्हांच झाली नसून हिंदी

लोकांत असलेली स्वार्थपरायणता व देशद्रोहाची कीड हीच प्रामुख्यानें कारणीभूत झाली व ब्रिटिशांच्या कुटिल राजनीतीची तिला जोड मिळाल्यानें हिंदुस्थानच्या मानेवर पारतंत्र्याचें जोखड बसविलें गेलें. हिंदुस्थानच्या गुलामगिरीचा इतिहास हीच गोष्ट सांगत असतो व प्लासीच्या रणक्षेत्रावर ब्रिटिशांच्या शौर्यापेक्षां त्यांची कुटिल नीतीच यशस्वी होऊन, सेनापति मिरजाफर स्वामिद्रोही, देशद्रोही झाला व त्यामुळें इंग्रजांना युद्ध करून न मिळणारा विजय एका देशद्रोह्यानें अल्प मोबदल्यादाखल इंग्रजांच्या गळ्यांत घातला. सिराज-उद्दौला पदच्युत झाला व मिरजाफर बंगालच्या सुभेदारीवर आरूढ झाला खरा, परंतु ही स्वजनांचा द्रोह करून विकत घेतलेली सुभेदारी त्यास इतकी महाग पडली कीं, यांतून मला कोणी सोडविणारा भेटेल का असे दीनवाणे उद्गार त्यास काढण्याचा प्रसंग आला. परंतु स्वखुषीनें गुलामगिरी एकदां पत्करल्यानंतर ती स्वखुषीच्या लहरी-प्रमाणें नष्ट मात्र होत नसते, असाच त्यास अनुभव आला. वॉरन हेस्टिंग्जवर लांचलुचपत घेण्याबद्दल व छळजुलूम केल्याबद्दल जो खटला झाला, त्यासंबंधीं काशीच्या राजघराण्याच्या वतीनें भाषण करतांना मि. फॉक्स यानें जें भाषण केलें, त्यांत तत्कालीन इंग्रज अधिकाऱ्याच्या नीतीचें जें तत्त्व वर उध्दृत केलें आहे तें हेंच सांगत आहे.

इंग्रजांचें हिंदी किनाऱ्यावर पाऊल पडल्यानंतर स. १६४० मध्यें त्यांनीं बंगाल्यांत हुगळी येथें वखार घातली व नंतर थोड्याच अवकाशांत पाटणा, डाका, कासिमबाजार, मुर्शिदाबाद इत्यादि अनेक ठिकाणीं शाखा उघडल्या व तेथें व्यापारास सुरुवात केली. वार्षिक तीन हजार रुपये देऊन त्यांनीं मोंगलबादशहाकडून बंगाल-मध्यें व्यापार करण्याचें स्वातंत्र्य संपादन केलें होतें. तथापि तत्का-

लीन बंगालचा सुभेदार शाइस्ताखां त्यानंतर मुर्शिकुलीखां, नंतर सर्फराजखां व त्याच्यामागून अलीवर्दीखां यांनीं इंग्रजांना हें स्वातंत्र्य केव्हांहि उपभोगूं दिलें नाहीं. इतकेंच नव्हे तर फरुखसियर बादशहानें इंग्रजांस ३८ गांवें इनाम दिलीं असतां मुर्शिदकुलीखानानें तीं त्यांच्या हातीं मुळींच लागूं दिलीं नाहींत इतका त्याला इंग्रजांचा द्वेष वाटे. अलिवर्दीखानाच्या मृत्यूनंतर सिराजउद्दौला सुभेदार झाला. परंतु नंदकुमार, मिरजाफर यांसारख्या देशद्रोह्यांच्या मदतीनें इंग्रजांनीं सिराजला प्लासी येथें कसा बुडविला ही गोष्ट इतिहासज्ञांस परिचित अशी आहे. सिराज बुडाल्यानंतर म्हणजे १७५७ मध्यें इंग्रजांनीं आपले पाय बंगालमध्यें खरेखुरे रोवले; नव्हे ते बंगालचे सर्व सत्ताधीश झाले. यावेळीं सिराजच्या गादीवर, मिरजाफरास बसविण्याचें मान्य करून इंग्रजांनीं मिरजाफर याजकडून अशा ज्या कांहीं अटी कबूल करून घेतल्या कीं, मिरजाफर यास त्या पाळणें अशक्य झालें; तेव्हां त्यास पदच्युत करून त्याच्या जागीं दुसरा एकादा हस्तक शोधण्याला इंग्रज बनिये लागले. परंतु या कामीं त्यास फारसें शोधावें लागलें नाहीं. कारण हिंदुस्तानची त्यावेळीं स्थितीच अशी होती कीं, डोळे मिटून इकडे तिकडे चांचपडले असतां सहज ओंजळभर स्वजनद्रोही केव्हांहि कोणासहि सांपडते! इंग्रज व्यापाऱ्यांनाहि खुद्द मीरजाफरचा जामात मीरकासिम हाच मिळाला. त्यास इंग्रजांनीं हातीं धरून मीरजाफरास तक्तावरून खालीं उतरविलें व त्या जागीं मीरकासिमची संस्थापना करण्यांत आली. या कामीं मीरकासिमनें व्यापारीमंडळाच्या सभासदांस व्यक्तिशः त्यांच्या मदतीबद्दल पुढीलप्रमाणें रकमा देण्याचें अभिवचन दिलें. वॅन्सिटार्ट ५ लक्ष रु.; समनर २ ल. ५५ ह.; हॉलवेल २ ल. ७० ह.; मॅकगायर २ ल. ५५ ह.; कॉलियॉड २ ल.; स्मिथ १ ल.

३४ ह.; या रकमा व्यक्तिशः पारितोषकादाखल दिल्या. याखेरीज मिरजाफरनें कबूल केलेले सर्व कराराहि पुरे करण्याचें अभिवचन त्यानें दिलें.

मीरकासिमाला रक्तस्राव न होतां सुभेदारी मिळाली व ती इंग्रजांच्या मदतीनें मिळाली तरी त्यांच्या हातचें खेळणें होऊन बसणें त्यास मान्य नव्हतें. तो स्वतः कर्तबगार, राजकारणकुशल, व्यवहारज्ञ असा असल्यानें त्यानें गादीवर येतांच असा निश्चय केला कीं, आपल्या घरचा मालक माझा मीच राहणार. इंग्रजांना त्यांत हस्तक्षेप करूं देणार नाहीं सिराजउद्दौला व मिरजाफर यांच्याशीं इंग्रजांचें कशा प्रकारचें वर्तन झालें होतें हें त्यानें प्रत्यक्ष पाहिलें असल्यानें इंग्रजांवर त्याचा काडीचाहि विश्वास नव्हता. उलट इंग्रजांनींहि त्याच्याशीं इतका नीचपणाचा व्यवहार केला कीं, कोणाहि स्वाभिमानी माणसाचें रक्त उसळावें ! यासंबंधानें मॅलेसन यानें ‘ हिंदुस्तानांतील क्रान्तिकारक लढाया ’ या पुस्तकांत असें स्पष्ट लिहिलें आहेः--

In a short time he had come to hate them and he had full reasons to do so, for the annals of no nation contain records of conduct more unworthy, more mean, and more disgraceful than that which characterised the English Government of Calcutta during the three years which followed the removal of Mir Jafar. That conduct is attributable to one reason only, the basest and meanest of all. The desire for personal gain by any means and at any cost. It was the same which animated the robber of the modern clime and the pirate of the southern sea, which had stimulated individuals to robbery and even to murder. In point of morality members of the governing clique of Calcutta from 1760—63 were not one whit better than the perpetrators of such deeds.

वाटेल त्या नीच मार्गानें धनसंग्रह करण्याला इंग्रज अधिकारी मागें पुढें पाहत नसत. एकाद्या दरवडेखोराप्रमाणें अगर चांचे माणसा-प्रमाणें त्यांची वृत्ति बनली होती. मीरकासिमसारख्या स्वाभिमानी मनुष्यास हा प्रकार मान्य होण्यासारखा नव्हता. तथापि त्यांच्याशीं उघड वैर करण्यासारखीहि त्याची स्थिति नसल्यानें इंग्रज व्यापा-ऱ्यांशीं शक्य तों पडतें घेऊन तो वेळ निभावून नेई. राज्यावर येतांच त्यानें प्रथम राज्यांत अंतर्गत सुधारणा करण्याची खटपट चालविली. तिजोरी अगदींच रिती पडली होती, जमाखर्चाची स्थितीहि अत्यंत असमाधानकारक होती, तींत सुधारणा करण्याचें त्यानें प्रथम ठरविलें. एकां बाजूला इंग्रजांचें ऋण व दुसऱ्या बाजूस सैन्याचा अनेक महिन्यांचा तुंबलेला पगार देणें, अशी बिकट परिस्थिति होती. नबाबाच्या कार्यकुशलतेची हीच खरी वेळ होती. परंतु त्यांतून त्यानें मोठ्या कुशलतेनें मार्ग काढला. तमाम अधिकाऱ्यांना ताबडतोब हिशेब दाखल करण्याबद्दल त्यानें फर्मान सोडलें. त्यांच्या कारभारांत त्यानें जरा लक्ष घालतांच त्यांतील मनस्वी घोंटाळा त्यास समजून आला. अनेकांनीं हजारों रुपयांच्या रकमा गडप केलेल्या आढळून आल्या. अली इब्राहिमखां नांवाच्या एका हिशेबी स्नेह्याकडे मालगुजार, जमीनदार यांचे हिशेब तपासण्याचें काम सोंपविलें. अंतः-पुरांतील कारभारांत अशाच अव्यवस्था त्यास दिसून आली. जवा-हीर, सोनें व इतर मौल्यवान सामानांची अफरातफर आढळली. अपराध्यांस धडाधड शासन करून संस्थानची सर्व मिळकत परत घेतली. याप्रमाणें सुधारणा सुरूं असतांच नबाबाचा अभिमानी व एक जुना अधिकारी राजा जगत्‌सिंग म्हणून होता, त्यानें बऱ्याच दिवसांपासून राजकारणांतून अंग काढून घेतलें होतें, तरी मीरकासि-मचा हा लोकहिताचा प्रयत्न पाहून त्यानें जमविलेलें सर्व धन आपण

होऊन मीरकासिमच्या स्वाधीन केलें. नबाबानें आपला स्वतःचा खर्च ताबडतोब कमी केला. दरबारांत चैनीच्या वस्तू उगाच जमविल्या होत्या त्या पार विकून टाकल्या. अशा रीतीनें पैसा जमवून त्यानें सैन्याचा पगार व इंग्रजांची बाकी चुकती केली. सैन्याचा पगार महिन्याच्या महिन्याला मिळूं लागला, भ्रष्ट मंत्री कामावरून कमी करण्यांत आले व सुखाचे दिवस उजाडले असें लोकांस वाटूं लागलें.

यानंतर मीरकासिमनें दुसरी महत्त्वाची गोष्ट केली ती प्रबल झालेल्या जमीनदारांच्या बंदोबस्ताची. मिरजाफरच्या कारकीर्दींत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी व्यवस्था होती. लहानसहान जमीनदार नबाबाला पुसत ना; लूटमार करूं लागले. या सर्वांत वीरभूमचा राजा हा फार प्रमत्त झाला होता. तो कोणासच जुमानीना. त्याचा प्रथम बंदोबस्त केला; बिहार प्रांतांत शांतता स्थापन केली. या कामगिरींत पाटणाचा नायब सुभेदार रामनारायण यानें पुष्कळ त्रास दिला. रामनारायण याला त्याच्या दंडेलींत कूट नांवाच्या कंपनीच्या अधिकाऱ्याचें साहाय्य होतें व त्याच्या बळावर तो उद्दाम झाला होता.

यासंबंधीं कंपनीची व नबाबाची पुष्कळ घामाघीस होऊन अखेरीस तो प्रश्न समाधानकारकपणें सुटला. परंतु यामुळें नबाबास मात्र इंग्रजांचा अगदीं वीट आला. यानंतर नबाबानें सैन्यसंघटनेचा प्रश्न हातीं घेतला. गुर्गीनखां म्हणून त्याचा मुख्य सेनापति होता. त्याच्या साहाय्यानें त्यानें कवायती सैन्याची उभारणी केली. नवीन दारूगोळा पाडला, नव्या तोफा ओतल्या. या कामीं महमदतकीखां, समरू इत्यादि चांगले सेनापती त्यानें नियुक्त केले. याखेरीज राज्यव्यवस्थेला अत्यावश्यक अशा गुप्तचर विभागाचीहि स्थापना त्यानें केली. गुप्तचर विभागाचा प्रमुख राजा सुखलाल म्हणून होता.

राज्यांत कोठें काय चाललें आहे, आपणाविरुद्ध कोणी कांहीं कट करीत आहे कीं काय याची त्याला बित्तंबातमी असे. त्यामुळें लोक त्याला वचकून असत. या गुप्तचरांच्या साहाय्यानें दरबारांत त्याच्याविरुद्ध झालेला कट ऐनवेळीं त्याला समजून कटवाल्यांना त्यानें कडक शासन केलें व त्यानंतर मुर्शिदाबादेहून राजधानी उठवून ती मुंगेर येथें नेली. कारण मुर्शिदाबाद येथें इंग्रज व्यापारी त्याच्या कारभारांत उगाच हस्तक्षेप करीत. मुंगेरीस राजधानी नेल्यानें त्याचा तो त्रास जरा कमी झाला.

नबाब मीरकासीम यानें राज्यकारभाराला असें सुव्यवस्थित स्वरूप देण्याचा उपक्रम केला असला तरी त्याचे हितशत्रु इंग्रज बनिये त्याला स्वस्थ बसूं देईनात. त्यांनीं प्रजेवर भयंकर जुलूम चालविला. प्रजा हवालदील झाली व नबाब प्रजेच्या कल्याणासाठीं इतका झटत असतां, त्याच्याच नांवाचा डांगोरा सर्वत्र पिटण्यांत येऊं लागला. इंग्रज व्यापाऱ्यांकडून प्रजेवर जो अमर्याद जुलूम होऊं लागला त्याची थोडक्यांत कहाणी अशी आहे:—

इंग्रजी व्यापाऱ्यांना बंगालमध्यें बिनाकर व्यापार करण्याबद्दल बादशाही आज्ञापत्र होतें. याचा अर्थ इतकाच होता कीं, बंगाल-मधून विदेशांत जो माल न्यावयाचा व विदेशांतून जो माल बंगाल-मध्यें यावयाचा त्यावर जकात माफ होती. सिराजउद्दौल्यापर्यंत या पद्धतीनें व्यापार चालत असे. परंतु प्लासीमध्यें इंग्रजी पारडें जड झाल्याकारणानें इंग्रजी व्यापाऱ्यांनीं आपल्या मर्जीप्रमाणें व्यापार करण्यास सुरवात केली. त्यांनीं दरएक जागीं आपले गुमास्ते नेमले व त्यांच्या द्वारें व्यापार सुरू झाला. हे गुमास्ते प्रजेवर नाना प्रका-रचा जुलूम करूं लागले. मीठ, पानें ( नागवेलीचीं ), तूप, तांदूळ, मासे, साखर, तमाखू, अफू इत्यादि पदार्थ लोकांपासून एक चतु-

थोडी किंमतीनें विकत घेऊन त्यांची पांचपट किंमत वसूल करीत. जे लोक माल विकत देण्याला अगर घेण्याला तयार नसत त्यांचे अनेक हाल करण्यांत येऊन त्यांच्या कपाळीं अखेर कैद येई. हे गुमास्ते गांवोगांवचे कोष्टी बोलावून आणीत व त्यांजकडून आपल्या इच्छे-नुरूप वाटेल त्या किंमतीस कापड विकत देण्याचा करार लिहून घेत. असा करारनामा कोणीं लिहून देण्याचें नाकारतांच त्यांस दोरीनें बांधून फटके देण्यांत येत. सर्व कोष्टयांचें एक रजिस्टर ठेवलें जाई व इंग्रजांशिवाय इतर कोणांस कापड विकण्यास त्यांस मनाई असे. रूढ भावापेक्षां निम्म्या भावानें त्यांना गुमास्त्यांना माल विकावा लागे. या अत्याचारामुळें बंगालमधील कोष्टी–वर्गाचा सत्यनाश झाला. अशा जुलमानें गांजून गेल्यानें लोक शहरें सोडून पळून जाऊं लागले. जीं शहरें एका काळीं कलाकौशल्यानें वैभवसंपन्न होतीं तीं वैराण उजाड झालीं. प्रथम न्यायासनासाठीं कचेऱ्या तरी होत्या, परंतु पुढें गुमास्तेच न्यायाधीश बनले. केवळ प्रजेवर अत्याचार करूनच हे गुमास्ते न थांबतां ते नबाबाच्या अधिकाऱ्यांनाही तुरुंग दाखवूं लागले. इंग्रज गुमास्त्याला पैसे दिले कीं तो कोणालाही निःशुल्क व्यापाराचा दस्तक देई व या दस्तकाच्या जोरावर, नावेवर इंग्रजी निशाण फडकावून ते दडपून जकात न देतां व्यापार करीत. यामुळें कलाकौशल्य तर ठार बुडालेंच पण कोष्टी लोकांनीं आपले प्राण बचा-वण्यासाठीं आपल्या हाताचे अंगठे कापून टाकले. व्यापाराची ही स्थिति झाली व केवळ या एका बाबीमुळें नबाबाचें प्रतिवर्षी २९ लक्षांचें नुकसान होऊं लागलें. इंग्रजांच्या या अत्याचाराचा परिणाम शेतीवरही फार वाईट झाला. शेतकरी, शेतीशिवाय हस्त-कौशल्याच्या इतर जिनसाहि तयार करीत. त्यांच्याहि मागें हा गुमास्ता–ग्रह लागला. गुमास्त्याला लागणाऱ्या वस्तु तयार करण्या-

साठींच त्याचा सर्व वेळ जाऊं लागला; यामुळें शेती खालावली. तिकडे लोकांचें दुर्लक्ष होऊं लागलें. त्यामुळें जमीनदारांचा खंडहि त्यांच्यानें भागवेना. अधिकारी सारा वसुलीसाठीं तगादा करूं लागले म्हणजे त्यांना पोटचे गोळे विकून सारा भरावा लागे.

रमेशचंद्रदत्त यांनीं 'अर्ली ब्रि० रूल इन् इंडिया' या पुस्तकांत यासंबंधीं पुढील उद्गार काढले आहेत.

"The people of Bengal had been used to tyranny but had never lived under an oppression so far reaching in its effects, extending to every village market and every manufacturer's loom. They had never suffered from a system which touched their trades, their occupations, their lives so closely. The springs of their industry were stopped, the sources of their wealth were dried up.

याच विधानाचा अनुवाद, मॉलिसन, इत्यादि इतिहासकारांनीं केला आहे.

नबाब मीरकासिम याला ही स्थिति समजत नव्हती असें नाहीं. परंतु इंग्रजांशीं टक्कर देण्याइतकी त्याची तयारी नव्हती. तेव्हां सौम्यपणानें तडजोड होईल असे प्रयत्न तो करी. त्यानें बंगालचा गव्हर्नर वान्सिटार्ट याजकडे पत्र पाठवून सर्व स्थिति कळविली. त्यांत त्यानें लिहिलें, 'आपणांशीं तह झाल्यापासून तो मोडण्याचा मीं किंचितहि प्रयत्न केला नाहीं, त्याचें अक्षरशः पालन केलें आहे; परंतु आपले लोक मात्र माझ्या प्रजेला निष्कारण त्रास देत आहेत. त्यांना लुटत आहेत, माझ्या अधिकाऱ्यांची बेइज्जत करीत आहेत. यामुळें अखिल हिंदुस्थानांत माझा दुर्लौकिक होत आहे. जागोजाग कारखाने काढून देशी व्यापारावर जुलूम चालला आहे. करारप्रमाणें मला कोणत्याहि नावेची झडती घेतां येते. परंतु या दस्तकाची

अवहेलना करतात. माझ्या अधिकाऱ्यांची अवहेलना करतात. तरी हे प्रकार आपण बंद करावे. म्हणजे प्रजेंत राजाबद्दल गैरसमज उत्पन्न होणार नाहीं.' गव्हर्नरनें हें पत्र बोर्डापुढें ठेवलें व बोर्डानें मुंगेरीस गव्हर्नरनें व हेस्टिंग्जनें जाऊन वादाचें कारण पाहून तें दूर करावें असें फर्मावलें. त्याप्रमाणें ते उभयता मुंगेरीस आले व त्यांनीं व्यापरासंबंधीं पुढील अटी तयार केल्या:—

१ विदेशी जाणाऱ्या येणाऱ्या मालावर कंपनीचा दस्तक असून त्यावर जकात घेण्यांत येऊं नये.

२ देशी मालावर नबाबाचा दस्तक असावा.

३ दस्तक घेतांना व माल पाठवितांना अगोदर जकात दिली पाहिजे.

४ एकदां एका चौकीवर जकात दिल्यावर इतर कोठें जकात द्यावी लागूं नये.

५ या परवान्यांना एकमेकांनीं एकमेकांस हरकत करूं नये. चौकिदारांनीं फक्त दस्तक बरोबर असल्याचें पाहावें.

६ दस्तकाखेरीज कोणी माल नेला आणल्यास तो जप्त करण्यांत यावा व त्याची बातमी इंग्रज अधिकाऱ्यांना द्यावी.

७ गुमास्त्यांनीं जबरीनें माल खरेदी विक्री करूं नये, त्यांस कांहीं अडचण उत्पन्न झाल्यास त्यांनीं सरकारी अधिकाऱ्यांस वर्दी द्यावी.

८ कांहीं वांधा झाल्यास त्याची एक प्रत गुमास्त्याकडे व दुसरी नबाबाकडे पाठवावी; म्हणजे त्यांत खरा दोषी कोण हें एकमेकांस समजून येईल.

नबाबाला या शर्ती मान्य नव्हत्या. परंतु वान्सिटार्टनें त्याला आश्वासन दिलें कीं, यामुळें पुढें कांहीं तुम्हांला त्रास होणार नाहीं.

तेव्हां नबाबानें शर्ती मान्य केल्या व त्याप्रमाणें आपल्या अधिकाऱ्यांस ताकिदपत्रें काढलीं.

वान्सिटार्टनें या ठरविलेल्या शर्ती बोर्डास मान्य झाल्या नाहींत. इंग्रजांच्या इभ्रतीस त्या कमीपणा आणणाऱ्या व व्यापार बुडविणाऱ्या आहेत, असा बोर्डानें अभिप्राय दिला. यासंबंधानें मिल्ल आपल्या ' हिंदुस्थानचा इतिहास ' या पुस्तकांत लिहितो:—

The conduct of the company's Servants upon this occasion furnishes one of the most remarkable instances upon record of the power of interest to extinguish all sense of justice and even of shame.

गव्हर्नर वान्सिटार्टनें कौन्सिलच्या निर्णयाचा स्पष्ट शब्दांत निषेध केला. परंतु कौन्सिलांत गव्हर्नराच्या विरोधी पक्षाचें मताधिक्य असल्यानें त्याच्या बोलण्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. गव्हर्नरनें कौन्सिलमध्यें कसलाहि बरा-वाईट ठराव आणला तरी त्यालाहि विरोध होऊं लागला. या विरोधी लोकांत एलिस या नांवाचा एक गृहस्थ होता. त्याला इंग्रजांच्या वतीनें पाटणा येथें अधिकारावर नियुक्त केलें होतें. तेथून तो नबाबाच्या निष्कारण पाठीस लागला. त्याच्या कारभारांत पदोपदीं हस्तक्षेप करूं लागला. पाटणा येथील नबाबाच्या मुख्याधिकाऱ्यास त्यानें एक पत्र लिहून, किल्ल्याच्या अधिकाऱ्यास तपास करूं देण्यासाठीं एक पत्र मागितलें. त्या अधिकाऱ्यानें ही विनंति अर्थातच अमान्य केली. त्याबरोबर शिपायांच्या तीन कंपन्या घेऊन तो मुंगेरीस गेला. त्यानें शहराबाहेर तळ दिला व एक घोडेस्वार मुंगेरीच्या किल्ल्याची झडती घेण्यास पाठविला. किल्ल्याच्या रक्षकांनीं त्यास हरकत केली, तेव्हां एलिसनें दुर्गरक्षकालाच पकडण्यासाठीं कांहीं शिपाई रवाना

केले. नबाबाचा दिवाण राजा दुर्लभराय यानें त्याची अनेक प्रकारें समजूत करण्याचा प्रयत्न केला. परंतु दुर्गाधिपति ताब्यांत आल्याखेरीज आपण तळ हालवीत नाहीं असा त्यानें स्पष्ट जबाब दिला.

या नसत्या कुरापतीचा नबाबास अत्यंत राग आला. त्यानें गव्हर्नरकडे पत्र पाठवून एलिसच्या दांडगाईचा प्रकार कळविला. नबाबहि हट्टास पेटला. तीन महिने वाद चालला. अखेरीस गव्हर्नरनें आयर्नसाइड नांवाचा एक इसम किल्ल्यांत पाठविला. त्यानें तेथें झडती घेतली. परंतु त्यास संशयास्पद वस्तु कांहींहि सांपडली नाहीं व त्यानें त्या आशयाचा रिपोर्टहि कलकत्त्यास केला. परंतु एलिसचें या प्रकारानें समाधान झालें नाहीं. अखेरीस कलकत्त्याहून हेस्टींग्जला पाठवून एलिस व नबाब यांमधील वाद मिटवावा असें ठरलें व त्याप्रमाणें हेस्टिंग्ज निघाला. वाटेंत कंपनीचे नोकर प्रजेस कसे छळतात याचें चित्र त्यास अनेक ठिकाणीं पाहण्यास सांपडलें व त्यानें ती सर्व स्थिति गव्हर्नरकडे सविस्तर रीत्या कळवून त्यांचा बंदोबस्त करण्याची विनंति केली. परंतु कौन्सिलांत आपल्या कर्तव्याची जाणीव असणारांची संख्याच इतकी थोडी होती कीं, गव्हर्नरास इच्छा असून सुद्धां कांहीं करतां येईना. पुढें हेस्टिंग्जची व नबाबाची मुलाखत झाली. तेथें व्यापारासंबंधीं पुनः कांहीं अटी ठरल्या त्या नबाबानें मान्य केल्या, परंतु कौन्सिलला त्या मान्य झाल्या नाहींत. इतक्यांत पाटणा येथें एलिसनें पुनः दंगा उत्पन्न करून नबाबाच्या अधिकारांत हस्तक्षेप केला. निःशुल्क व्यापाराचा प्रश्नहि अद्याप सुटला नव्हता. नबाब ठरलेल्या अटीनुसार कर वसूल करावयास जाई तों त्याच्या अधिकाऱ्यांस गोऱ्या लोकांकडून त्रास होई. नबाबाच्या कित्येक अधिकाऱ्यांस त्यांनीं तुरुंगांतही टाकलें. नबाबास हे प्रकार

समजतांच त्यानें कौन्सिलकडे पत्र लिहून झालेले प्रकार कळविले. त्यांपैकीं एका पत्रांत तो लिहितो. ' आतांपर्यंत मी फार त्रास सहन केला, पण आतां मात्र सहन करण्याची शक्ति माझ्यांत उरली नाहीं. मला सन्मानानें जगणें हेंच जास्त प्रिय आहे. '

अखेरीस कौन्सिलनें आमियाट व हे या नांवांचे दोन अधिकारी नबाबाकडे पुन: पाठविले. त्यांनीं पुढील अटी नबाबास सादर केल्या. ( १ ) वान्सिटार्टशीं झालेला तह रद्द समजावा. ( २ ) नबाबाच्या कारभारानें कंपनीच्या व्यापारांत जी तूट आली ती त्यानें भरून द्यावी. ( ३ ) नि:शुल्क व्यापाराचे सर्व नियम रद्द करण्यांत यावे. ( ४ ) दरबारीं इंग्रज रेसिडेन्ट ठेवावा. बरद्वान, चटगांव, मिदनापूर यांची जहागिरी कंपनीस द्यावी इ.; परंतु नबाबास अशा मानहानीच्या अटी अर्थातच मान्य होणाऱ्या नव्हत्या व त्यानें त्या मान्य केल्या नाहींतही. अर्थात् याचा परिणाम युद्धांत झाला व त्याचाहि उपक्रम प्रथम इंग्रजांनींच केला. प्रथम एलिसनें एकदम पाटणावर छापा घालून तें काबीज करून शहराची मनमुराद लूट केली. नबाबास या प्रकाराची थोडी कल्पना असल्यानें, त्यानेंहि आपली फौज पाटणाकडे रवाना केली होती. नबाबाचें सैन्य येतांच त्यानें एलिसला सडकून चोप दिला. एकही इंग्रज त्याच्या तडाक्यांतून सुटला नाहीं. जेथें जेथें ज्याच्या ज्याच्या हातीं इंग्रज सांपडला त्याचीहि वरील प्रमाणेंच वाट लागली. युद्ध होणार हें तर ठरलेंच; परंतु मीर कासिमच्या जागीं इंग्रजांना बसविण्यास एकादें बाहुलें पाहिजे होतें, तें आयतें तयारच होतें. मीरकासिम गादीवर बसला तेव्हां त्यांनीं मीरजाफरला पेन्शन देऊन ठेवलें होतें, त्याच्याशीं आपल्या इच्छेप्रमाणें तह करून त्यास बंगालचा नामधारी सुभेदार करण्याचें ठरविलें.

युद्धाखेरीज अन्य उपायच नाहीं पाहून मीरकासिमनें आपली सेना गोळा केली. जाफरखां, आलमखां, मीर हैमतुल्लां व महमद तकीखां यांच्या नेतृत्वाखालीं सेना देऊन ती मुर्शिदाबादेस रवाना केली. ही सेना चांगल्या निपुण सेनानींच्या देखरेखीखालीं तयार झाली असून, महमद तकीखां याचा लौकिक दूरवर पसरला होता; परंतु हा त्याचा उत्कर्ष इतर सेनापतींना पाहवेना. त्यांनीं त्यास मदत करण्यास दिरंगाई व अळंटळं केली. तरी लवमात्र विचलित न होतां तो सिंहासारखा एकाकीच हाताशीं असलेल्या थोड्या सैन्यासह इंग्रजी सेनेवर तुटून पडला. तरीहि त्याचे साथीदार त्याच्या मदतीस येईनात. याचा परिणाम असा झाला कीं, जवानमर्दी करीत तकीखानें धारातीर्थीं शयन केलें व नबाबाच्या पदरीं त्यान्च्या निमकहराम सैनिकांनीं अपयश बांधलें. या वेळीं जर तकीखां यास त्याच्या सहकाऱ्यांनीं मदत केली असती तर बंगालचा इतिहास कांहीं वेगळाच झाला असता. यासंबंधानें मॅलिसन म्हणतो:—

The History of India abounds in instances of such impatriotic conduct. Indeed it may be affirmed that few things have more contributed to the success of the English than the jealousy of each other of the native princes and leaders in India.

याप्रमाणें कटवा येथें पराजय झाल्यावर, नबाबाची सेना मुर्शिदाबादेकडे फिरली. इंग्रजहि तिच्या मागें सरकले. नबाबाची सेना शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज व इतर तयारीहि उत्तम असतां कटवाच्या युद्धानें तिच्यावर फार वाईट परिणाम झाला व इंग्रजांच्या स्वाधीन विनाकष्ट मुर्शिदाबाद पडलें. तेव्हां नबाबानें सूतीच्या मैदानावर पुन: तोंड देण्याची तयारी केली. तेथेंहि इंग्रजी सेनेशा तुंबळ युद्ध झालें, परंतु अखेरीस जयश्रीनें इंग्रजांसच माळ घातली. यानंतर शेवटचा रणसंग्राम

उदवा नाला येथें झाला. उदवानाला ही जागा युद्धासाठीं नियोजित करण्यांत मीर कासिमानें आपलें युद्धचातुर्य उत्तम प्रगट केलें. दर-एक युद्धांत इंग्रजांचा पराभव होई. नबाबावर आक्रमण करण्यास अवसरच सांपडेना. याच वेळीं इंग्रजांच्या सैन्यांतील एक शिपाई नबाबास येऊन मिळाला. त्यानें गुप्तपणें नबाबाचीं माऱ्याचीं ठिकाणें हेरलीं व अखेरीस भेद पाडून तो परत इंग्रजी सेनेस मिळाला. झालें, लढाईचा रंग तत्क्षणीं बदलला. नबाबाचा पराजय झाला व त्यास बंगालला पारखें व्हावें लागून इंग्रज, बंगाल-बिहार–ओरिसाचे सर्व सत्ताधीश झाले.

यानंतर मीर कासिमची स्थिति अत्यंत शोचनीय झाली. तो तेथून सुजाउद्दौल्याच्या आश्रयार्थ गेला. त्यानें त्यास प्रथम बऱ्याच चाळवण्या दाखविल्या. त्याचा नबाबास विश्वास येईना. तेव्हां नबाब तेथून प्रयाग, बुंदेलखण्ड इकडे वळला, परंतु कोठेंहि त्याला आधार मिळेना. सुजाउद्दौलानें आमीष लावलें होतें, परंतु त्याजकडून द्रव्याची सारखी होत असलेली मागणी पुरी करतां करतां नबाब घाईला आला. अखेरीस सुजानें त्यास कैद केलें व अजिमाबाद व बक्सर येथें इंग्रजांशीं लढाया दिल्या. परंतु इंग्रजांचा भाग्यरवी त्यावेळीं उदयाचलीं असल्यानें सुजास त्यांतहि हार खावी लागली. बक्सरच्या लढाईपूर्वी तीन दिवस सुजानें मीर कासिमला मुक्त केलें. तेथून हा भाग्यहीन राजा लपत छपत दिल्लीकडे गेला. असें म्हणतात कीं, त्यानें अबदल्लीकडे मदतीची याचना केली; परंतु कोठेंहि त्यास धर सांपडला नाहीं. यापुढें मीर कासिमची काय वाट लागली याची सत्य माहिती उपलब्ध नाहीं.

स. १७७७ मध्यें दिल्लीमध्यें एका झोंपडींत एक इसम मरण पावला. त्याच्या अंगावर फक्त एक दुशाला होती. ती विकून त्याचें

दफन करण्यांत आलें. त्याला पुरत असतां एकानें उद्गार काढले 'हा तर मीर कासिम आहे.' अशा प्रकारें त्याचा शेवट झाला. त्याच्या मृत्यूबद्दल शोक करून त्याच्याबद्दल सहृदयाचे दोन अश्रू गाळणाराहि कोणी नव्हता. प्रभु इच्छा विचित्र आहे !!

बंगाल इंग्रजांनीं कसा बुडविला याचा थोडक्यांत इतिहास वर निवेदिला. देशद्रोह, स्वार्थ या घरबुडव्या वृत्ती तर लोकांत फारच बोकाळल्या व त्यांचें स्वाभाविक पर्यवसान व्हावयाचें तेंच झालें. भारत-वर्षांतील अत्यंत सुपीक, संपन्न असा एक मोठा प्रांत विनायासें कांहीं त्रयस्थांनीं घशांत घातला, याची दाद इतरांस नसावी यापरतें दुसरें आश्चर्य कोणतें ? 'मला काय त्याचें ?' या वृत्तीनें तर हिंदुस्तान देश बुडविला. बंगाल हा त्यांतील पहिला बळी होय. वरील देशहितविघातक वृत्ती देशांत तर फैलावल्या होत्या ही गोष्ट सत्य; परंतु कपटपटु वणिक्वृत्तीच्या परकीयांनीं राज्यसंस्थापना करतांना किती निंद्य व असमर्थनीय वर्तन केलें इकडेहि दुर्लक्ष होतां कामा नये.

[ आधारभूत ग्रंथः—

Rise of the Christian power in India, Vol. I by Basu.

Malleson's Decisive Battles of India.

Empire in Asia. Torrens.

Early British rule in India. R. C. Dutt.

**मीर कासिम. पं. हरिहरनाथशास्त्री.** ]

## प्रकरण दुसरें

# मराठी साम्राज्याचें पूर्व-टोंक (ओरिसा प्रांत) कसें गळलें ?

एके जागीं रोवलेला पाय घट्ट बसला म्हणजे मग दुसरा पाय पुढें टाकावा अशी व्यवहारनीति आहे. तीस अनुसरून इंग्रजांनीं बंगाल पूर्ण पचनीं पाडल्यावर शेजारच्या ओरिसा प्रांतावर आपली सर्वभक्षक नजर टाकली; त्या नजरेचा परिणाम या प्रकरणांत दिसून येईल.

छत्रपति श्रीशिवाजी महाराजांनीं इ.स. १६६४ सालीं रायगडीं राज्यारोहण करून हिंदवी स्वराज्य प्रस्थापित झाल्याची नौबत वाजविली. त्यानंतर शंभर वर्षांच्या काळांत हिंदवी स्वराज्याचा वृक्ष जोरानें फोफावून त्याच्या छायेखालीं आसेतुहिमाचल भारतवर्ष विसांवा घेऊं लागलें. उत्तरेस लाहोर, दक्षिणेस तंजावर, पूर्वेस ओढ्या जगन्नाथ येथपर्यंत, मराठी सत्तेचा हुकूम पददलित करण्याचें सामर्थ्य त्यावेळीं कोणांतहि नव्हतें.

पश्चिम किनारा आंग्रे धुळप यांच्या आरमारानें संरक्षित होता. उत्तरेचे द्वारपाल शिंदेहोळकर सदैव कटिबद्ध होते. पूर्वबाजूस नागपूरकर भोसल्यांनीं शह दिला होता. दक्षिणेस पटवर्धनादि सरदार कमरेस समशेर बांधून स्वराज्याची गस्त घालीत होते. अशा रीतीनें मराठी साम्राज्याचें संरक्षण होत असतांना, इतिहासश्रुत अशा कारणांनीं या अभेद्य तटबंदीस छिद्रें पडून त्यांतून स्वातंत्र्यनाशक असें जल पाझरूं लागलें व ता. ३१ डिसेंबर १८०२ रोजीं वसई मुक्कामीं मराठी साम्राज्याच्या तटबंदीस सुरुंग लागून परकीयांना

आंत घुसतां आलें व तेव्हांपासून मराठी साम्राज्याच्या अध:पातास सुरवात झाली !

## मराठी साम्राज्याचा अध:पात.

इंग्रजांनीं व्यापारी पेशानें भारतवर्षांत प्रवेश केल्यानंतर त्यांना साम्राज्य संस्थापन करण्याला हिंदुस्थानची भूमि फार मऊ वाटली व मराठी सत्तेस खो देऊन त्या जागीं बसण्यासाठीं त्यांनीं बरेवाईट अनेक उपद्व्याप सुरू केले. त्यांचें फळ त्यांना आतां हातीं आलें. मराठ्यांची मध्यवर्ती सत्ताच कोसळल्यानंतर तिचे आधारस्तंभ आपल्या लगामीं लावण्याचें काम फार सोपें होतें. जरूर तेथें पड घेऊन, कोठें धाकदपटशा दाखवून, कोठें लालुचीनें तर कोठें जबरीनें त्यांनीं चौफेर मराठी सत्तेवर आक्रमण करण्यास सुरवात केली व त्यांच्या कुटिल नीतीस पुरा पडणारा एकहि धूर्त मुत्सद्दी अखिल मराठी साम्राज्यांत न उरल्यानें व प्रत्येकजण स्वार्थांधानें आपलेंच घर सांवरण्याच्या प्रयत्नास लागल्यानें इंग्रज मुत्सद्दी आपल्या नीतींत पूर्ण यशस्वी झाले यांत आश्चर्य नाहीं.

## नागपूरकर भोसल्यांचा दिग्विजय.

मराठी साम्राज्याचा झेंडा शिंदे, होळकर यांनीं ज्याप्रमाणें अटकेपार फडकाविला त्याप्रमाणें नागपूरकर भोसल्यांनीं पूर्वदिशा पादाक्रान्त केली. विशेषत: भोसल्यांचा हा दिग्विजय थोरल्या रघूजी राजांच्या कारकीर्दींत झाला. सेनासाहेब सुभा रघुजी भोसले यांना शाहू छत्रपतींनीं वऱ्हाडची सुभेदारी दिल्यानंतर, त्यांनीं पूर्वदिग्विजयास प्रारंभ केला. त्या वेळीं त्यांना त्या कामीं भास्कर राम-(कोल्हटकर–) सारखे कुशल सेनानी मिळाल्यानें त्यांत अपूर्व यशहि मिळालें. मुसलमानांच्या बेइमानीस वश होऊन भास्कर राम प्राणास

मुकले असले तरी **रघोजींनीं** त्या प्रांतावर लागोपाठ पांच स्वाऱ्या करून अखिल **ओरिसा** प्रांत म्हणजे **मिदनापुरापासून** तों तहत **जगन्नाथपुरीपर्यंतचा** मुलूख आपल्या काबूंत आणला. त्यावेळीं **ओढया** प्रांतांत **मिदनापूर ( मेदिनीपूर ), बालेश्वर** ( आजचा **बालासोर** ), **कटक** व **जगन्नाथपुरी** हीं शहरें फार प्रसिद्ध होतीं. **रघूजीस** जर जास्त आयुष्य व अवसर सांपडता तर त्यांनीं **इंग्रजांस बंगाल** प्रांतहि सोडण्यास खात्रीनें लावलें असतें, इतके **रघूजीच्या** दराऱ्यास इंग्रज कांपत असत. कलकत्त्याला मराठ्यांचा उपसर्ग पोचूं नये म्हणून प्रसिद्ध '**मराठा डिच**' इंग्रजांनीं याच काळांत बांधला. मराठ्यांच्या सत्तेचे भग्नावशेष अद्यापिहि **मेदिनीपूर, कटक** या ठिकाणीं दृष्टीस पडतात.

भोसले राज्याचा विस्तार झाला तो पहिल्या **रघूजी** राजांच्या कारकीर्दींत. थोरले **रघूजी** हे वाईजवळच्या **पांडेवाडी** येथील राहणारे. तेथील **श्रीरामाजीपंत कोल्हटकर** यांच्या आशीर्वादानें ते जन्मले म्हणून त्यांना त्यांचें नांव ठेवलें व अशा रीतीनें **कोल्हटकर** घराण्याचा व **भोसले** घराण्याचा ऋणानुबंध उत्पन्न झाला तो अखंड राहिला. हिंदुस्थानच्या पूर्वदिशेला भोसल्यांनीं जो दिग्विजय केला त्याचें बहुतेक श्रेय **भास्कर राम** व **तुळजा राम** या वीरांना आहे. थोरल्या रघूजींनीं समर्थसंप्रदायी **देवदास** यांजपासून गुरूपदेश घेतला होता व तेव्हांपासून **नागपूरकर भोसले** यांच्या घराण्यांत रामभक्ति आहे ती आतांपावेतों जागती आहे.

## मध्यप्रांत व ओरिसा यांचा संबंध

आज मध्यप्रांतांत जो भाग समाविष्ट झालेला आहे त्याला लागू-नच **ओरिसा** प्रांत असल्यानें, **भोंसल्यांस** त्यावर सुलभतेनें आक्र-

मण करतां आलें. हल्लीं **रायपूर, विजगापट्टम** असा जो नवा रेल्वे रस्ता बांधण्यांत येत आहे, त्यावरून भोंसल्यांचा ओढ्या प्रांतावरील स्वाऱ्यांचा मार्ग कोणता तो दिसून येतो. **रायपुराहून ओढ्या** प्रांतांत जावयाचें म्हणजे मध्यंतरीं बस्तर नांवाचें एक मोठें संस्थान लागतें. हें पूर्वी भोसल्यांच्या अधिराज्याखालीं होतें व आजहि मराठी संस्थान म्हणूनच सरकारदप्तरीं नमूद आहे. या संस्थानांत खनिज संपत्ति अपरंपार आहे. ती, हा नवा रस्ता सिद्ध झाल्यावर भूगर्भातून वर काढण्यांत येईल; असो.

## इंग्रजांची दिवाणीची सनद.

**इंग्रजांना** दिल्लीच्या बादशहाकडून **बंगाल, बिहार** व **ओरिसा** या प्रांतांच्या दिवाणीची सनद मिळाली. परंतु त्यावेळीं **ओरिसा**-मध्यें खास इंग्लिशांच्या मालकीचा टापू फारच थोडा होता. बहुतेक प्रांत **नागपूरकर भोंसल्यांच्या** ताब्यांत होता. थोरल्या **रघूजींनीं अलिवर्दीखानाचा** व इतर मुसलमानांचा पराजय करून तेथें आपलें स्वामित्व कसें प्रस्थापित केलें ही कथा रम्य असली तरी ती येथें सांगण्याचा हेतु नाहीं. परंतु एक गोष्ट मात्र खरी कीं, **मराठी सत्ता** ह्या प्रांतांत स्थापन होण्याच्या आधींपासून इंग्रज व्यापाऱ्यांच्या वखारी त्या भागांत होत्या व मराठी राज्य तेथें स्थापन झाल्यामुळें इंग्रजांच्या व्यापाराला थोडीफार चाट बसूं लागली.

इंग्रजांची पहिली वखार **बालासोर** येथें स्थापन झाली. नंतर स. १६३४ मध्यें **शहाजहान बादशहानें** सुवर्णरेखेच्या तटाकीं पिंपळी या गांवीं वखार बांधण्यास त्यांना परवानगी दिली. पुढें त्यांना बंगालच्या नबाबानें २२० बिघे जमीन दिली. तेथें इंग्रजांनीं वसाहत केली व आज **बालासोर** म्हणून असलेलें शहर त्याच जागीं वसलें.

इंग्रजांना ओरिसाचा दिवाणी हक्क मिळाला खरा, परंतु त्यावर मालकी मराठ्यांची असल्यानें ओरिसावर इंग्रजांचा हक्क नुसता कागदांतच राहिला. त्यावेळीं मराठी सत्ता वर्धिष्णु असल्यानें मराठ्यांशीं दोन हात करून आपला अंमल बसविण्याची धमकहि इंग्रजांत नसल्यानें वीरतेपेक्षां कुटिलपणाच श्रेष्ठ ठरवून द्राक्षें आंबट या नात्यानें इंग्रज मराठ्यांच्या वाटेस गेला नाहीं, उलट मराठ्यांशीं गोडीनें व सामोपचारानें वागण्याचें कोर्ट ऑफ डायरेक्टरांनीं ठरविलें. सन १७६७ सालीं मराठ्यांना चौथ-हक्काची थकलेली बाकी देण्याचेंहि त्यांनीं मान्य केलें. परंतु त्यांत अशी अट घातली कीं, ओरिसा प्रांत मराठ्यांनीं आमच्या स्वाधीन करावा व चौथाईबद्दल १३ लक्ष रुपये प्रतिवर्षीं घ्यावे. परंतु इंग्रजांच्या वखारींत भोसल्यांचा वकील उदयपुरी गोसावी नांवाचा होता. त्यानें इंग्रजांच्या असल्या सर्वच मागण्या धुडकावून लावल्या. मराठ्यांशीं युद्ध करण्याचें तर सामर्थ्य नाहीं. तेव्हां चुरमुरे खात व संधीची वाट पाहात बसण्याखेरीज त्यांना उपाय नव्हता.

## इंग्रजांची कुटिल नीति.

इंग्रजांनीं मराठ्यांचें साम्राज्य गिळंकृत करतांना शौर्यापेक्षां मुत्सद्देगिरीचा-कुटिल नीतीचाच— विशेष अवलंब केला, ही गोष्ट मराठ्यांच्या इतिहासाकडे नुसती वरवर दृष्टि टाकली तरीहि ध्यानीं येण्याजोगी आहे. मराठ्यांतील आपसांतील दुहीचा, मत्सराचा, पुरेपूर फायदा इंग्रजांनीं घेतला. परस्परांच्या मनांत परस्परांविषयीं वैमनस्य नसलें तरी उत्पन्न करून दोघांत कलह उत्पन्न करावयाचा व खवा तोलणाऱ्या वानराप्रमाणें उभयपक्षांना गिळंकृत करावयाचें ही इंग्रजी नीति त्यावेळीं हिंदुस्थानांत वावरत होती. ज्या गोष्टी

केवळ शस्त्रबलावर साध्य झाल्या नसत्या त्या अशा कणिकनीतीच्या बलावर त्यांनीं साध्य करून घेतल्या.

**दुसरें मराठा–युद्ध** उत्पन्न करण्यांत इंग्रजांचा अन्य हेतु काय ? अशा आगलावेपणामुळें त्यांनीं **गुजराथ**, उत्तरेस शिंद्याचा बराचसा मुलूख व नागपूरकर भोसल्यांकडून वऱ्हाड प्रांत गिळंकृत करून टाकले. नागपूरकर राजे, शिंद्यांशीं सहकार्य करून इंग्रजांशीं युद्ध करण्यांत गुंतले असतां **ओरिसावर** मांजराच्या पावलानें घाला घालून तो प्रांत युध्द न करतांच त्यांनीं घशांत उतरविला.

## मराठ्यांच्या विरुद्ध कंड्या.

मराठी सत्ता ऐन जोरांत होती तोंपर्यंत तिच्याशीं उघडा सामना देण्याचें धैर्य इंग्रजांत नव्हतें. परंतु याचा अर्थ असा नव्हे कीं, इंग्रज त्या बाबतींत अगदीं स्वस्थ बसले होते ! त्यांनीं **ओरिसा** प्रांतांत मराठ्यांच्याबद्दल लोकमत कलुषित करण्याचे सारखे व कसून प्रयत्न चालविले होते. ‘ मराठी सत्तेखालीं उडिया लोक अत्यंत त्रस्त झाले आहेत; जुलमानें गांजले गेले आहेत ’ अशा हांकाट्या पिटण्यास त्यांनीं सुरवात केली होती. अशा गोष्टी पसरविणें हा तत्कालीन इंग्रजांच्या सुपीक मेंदूचा एक धंदाच होऊन बसला होता. पेशवाई काबीज करतांना त्यांनीं हाच उपाय योजला होता व इतर देशी राज्यें हस्तगत केलीं तेव्हांहि याच मार्गाचा त्यांनीं अवलंब केला होता. इंग्रज इतिहासकारांनीं याचीं जितकीं भडक चित्रें रंगवितां येतील तितकीं रंगविलीं आहेत. ओरिसाच्या बाबतींत जे. **बीम्स** हा इतिहासकार अग्रगण्य आहे; परंतु तोच तत्कालीन स्थितीसंबंधानें म्हणतो, “ रुपयाला ७२ शेर तांदूळ मिळत. एका पणाला एक मासा अफू मिळे, १४ कवड्यांना शेर मीठ विकत मिळे. ”

अशी सर्वसामान्य स्थिति होती. विशेषतः मराठी सत्ता ओरिसा प्रांतांत असतांना दुष्काळाचें नांवहि लोकांना माहीत नव्हतें. परंतु याच गोऱ्या बाळांचें पाऊल त्या प्रांतांत पडल्यापासून प्रति पांच वर्षीं दुष्काळाची भेट कधीं चुकली नाहीं. यासंबंधानें बीम्स पुढील-प्रमाणें म्हणतो.

## इंग्रजांची सत्ता व दुष्काळाचें आगमन.

" ब्रिटिशांनीं **कटक** प्रांत हस्तगत केल्यापासून लोकांना अन्न खावयास मिळत नाहींसें झालें आहे. ता. १ डिसेंबर १८०३ रोजीं बालासोरहून १५ हजार मण तांदूळ मागविण्यांत आले. पुढें ता. १ जून १८०४ रोजीं **कॅ. मॉर्गन** यानें एक फर्मान काढून जगन्नाथाच्या यात्रेकरूंनीं आपल्याबरोबर अन्नसामग्री भरपूर घेतल्याखेरीज या प्रांतांत येऊं नये, असें प्रसिद्ध केलें. .... .... .... .... .... मराठ्यांचा अंमल जुलमी असल्यानें आम्ही आक्रमणास सुरवात करतांच तेथील लोकांनीं मुक्त हस्तानें आमचें स्वागत केलें व मराठ्यांना कोणाचीहि मदत मिळाली नाहीं इतके मराठे तेथें अप्रिय झाले होते." परंतु हाच लेखक पुढें म्हणतो, "त्या देशाची आम्हांला माहिती नाहीं हें लक्षांत घेऊन आम्हांला कोणींहि कसलीहि मदत दिली नाहीं. आमच्यावर त्यांनीं बहिष्कार घातला. कागदपत्र लपविले. नावा, बैलगाड्या भलत्याच ठिकाणीं नेऊन टाकल्या. कोणा जमीनदाराचा शोध करतां त्याचा पत्ताच लागेना व अशा स्थितींत ब्रि० अधिकाऱ्यांनीं कोणावर जुलूम केला तर त्याचें प्रायश्चित्त त्यांना तात्काळ मिळे." या दोन हकीकती एकाच माणसानें लिहिल्या असल्यानें वाचकांनीं त्यांची तुलना करून त्यांतील ग्राह्यांश घ्यावा. मराठ्यांचा जुलूम जर जाचक होता तर इंग्रज-

अंमल सुरू होतांच लोकांची स्थिति मात्र फोफाट्यांतून आगीच्या डोंबाळ्यांत पडल्यासारखी कां झाली ?

## फितुरीचा यशस्वी डाव.

क्लाईव्हनें चौथाई देण्याचें कबूल करून **ओरिसा** प्रांत मुकाट्यानें ताब्यांत घेण्याचा डाव टाकला, परंतु भोसल्याचा वकील **उदयपुरी गोसावी** हा इंग्रजांच्या कारवाया पुऱ्या जाणणारा असल्यानें १७६७ मध्यें इंग्रजांचा डाव साधला नाहीं. परंतु त्यांनीं ओरिसा घेण्याचा प्रयत्न मात्र सोडला नाहीं. इंग्रजांनीं तेथील लोक फितूर करण्याचा प्रयत्न चालविला होता. **ओरिसा** प्रांत जिंकण्याची कामगिरी **मार्किस ऑफ वेल्स्लीनें**, ले. **कर्नल कॅम्बेल** नांवाच्या अधिकाऱ्याकडे सोंपवून त्याला ता. ३ आगस्ट १८०३ मध्यें पाठविलें. त्या पत्रांत वेल्स्ली म्हणतो "**कटक** प्रांत कसा हस्तगत करावा यासंबंधींचे माझे विचार माझ्या सेक्रेटरीनें तुला कळविलेच आहेत. मराठी हद्दींत शिरल्यावर तेथील रहिवाशांशीं शक्य तितक्या सामोपचारानें वाग, त्यासाठीं प्रथम जाहीरनामा काढ. त्याचा मसुदा सोबत जोडला आहे. ब्रिटिशांना विरोध करणार नाहींत त्या लोकांचें जीवित व वित्त सुरक्षित राहील असें त्यांना आश्वासन दे. **जगन्नाथाला** पोहोंचतांच तेथील देवता व पुजाऱ्यांचे धार्मिक आचारविचार यांना बाधा न येईल असें धोरण ठेव. त्यांचे आचार निर्वेधपणें चालण्यासाठीं बंदोबस्ताला कांहीं रक्षक लागले तर तेहि दे. देवस्थानाला धक्का न पोहोंचेल अशी व्यवस्था ठेव. ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. त्यांत काडीमात्रहि बिघाड होऊं देऊं नको. तेथील पुजारी यात्रेकरूंपासून कराच्या रूपानें खूप पैसा मिळवितात असें ऐकतों, परंतु तूर्त त्यांच्या वाटेस जाऊं नको. त्यांना पूर्वीप्रमाणेंच कर वसूल करूं दे. तेथील पुजाऱ्यांना असें आश्वासन दे कीं, तुम्हीं

मराठ्यांना जो करभार देत होता त्यापेक्षां तुम्हांला जादा कर द्यावा लागणार नाहीं. कटक प्रांतांत पुष्कळ जमीनदार मराठी राज्य कमकुवत झालें असें पाहून आपणांस स्वतंत्र म्हणवून घेऊं लागले आहेत असें समजतें. त्यांच्याशीं गोडीनें वाग. त्यांना रुचतील त्या अटी कबूल कर व त्यांनीं पूर्णपणें ब्रिटिशांची सत्ता मान्य न केली तरी हरकत नाहीं पण त्यांनीं आपणांस विरोध करूं नये अशी तजवीज कर. ”

## मॅकिॲव्हेलीचे सत्‌शिष्य.

वरील मजकुरावरून कंपनीच्या नोकरांची कूट कारस्थानवृत्ति ध्यानीं येईल. ओरिसा प्रांत घेतांना आपल्या लष्करी सामर्थ्यापेक्षां आपल्या बुद्धिभेदाच्या नीतीवरच गव्हर्नर जनरलची जास्त भिस्त होती. मराठी सत्तेच्या जुलुमाखालीं ओरिसाची प्रजा गांजून गेली होती. तिची त्यांतून सुटका करण्यासाठीं त्या प्रजेचे मित्र म्हणून इंग्रज ओरिसांत शिरले! विजेते म्हणून नाहीं ! !

प्रसिद्ध पाश्चात्य कुटिलनीतिपटु मॅकिॲव्हेली यानें असें म्हटलें आहे कीं,

“ The sagacious politicians will always respect religion, even if he, have no belief in it, since there have been frequent proofs that through inculcating it even by craft, much valour has been roused for the defence of the country.”

या मॅकिॲव्हेलीच्या नीतीचा बरोबर पुरस्कार इंग्रजांनीं जगन्नाथाच्या बाबतींत केला. तो पुढें म्हणतो,

“ Men are all the readier to throw themselves into your arms, the less you appear disposed to compel them, and the more you show yourself humane and familiar with them, the less they dread you as regards their liberty.”

या मॅकिॲन्हेलीच्या उक्तीप्रमाणें गव्हर्नर जनरलानें आपल्या लोकांस हुकूम देऊन ओरिसांतील सरदार, जमीनदार व इतर लोक यांना फोडण्याबद्दल लिहिलें व ही त्याची नीति कल्पनेबाहेर यशस्वी झाली.

## भोसल्यांचें इंग्रजांशीं सख्य

**शिवभट साठे** यांच्यानंतर **राजाराम मुकुंद** यांना कटक प्रांताच्या सुभेदारीवर नेमण्यांत आलें होतें. त्यांचा मृत्यु स. १७९२ च्या सुमारास झाला. त्यांच्या मृत्यूनंतर त्या प्रांताचा कारभार सुरळीत चालला होता. परंतु स. १८०१ च्या सुमारास तेथील किल्लेदारानें बंड करून किल्ला व कटक आपल्या ताब्यांत घेतलें. या सुमारास **सेनाधुरंधर व्यंकाजी भोसले** श्रीजगन्नाथाच्या यात्रेला गेले असतां त्यांनीं तें बंड मोडलें व **बाळाजीपंत कोन्हेर** यांच्या विद्यमानें बाराबत्तीच्या किल्लेदारीवर **अमृतराव ढगे** यांस नेमलें व कटक प्रांताचा सुभा **व्यंकाजी सखदेव** यांजला दिला.

येथपर्यंत इंग्रज, भोसल्याच्या वाटेस गेले नाहींत. **इंग्रज, मराठे** व **निजाम** यांनीं **टिपूवर** स्वारी करण्याचें जेव्हां ठरविलें तेव्हां कटक राज्यांतून आपल्या सैन्यास बिनहरकत जाऊं देण्याबद्दल बोलणें करण्यासाठीं कलकत्त्याहून कोलब्रुक नांवाचा वकील **नागपुरास** गेला. त्याला हवी असलेली सवलत दुसरे **रघोजी** यांनीं दिली व इंग्रजांच्या दरबारीं **कलकत्त्यास, बगाजी रघुनाथ** नांवाचा आपला वकील पाठविला. या **बगाजी रघुनाथाच्या** सच्चेपणाबद्दल त्या वेळीं नागपूर दरबारांतच दुमत होतें. वेळप्रसंगीं हा आपल्या धन्याचा घात केल्याखेरीज राहणार नाहीं, अशी कांहीं लोकांची कल्पना होती व त्यानंतर जे प्रकार झाले, त्यावरून लोकांची ही कल्पना सर्वांशीं चुकीची असावी असें म्हणवत नाहीं. कारण त्याखेरीज

त्यावेळीं दुसऱ्या मराठा-युद्धाची तयारी इंग्रज जोरानें करीत असतां **बगाजी रघुनाथास** त्याची दाद नमावी व असल्यास त्यानें आपल्या धन्यास इंग्रजी कारस्थान कळवूं नये यांतील अर्थ उलगडत नाहीं!

वस्तुतः कलकत्त्याहून समुद्रमार्गें **मद्रासला टिपूवर** सैन्य नेणं सुगम असतां, कटकमार्गें ते नेण्याचा इंग्रजांचा हेतु कांहीं तितका **शुद्ध** नव्हता. या वेळीं स्नेहभावाचा फायदा घेऊन ओरिसांतून सैन्य नेण्यांत त्या मुलुखाची युद्धाच्या दृष्टीनें पाहणी करण्याचा इंग्रजांचा हेतु होता. तो सेनासाहेब सुभा यांस समजला नाहीं व त्याचा अत्यंत घातुक असा परिणाम थोड्याच काळांत त्यांस भोगावा लागला.

## रघूजींचा लक्ष्य-भेद.

दुसरें मराठी युद्ध **शिंदे-भोसले व इंग्रज** यांमध्यें झालें. परंतु इंग्रजांनीं युक्तीनें **दौलतरावाला** त्यांतून बाजूला काढला व **रघुजींची** इच्छा नसतांहि त्यांस त्यांनीं युद्धप्रवृत्त केलें व त्यांस तिकडे युद्धाच्या नादीं लावून इकडे चोर-पावलानें **ओरिसावर** घाला घातला. **भोसले गाविलगड** लढविण्यांत गर्क झाले आहेत अशी संधि पाहूनच इंग्रजांनीं **ओरिसावर** प्रहार केला व मराठे सरदारांत माजलेली दुफळी पाहून एकट्यानें त्यांच्याशीं तोंड देणें परवडणार नाहीं, अशी खात्री झाल्यावर, भोसल्यांनीं **ओरिसा**, देवगांवच्या तहानें इंग्रजांच्या हवालीं केला.

**गाविलगडचें** युद्ध सुरू असतांच इंग्रजांनीं ओरिसावर स्वारी केली. तेथेंही आपण तोंड द्यावें अशी **रघूजींची** इच्छा होती. काय होईल तें होवो आपण तोंड द्यावेंच असा सल्ला **श्रीधर लक्ष्मण मुनशी** यानेंही दिला. परंतु **कृष्णराव माधव चिटणवीस** यांनीं या प्रसंगीं युद्ध करण्यानेंच जास्त नुकसान होईल असा सल्ला दिला व

त्याप्रमाणें रघुजींनीं युद्धाचा बेत तहकूब केला. त्यामुळें कटक येथें बाराबत्ती किल्ला, अमृतराव ढगे यांनीं नेटानें लढविला तरी त्यांस बाहेरून मदत न झाल्यानें अखेर त्यांस व व्यंकाजी मखदेवांस माघार खावी लागली.

## आक्रमणास सुरवात

ता. ८ सप्टेंबर १८०३ रोजीं ले. कर्नल हारकोर्ट हा गंजमहून सैन्य घेऊन निघाला व त्यानें माणिकपट्टम् व जगन्नाथपुरी हीं दोन्ही शहरें ता. १८ सप्टेंबर १८०३ ला विनायासें हस्तगत केलीं. काणिकनीतीचा जय झाला.

या ओरिसाच्या स्वारीला मदत करण्यासाठीं म्हणून कलकत्त्याहून कॅ. मॉर्गन व ले. ब्रॉग्टन बालासोरला येण्यासाठीं निघाले. या सैन्याच्या अधिपतीनेंहि त्याच नीतीचा अंगीकार केला होता. हें सैन्य बालासोर जवळ उतरलें तेव्हां त्याच्याजवळ अन्नसामग्री कांहींहि नव्हती, ती बालसोरचा जमीनदार मल्हाद नाईक यानें पुरविली. तेथील इंग्रज सैन्य नदीकांठानें पुढें सरकूं लागतांच बालीघाट येथें मराठी घोडदळानें त्याजवर हल्ला केला; परंतु त्यांत अखेर मराठ्यांना यश न येतां ता. २१ सप्टेंबर १८०३ रोजीं बालासोर पडलें.

## कटक काबीज केलें.

ले. कर्नल हारकोर्ट यानें जगन्नाथ घेतल्यावर तो कटक शहराकडे सरकूं लागला. वाटेंत मराठी सैन्यानें त्याजवर एकसारखे छापे घालण्याचें काम सुरूं ठेवलें होतें. नुकताच महापूर येऊन गेल्यानें सर्वत्र पाणी व चिखल झालेला होता. मुकंदपूर येथें मराठ्यांची व इंग्रजांची बरीच लढाई झाली, पण त्यांत अखेर मराठ्यां-

नाच हार खावी लागली. अखेर ता. १० आक्टोबर १८०३ रोजीं कटक शहरहि काबीज करण्यांत आलें.

कटक शहराला लागून बाराबत्ती नांवाचा किल्ला होता. तो किल्ला मराठी सैन्यानें मोठ्या मर्दुमकीनें लढविला. इंग्रजांना प्रत्येक पाऊल लढून घ्यावें लागलें. तो किल्ला चांगला बलिष्ठ असा नांवाजलेला असून, कांहीं देशद्रोह्यांच्या मदतीनें अखेरीस इंग्रजांच्या हातीं लागलाच. कटक हें ओरिसाच्या राजधानीचें शहर इंग्रजांनीं घेतलें तेव्हांच जवळ जवळ सर्व ओरिसा प्रान्त त्यांच्या ताब्यांत गेल्यासारखा झाला होता.

कॅ. मॉर्गन यानें बालासोर घेतल्यानंतर तो कटककडे येऊं लागला. परंतु बालासोरपासून वीस मैलांवर सोरोह नांवाचें एक ठाणें होतें तेथें मराठ्यांचें थोडें लष्कर होतें, त्याला हुसकून लावल्याखेरीज कटकशीं दळणवळण होणें शक्य नव्हतें; म्हणून प्रथम तो त्या मराठी सैन्यामागें लागला व ता. ३१ आक्टोबर रोजीं मोठ्या लढाईनंतर तेंहि ठाणें इंग्रजांनीं घेतलें.

अशा रीतीनें इंग्रजांनीं फारशी लढाई न करतां अल्पावधींत सर्व ओरिसा प्रान्त हस्तगत केला. तरी त्यांतील मयूरभंज संस्थान अद्याप त्यांच्या ताब्यांत आलें नव्हतें. त्यावेळीं तेथील राणीनें नुकताच एक दत्तक घेतला होता. या संस्थानशीं मिळतें घेऊन सर्व ओरिसा एकरंगी करावा अशी इंग्रजांची इच्छा होती. तेव्हां त्यांनीं मयूरभंज भागांत शांतता प्रस्थापित करण्यासाठीं पलटणी पाठविल्या. त्या हरीहरपूरपर्यंत पोहोंचल्या. राणीच्या वकिलाशीं अत्यंत गोडीनें व सन्मानानें वागावें अशी इशारत अधिकाऱ्यास देण्यांत आली होती. परंतु 'ब्रिटिश सरकारला बंधनकारक होईल, असें कसलेंहि वचन

देऊं नये ' असेंहि त्यास सुचविण्यांत आलें होतें. अशांतच भेदनीतीनें मयूरभंजचा कांहीं भाग कंपनीनें आपल्या ताब्यांत घेतला.

ता. १२ जानेवारी १८०४ रोजीं **संबलपूर** हस्तगत करण्यांत आलें व त्याबरोबर **ओरिसांतील मराठी** सत्ता नामशेष झाली. इंग्रजांनीं **ओरिसा** प्रांत जिंकून घेतला असें म्हणण्यापेक्षां केवळ कुटिल नीतीच्या बळावर तो घेतला असेंच म्हणणें युक्त आहे, हें वरील हकीकतीवरून लक्षांत येईल.

या भूमीचे अवघ्या १२५ वर्षांपूर्वीं **आपण धनी** होतों याचा अभिमान मराठ्यांस वाटल्यावांचून राहाणार नाहीं. पं. **भास्कर रामाचा** मुसलमानांनीं अत्यंत नीचपणें वध केला, तरीहि **ओरिसा**-वरील मराठी सत्ता अढळ राहिली व **शिवभट साठे, अमृतराव ढगे** यांसारखे **महाराष्ट्रीय** गव्हर्नर या **ओरिसा** प्रान्ताचे होते, ही गोष्टहि महाराष्ट्रीयांस कमी अभिमानाची खास वाटणार नाहीं !

---

# प्रकरण तिसरें

—:❀:—

# मराठी साम्राज्य कोणीं बुडविलें ?

बंगाल आत्मसात् करून इंग्रजांनीं मुसलमानांच्या दिल्लीच्या राज्याचें पाणी जोखलें. वास्तविक या काळीं दिल्लीची पातशाही म्हणजे मराठ्यांचें एक मांडलिक संस्थान होतें. त्यामुळें खुद्द दिल्लीवाल्यांचा दरारा पूर्वींसारखा राहिला नव्हता. त्याचा फायदा इंग्रजानीं घेतला. पुढें, हिंदुस्थानचें साम्राज्य जे आपल्या बोटावर नाचवीत होते त्या मराठ्यांशीं प्रसंग आला. पण त्या वेळीं मराठ्यांची सद्दी जोरांत असल्यानें इंग्रज त्यांच्या वाटेस गेले नाहींत. योग्य संधि येईपर्यंत त्यांनीं वाट पाहिली. ती संधि येतांच मराठ्यांचेंहि पाणी जोखण्यासाठीं त्यांनीं ओरिसाचें राजकारण करून तो प्रांत दाबला. यावेळीं मराठी साम्राज्य घसरणीस लागलें होतें. त्यामुळें या आगळिकेचा प्रतिकार त्यांच्यानें झाला नाहीं. त्याचा फायदा मानून त्या साम्राज्यांतील प्रमुख प्रमुख सरदारांना फोडून शेवटीं मुख्य सत्तेचा ग्रास कंपनीनें मोठ्या चतुराईनें घेतला. ती कथा या प्रकरणांत वर्णिली आहे.

## आत्मैव रिपुरात्मनः ।

### हें संशोधन प्रथम पाहिजे.

स्वराज्यसंपादनासाठीं हल्लीं भारतवर्षांत झगडा सुरू झाला आहे. हा झगडा लढत असतांना आपण भारतवर्षीयांनीं स्वराज्य गमावलें कसें, याचें शोधन प्रथम करावयास पाहिजे व असें संशोधन केल्यानंतर आपलें स्वराज्य गमावयास काय कारणें झालीं, आपणांत दोष कोणते होते, उणेपणा कोणता होता, याचें परिशीलन करून ते दोष, तो उणेपणा नष्ट करावयास पाहिजे; तरच हल्लींच्या स्वराज्याच्या लढ्यांत आपणांस यशाची आशा आहे.

इतिहासानें जे अनुभव नमूद करून ठेवले आहेत, त्यांचा योग्य तो उपयोग करून घेतला तरच इतिहासाविषयीं आपण आपलें कर्तव्य योग्यप्रकारें बजावलेंसें होणार आहे.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें मराठ्यांच्या इतिहासाकडे वाचकांचें लक्ष वेधण्याचा या लेखाचा हेतु आहे. परंतु **मराठ्यांच्या** इतिहासाचें निरीक्षण करण्यापूर्वीं विहंगमदृष्टीनें आपण भारतवर्षाच्या इतिहासाकडे प्रथम पाहूं व तेथें सामान्यपणें काय ठळक गोष्टी दिसतात त्या अवलोकन करूं.

## मला काय त्याचें !

प्रथमतः आपण उत्तरेकडे दृष्टि टाकली तर एका काळीं केवळ हिंदु संस्कृतीनें नटलेल्या या **भारतवर्षांत** अन्य संस्कृतीनें आपला पसारा मांडलेला दिसतो. **गांधार** ( आजचा **अफगाणिस्थान** ) **हा देश** अस्सल **हिंदूंचा** असतां ज्यावेळीं परधर्मीयांनीं त्यावर स्वाऱ्या केल्या त्यावेळीं तेथील वीर्यवान् हिंदु संतांनीं स्वधर्म व स्वातंत्र्यरक्षणासाठीं प्रचंड आत्मोत्सर्ग केला, परंतु इतर हिंदु प्रांतांनीं त्यांना या कामीं साहाय्य न केल्यानें अखिल **गांधार** हिंदु संस्कृतीस पारखा झाला.

**सिंधप्रांतांत** दाहीर राजावर **महंमद कासीमनें** स्वाऱ्या केल्या, त्याप्रसंगीं आसमंत भाग हिंदु संस्कृतीच्या अभिमान्यांनीं गजबजलेला असतां दाहीरच्या साहाय्यार्थ एकहि हिंदु राजा धांवून गेला नाहीं ! **अलेक्झांडरची** वावटळ थोपविण्यासाठीं **पोरस** दंड ठोकून उभा असतां इतर हिंदु राजे स्वस्थपणें मजा पाहत बसले. महाराजा **पृथ्वीराज** यानें **महंमद घोरीचा** एकामागून एक असा नऊ वेळां पराभव करून, हिंदु संस्कृतीला अनुरूप अशा उदारतेनें त्याला

प्राणदान देऊन सोडून दिलें; परंतु हिंदु संस्कृतीशीं कृतघ्न झालेल्या कांहीं हिंदू राजांच्या साहाय्यानें अखेरीस महाराजा **पृथ्वीराज** यांना गिरफदार करून नेलेलें याच हिंदू राजांनीं पाहिलें; प्रतिकारार्थ एक बोटहि उभारलें नाहीं.

स्वातंत्र्यसंपादनार्थ सिराजनें अट्टाहास चालविला असतां त्याचाच जातभाई **मिरजाफर** यानें **इंग्रजांस** मदत करून प्लासी बुडविली ! अशा प्रकारचीं भारतवर्षाच्या इतिहासांत एकसारखीं दृश्यें जीं दृष्टीस पडतात, त्याची पुनरावृत्ति मराठ्यांच्या इतिहासांत कां होऊं नये ! मराठ्यांच्या इतिहासांत त्यांची नुसती पुनरावृत्तीच झाली नाहीं तर सुधारून वाढविलेली आवृत्ति निघाली व ती कशी आणि मराठी साम्राज्य कसें बुडालें, हें येथें थोडक्यांत निवेदन करण्याचें योजिलें आहे.

मराठी सत्तेच्या ऱ्हासाचा इतिहास म्हणजे **मराठे** व **इंग्रज** यांच्या झगड्याचा इतिहास होय. **इंग्रजांनीं हिंदुस्थानांत** सत्ता प्रस्थापित केली ती मराठी सत्ता मोडून केली; किंबहुना मराठी सत्तेच्या रक्षेवर **इंग्रजांनीं** आपल्या सत्तेचें भव्य मंदिर उभारलें असें म्हणणें अयथार्थ होणार नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाचें हल्लीं संशोधन सुरू आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहेच. परंतु हें संशोधनकार्य ब्रिटिशसंबंधपूर्वकालाचें होत आहे. **ब्रिटिशांचा** व **मराठ्यांचा** संबंध येऊं लागल्यानंतरच्या काळाचें जितकें संशोधन व्हावयास पाहिजे तितकें झालेलें नाहीं. तें होऊन त्याचा आस्थेवाईकपणें अभ्यास व्हावयास पाहिजे. आजचा आपला स्वराज्याचा झगडा **इंग्रजांशींच** असल्यानें या काळाच्या इतिहासाचें सांग संशोधन झाल्यास मार्गदर्शक अशा अनेक गोष्टी बाहेर येऊन,

त्यामुळें आज चाललेल्या स्वातंत्र्याच्या चळवळीस एक प्रकारें साहाय्यच होणार आहे. असो.

## मराठी सत्तेचे कालखण्ड.

मराठी सत्तेच्या ऱ्हासाचा इतिहास पाहूं लागतांना एकंदर मराठी सत्तेच्या काळाचे आपणास कालखंड पाडावे लागतील. विद्वद्वर्य श्री. न. चिं. केळकर यांनीं **मराठे व इंग्रज** हें अमूल्य पुस्तक लिहिलें. त्यांत त्यांनीं पुढीलप्रमाणें चार कालखंड पाडले आहेत व ते सर्वांशीं ग्राह्य असेच आहेत. ते कालखण्ड असे—

१६४८ ते १७६१ पर्यंतचा काळ; मराठी सत्तेचा उदय.
१७६१ ते १७८६ मराठी सत्तेचा विकास.
१७८६ ते १८०० मराठी सत्तेचा उत्कर्ष व
१८०० ते १८१८ मराठी सत्तेचा अध:पात. या चार कालखण्डांच्या आवरणांत सर्व मराठी इतिहास सामावला आहे. मराठी सत्ता अखेर बुडाली इंग्रजांच्या हातून, या दृष्टीनें या इतिहासाकडे पाहिलें असतां आपणास अनेक दृश्यें—मनोरम अशीं दृश्यें—दृष्टीस पडतात.

इंग्रजी सत्तेचा उत्कर्ष कसकसा होत गेला व मराठ्यांशीं त्यांचा संबंध कसकसा आला या गोष्टी इतिहासज्ञांस माहीत आहेत. वरील कालखंडांत इंग्रजांचा मराठ्यांशीं संबंध आला तो अनुक्रमें भीति, आदर, स्नेह व अखेरीस धनीपणा अशा नात्याचा आला. पानिपतांत मराठ्यांचा मोड झाल्यानंतर इंग्रजांच्या मनांत मराठ्यांविषयीं जी भीति होती ती नष्ट झाली. तथापि मराठ्यांनीं पानिपतावर झालेला अपमान भरून काढला. त्यामुळें मराठी कारभारांत इंग्रजांना ढवळाढवळ करण्यास मुळींच अवसर मिळाला नाहीं व ही

स्थिति **नाना फडणीस** मंत्री होते तोंपर्यंत टिकली. परंतु इंग्रजांनीं मराठ्यांच्या राज्यांत फारशी ढवळाढवळ केली नाहीं, तरी इतरत्र त्यांनीं आपली सत्ता पसरविण्याचें काम झपाट्यानें चालविलेंच होतें व एकदां तर खुद्द **पुणें** नगरीवर हल्ला करण्याचें धाष्टर्य त्यांनीं केलें. त्यावेळीं त्यांना कसा मोबदला मिळाला या गोष्टी लोकविश्रुत आहेत. अशा स्थितींतहि मराठी राजकारणांत हात शिरकविण्याविषयीं डोळ्यांत तेल घालून ते बसले होते व त्यांच्या सुदैवानें त्यांना त्या काळीं हिंदी राजकारण खेळण्याला योग्य असे धूर्त मुत्सद्दी लाभलेहि होते.

## धूर्त इंग्रज मुत्सद्दी

**हिंदुस्थानांत** इंग्रजी राज्य प्रस्थापित करणारे जे प्रमुख इंग्रज मुत्सद्दी होते त्यांत **वेलस्ली, हेस्टिंग्ज** व **डलहौसी** या त्रयीचा प्रामुख्यानें निर्देश केला जातो. हिंदुस्थानांत माजलेली बजबजपुरी, परस्परांविषयीं असलेलें वैमनस्य, आत्यंतिक द्वेष, आपसांतील कलह मोडण्यासाठीं परकीयांचें सहाय्य घेण्याची प्रवृत्ति, स्वार्थसाधुता या गोष्टींचा पुरापूर फायदा वरील त्रयीनें घेतला व त्यांच्या सुदैवानें **मालकम, एल्फिन्स्टन, टॉड** यांसारखे त्यांना हस्तक लाभल्यानें त्यांचा हेतु त्यांच्या कल्पनेपेक्षांही अधिक सफल झाला. याच्या उलट हिंदी लोकांची स्थिति होती.

देशाभिमानाचा पूर्ण अभाव, स्वतःचें महत्त्व वाढविण्याची आत्यंतिक लालसा व स्वजनद्रोह यांचें **हिंदुस्थानाइतकें** विपुल पीक जगांतील अन्य देशांच्या इतिहासांत क्वचितच आढळेल. **भारतवर्षाच्या** इतिहासांत सहस्रावधि भारतीय रमणींनीं केवळ स्वाभिमान व जातिगौरव संरक्षणासाठीं अनेक वेळां जोहार करून आत्म-

समर्पण केलें, त्यांचें आत्मतेज कोणीकडे ! व आपल्या क्षुद्र स्वार्था-साठीं मातृभूमीशीं निमकहराम बनून शत्रूंना आपल्या हातानें घरांत घेणाऱ्या देशद्रोह्यांचा आत्मघातकीपणा कोणीकडे ! हिंदुस्थानचा बहुतेक इतिहास अशाच कृष्ण कृत्यांनीं बरबटलेला आहे.

मराठी साम्राज्यसंस्थापक छत्रपती श्रीशिवाजीमहाराजांचा जन्म होण्यापूर्वींच इंग्लिशांचें हिंदुस्थानांत आगमन झालें होतें. त्यावेळीं इंग्लिशांना हिंदुस्थानांत कार्डीचेंहि महत्त्व नव्हतें, तरी देशां-तील कानाकोपऱ्यांतून राहून ते स्वहितसाधनास दक्ष असत व हिंदुस्थानांतील राजकीय उलाढालीकडे त्यांचें पूर्ण अवधान असे. शिवाजी महाराजांनीं स्वराज्यसंस्थापना केलेली त्यांनीं पाहिली, तिचा विस्तार अवलोकिला, त्यांच्या मृत्यूनंतर मराठी राज्यावर मोंगलांनीं घातलेला प्रचंड आघातहि त्यांनीं पाहिला व त्यांतूनहि शीरसलामत राखून मराठ्यांनीं मोंगलांशीं टकरा देऊन आपलें आसन दृढ केलें, तो रोमहर्षण प्रसंगहि त्यांनीं अवलोकिला, आणि लाहोरपासून कन्याकुमारीपर्यंतचें राजकारण मराठ्यांनीं एकसूत्रांत चालविलेलेंहि त्यांनीं पाहिलें. अवघ्या एका शतकामध्यें हिंदुस्थानभर मराठा स्वार डौलानें व बेगुमानपणानें नाचतांना त्यांच्या दृष्टीस पडला. अशा रीतीनें मराठी राज्याच्या जन्मापासून त्याचा विस्तार कस-कसा होत गेला या गोष्टी धोरणी इंग्रजांनीं पाहिल्या.

## इंग्रजी सत्तेचा विकास.

परंतु या अवधींत इंग्रज व्यापारीहि स्वस्थ बसले नव्हते. सर टॉमस रो पासून हिंदुस्थानांत जे जे इंग्रज आले ते अत्यंत महत्त्वा-कांक्षी असून त्यांच्यांत स्वार्थ असला तरी तो आपल्या राष्ट्रहित-वर्धनाच्या कामाकडे लावण्याची सर्वांचीच प्रवृत्ति होती. त्यांनीं

व्यापाराबरोबरच आत्मसंरक्षणार्थ म्हणून प्रथम फौजा बाळगण्यास सुरवात केली. पुढें त्या फौजा इतर देशी राजांना मदत करण्याच्या कामासाठीं देण्यांत येऊं लागल्या; दोन देशी राजांमध्यें भांडणें सुरू असतां त्यांपैकीं एकानें इंग्रजांसारख्या अगदीं परस्थ लोकांकडे साहाय्यार्थ याचना करावी, या स्वाभिमानशून्यतेंतच देशी राजांचें मरण आहे हें धूर्त **इंग्रजांनीं** ओळखून ठेवलें व अशी संधि मिळाली तेव्हां त्याचा त्यांनीं पुरा फायदा कसा घेतला, ही गोष्ट **बंगालचा** इतिहास स्पष्टपणें सांगतो व जी गोष्ट **बंगालची** तीच इतर ठिकाणची.

मराठी सत्तेच्या विकासाच्या काळांतच इंग्रजी सत्ता प्रस्थापित होऊं लागली होती व नंतर एक काळ असा आला कीं, **हिंदुस्थानांत** महत्त्वाकांक्षी व विजिगीषु अशा दोनच म्हणजे मराठ्यांची व **इंग्रजांची** सत्ता नांदूं लागल्या, तेव्हां सहजच त्यांचें घर्षण होण्याचा प्रसंग प्राप्त झाला. उत्तरेस **अयोध्येचा** नबाब, **भरतपूरचे** जाठ, दक्षिणेस **निजाम,** यासारखे खंदे योद्धे होते तोंपर्यंत **इंग्रजांची** कर्तबगारी मर्यादित क्षेत्रांतच वावरत असे. परंतु **हिंदुस्थानांतील** कर्तबगार पुरुष एकामागून एक नष्ट होऊं लागले. त्यांच्या जागा भरून काढण्यास त्यांच्या तोलाचे पुरुष उत्पन्न न झाल्यानें धूर्त, कावेबाज व स्वार्थसाधू **इंग्रजांचें** चांगलेंच फावलें. **मराठ्यांचा** व **इंग्रजांचा** घासाघाशीचा प्रत्यक्ष प्रसंग आला, त्यावेळीं इंग्रजांखेरीज अन्य अशी एकटी प्रबल सत्ता मराठ्यांचीच राहिली होती व बाकीचे राजे कांहीं इंग्रजांच्या व कांहीं मराठ्यांच्या कच्छपीं लागले होते. **इंग्रजांनीं** धूर्तपणें योजिलेल्या Subsidiary System च्या पाशांतहि निजामसारखे कांहीं राजे सांपडले.

## गृहकलहांत परकीयांना घेतलें !

इंग्रजांना प्रतिस्पर्धी व त्यांच्या कारस्थानास वेळोवेळीं व्यत्यय

आणणारी प्रबल सत्ता मराठ्यांची असल्यानें, मराठी राजकारणांत आपला हात शिरकवावा असे प्रयत्न इंग्रज व्यापाऱ्यांनीं सुरू केले. नानासाहेब पेशव्यांनीं कान्होजी आंग्र्यांचें बण्ड मोडण्यासाठीं इंग्रजांची प्रथम मदत घेतली. त्यावेळीं पेशवे जोरावर असल्यानें मराठी राजकारणांत त्यांचा हात न शिरला तरी त्यांच्या सामर्थ्यांत व त्यांच्या मुत्सद्दीपणांत वैगुण्य कोठें आहे, हें मात्र इंग्रजांनीं जाणलें व त्या दृष्टीनें मराठी राज्यांत बोट शिरकविण्याचा त्यांचा प्रयत्न सुरूं झाला.

मराठी सत्तेचाच काय, परंतु हिंदुस्थानांतील परवशतेचा इतिहासच असा आहे कीं, आपल्या क्षुद्र स्वार्थासाठीं स्वातंत्र्याची होळी करणारे अनेक अधम या भूमींत निर्माण झाले आहेत. तसाच प्रसंग पेशवाईतील राघोबादादानें मराठी सत्तेवर आणला. आपला स्वार्थ साधण्यासाठीं त्यानें इंग्रजांची मदत मागितली व मराठी सत्तेंत ढवळाढवळ करण्याची आलेली सुवर्णसंधि त्यांनींहि न दवडतां राघोबास मदत देऊन त्यास पेशवाईवर अधिष्ठित करण्याची हमी पत्करली; परंतु इंग्रजांस अनुकूल असा काळ अद्याप उगवला नव्हता. मराठी सत्तेचे कर्णधार नाना व महादजी यांसारखे चतुर मुत्सद्दी असल्यानें, त्यांनीं इंग्रजांचा वडगांव मुक्कामीं खरपूस समाचार घेऊन त्यांना दातीं तृण धरून शरण आणलें. राघोबास आपल्या स्वाधीन करून घेतलें व जोंपर्यंत नाना व महादजी ही जोडी विद्यमान होती तोंपर्यंत मराठी राज्याकडे वांकडी नजर करून पाहण्याची छाती इंग्रजांची झाली नाहीं.

परंतु जो गोष्ट राघोबाच्यानें साधली नाहीं ती त्याचे चिरंजीव बाजीराव यांनीं केली. ज्या संधीची इंग्रज डोळ्यांत तेल घालून वाट पाहात होते, ती संधि बाजीरावाच्या चंचलपणानें व नादानपणानें

विनायासें इंग्रजांना साधली. यशवंतराव होळकराच्या भयानें बाजीराव, पुणें सोडून इंग्रजांच्या आश्रयार्थ गेला व तेथें त्यानें डिसेंबर ३१ स. १८०२ रोजीं सुप्रसिद्ध वसईचा तह करून इंग्रजांची सब्सिडियरी पद्धत स्वतःवर लादून घेतली; अशा रीतीनें इंग्रजांचा पाया मराठी राजकारणांत जो घुसला तो कायमचा घुसला.

## वसईचा नामुष्कीचा तह.

हा तह बाजीरावानें केला तो अडचणींत सांपडल्यानें केला. या तहामुळें मराठी सत्तेला मोठाच कलंक लागल्याकारणानें, हा तह मानण्यास मराठी साम्राज्याचे धनी व इतर आधारस्तंभ मुळींच बांधले गेले नव्हते. वडगांवच्या लढाईंत इंग्रजांचा सपशेल पराभव झाल्यानंतर, कंपनीच्या सहीशिक्क्यानिशीं इंग्रजांनीं करून दिलेला तह इंग्रजांनीं पाळण्याचें नाकारलें व पेशव्यांचा वकील सेवकराम याला तर वॉरन हेस्टिंग्जनें चक्क सांगितलें कीं, “ पेशवे सरकारनीं कंपनीच्या अधिकाऱ्यांस कैद करून घेतलेले करार इंग्रजांच्या मोठेपणास कमीपणा आणणारे आहेत व ते त्यांनीं अडचणींत सांपडून आमच्या परवानगीशिवाय निरुपायानें लिहून दिले असल्यानें, ते करार आम्हांस मुळींच संमत नाहींत. ” अर्थात् बाजीरावांवर राज्य बुडविण्याचा आरोप करणारांनीं, मराठी साम्राज्याचे धनी साताराचे महाराज यांनीं तो तह मान्य कां केला, धुडकावून कां दिला नाहीं व बाजीरावास पदच्युत करून त्या जागीं अन्य कर्तबगार इसम कां बसविला नाहीं, याचा विचार करावयास पाहिजे. स्वतःच्या स्वार्थाकरितां, धन्यास बंधनकारक असें वचन नोकरानें दिल्यास तें पाळण्यास धनी बांधलाच जातो असें नाहीं; असो.

अशा रीतीनें बाजीरावास अडचणींत गांठून त्याजकडून

आपल्यास पाहिजे तसा करार इंग्रजांनीं करून, त्यास पुण्यास आणून गादीवर बसविलें. परंतु ही गोष्ट शिंदे, होळकर या मराठा दौलतीच्या आधारस्तंभांस सहज मानवली नाहीं. आपणास हा तह पसंत नाहीं असें शिंदे–होळकरांनीं जाहीर केलें व खुद्द दौलतराव शिंद्यानें पुण्यास येऊन तेथेंच आपलें आसन ठोकलें. शिंद्यासारख्या फौजबंद सरदाराशीं उघड सामना देण्याचें इंग्रजांस त्यावेळीं इष्ट न वाटल्यानें, त्यांनीं यशवंतराव होळकराकरवीं शिंद्यांच्या राज्यावर हल्ले करविण्यास सुरवात केली; त्याबरोबर शिंद्यास पुण्याहून उठून उत्तर हिंदुस्थानचा रस्ता धरावा लागला.

## आत्मैव रिपुरात्मनः ।

दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, त्यावेळीं इंग्रजांच्या बाजूनें वेल्स्ले, एल्फिन्स्टन, होस्टिंग्ज, माल्कम, टॉड, कॉलिन यांसारखे एकापेक्षां एक धूर्त मुत्सद्दी असून मराठ्यांचा किंबहुना देशी राजांच्या बाजूला एकहि स्वहितदक्ष असा मुत्सद्दी नव्हता. सर्वत्र स्वार्थी लोकांचा बुजबुजाट झाला होता. यासंबंधानें मेजर बसू म्हणतातः—

The Britishers could not have acquired political Supremacy in India but for the help they received from traitors amongst Indians. Why India reeks with traitors is a problem for consideration. It has been lack of patriotism which to some extent accounts for it. Then want of forethought, foresight, and above all, desire for self aggrandizement have been the principal factors in the production of traitors amongst us.

शिंदे विरुद्ध होळकर, होळकर विरुद्ध नागपूरकर भोसले, असे चमत्कार इंग्रजांनीं घडवून आणले. मराठी सत्ता कमकुवत झाली. तिला एक जोराचा धक्का मिळतांच ती कोसळून पडणार अशी अवस्था प्राप्त झाली.

आपण आपसांत भांडल्यानें दुसऱ्यांना फावतें हा बुद्धिवाद यशवंतराव होळकराला सुचला, पण तो इतक्या उशिरां सुचला कीं, त्यावेळीं त्याचा कांहींच उपयोग होणारा नव्हता. अखेर अत्यंत निराश होऊन त्या स्वाभिमानी पुरुषास वेड लागलें व त्यांतच त्याचा अंत झाला.

**दौलतराव शिंद्यास पुण्यांतून** हालविल्यानंतर इंग्रजांनीं आपल्या कारवाईस सुरवात केली. परंतु यापुढील इतिहास सांगण्यापूर्वीं **युरोपांत इंग्लंडची** काय अवस्था झाली होती ती पाहिली पाहिजे, म्हणजे तीवरून इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील कारवायांवर जास्त प्रकाश पडेल.

## युरोपांतील तत्कालीन स्थिति

या काळच्या सुमारास **युरोपांतील** सर्व सिंहासनें गदगदां हालून तेथें **नेपोलियनची** एकछत्री सत्ता प्रस्थापित झालेली होती. त्याच्या स्वाधीन झाला नव्हता फक्त **इंग्लंड**. नेपोलियनचें खुष्कीवर अमर्याद सामर्थ्य असलें तरी समुद्रावर **इंग्रजांचीच** अनिर्बंध सत्ता चालत असे. तेव्हां इंग्लंडची गळचेपी करण्यासाठीं म्हणून त्यानें सुप्रसिद्ध **‘ बर्लिन डिक्री ’** काढिली. या डिक्रीप्रमाणें **युरोपांतील** कोणत्याहि देशाच्या कोणत्याहि बंदरांत **इंग्रजांचे** व्यापारी जहाज माल नेण्यास अगर देण्यास आलें तर तें जप्त करण्यांत यावें असें जाहीर झालें. त्यामुळें **इंग्रजांचा युरोपांतील** व्यापार बसला व युरोपांतील देशांतून त्यांना अन्नसामग्री पुरेशी मिळेनाशी झाली.

**नेपोलियननें** ही जी व्यापारीबंदी केली, तिची कोंडी फोडून इंग्रजी माल खपविण्यास इंग्रजांना स्वतःचा असा बाजार हवा होता. शिवाय नेपोलियनाविरुद्ध युरोपांतील राजेरजवाडे उठविण्यासाठीं

त्यांना चारण्यास मुबलक पैसा पाहिजे होता. या सर्व गोष्टींना योग्य असें क्षेत्र त्यांना हिंदुस्थान आढळलें. इंग्रजांनीं हिंदुस्थानांतील व्यापारधंदा बुडविला तो विशेषत: या काळांत. हिंदुस्थानांतील कच्चा माल नेऊन हिंदी बाजारपेठा विदेशी मालांनीं भरण्यास सुरवात झाली तीहि याच काळांत. इंग्रजांच्या सुदैवानें त्यांचे हेतु पूर्णपणें साध्य करणारे, कुटिल नीतींत अत्यंत विशारद असे मुत्सद्दीही त्यांना लाभले व त्यांनीं आपलें काम नीति अनीति, पाप पुण्य, कशाचीहि पर्वा न करतां साध्य केलें. शिवाय त्यावेळीं हिंदुस्थानांत आलेले मुत्सद्दी वेल्स्ले, कॉर्नवालिस, हेस्टिंग्ज यांनीं अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धांत सपाटून मार खाऊन अखेरीस आपल्या तलवारी जॉर्ज वॉशिंग्टनपुढें गुडघे टेकून त्याच्या स्वाधीन केल्या होत्या; तेव्हां त्यांचें हरपलेलें श्रेय या भूमींत साध्य करून घेण्याला चांगली संधी सांपडली; ती ते वायां कां घालवितील ?

## बॅरी क्लोजचें सामोपचारी धोरण.

ही स्थिति लक्षांत घेतली म्हणजे इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील कारस्थानावर नीट प्रकाश पडतो. मिळेल त्या मार्गानें पैसा उकळून विलायत भरवावयाची हा त्यांचा क्रम होता व त्यासाठीं त्यांना पेशवाई सर्वस्वीं नष्ट करावयाची होती. परंतु त्या वेळीं पुण्याच्या दरबारांत **सर बॅरी क्लोज** नांवाचा इंग्रज रेसिडेन्ट होता. तो सामोपचाराच्या वृत्तीचा होता. बाजीराव स्वत: तहाच्या अटी चांगल्या प्रकारें पाळतो, **इंग्रजांच्या** स्नेहाचें त्यास महत्त्व वाटतें, अशा स्थितींत त्याच्याशीं कुरापत काढणें त्याला इष्ट दिसेना. वरिष्ठ अधिकाऱ्यांचा तर त्याच्यामागें कांहींतरी भानगडी उत्पन्न करण्याचा तगादा. अखेरीस त्याची तेथून उचलबांगडी करण्यांत येऊन त्या

जागीं कुटिल राजनीतिप्रवीण **एल्फिन्स्टन** याची नेमणूक करण्यांत आली.

**सर बॅरी क्लोज** हा रेसिडेन्ट असतांना त्याला मदतीस म्हणून **खरशेटजी मोदी** नांवाचा पारशी गृहस्थ होता. तोहि सरळ प्रकृतीचा मनुष्य असल्यानें क्लोज व पेशवे यांमधील मध्यस्थाचें काम तो चोखपणें करी. ह्यामुळें **बाजीरावहि** त्यावर प्रसन्न होता. कांहीं दिवसांनीं **मोदीलाहि** तेथून बदलण्यांत आलें; परंतु तो पुण्याहून हालण्यापूर्वींच त्याजवर विषप्रयोग होऊन तो मारला गेला. **एल्फिन्स्टनच्या** कारस्थानाची त्यास बरीच माहिती असल्यानें त्यास अशा रीतीनें मार्गांतून दूर करण्यांत आला असा एक प्रवाद यासंबंधीं आहे. कसेंहि असो. **बाजीरावाशीं** सहानुभूतीनें वागणारी ही जोडी तेथून हालतांच **एल्फिन्स्टनच्या** कारस्थानास सुरवात झाली व त्याचें कारस्थान यशस्वी होण्यास त्याच्या सुदैवानें त्याला पाहिजे अशी संधीहि लवकरच आली.

## गंगाधरशास्त्र्याचा खून

बडोदें राज्य हें पेशव्यांचें अंकित व **गुजराथ** प्रांतावर **पेशवे** व **गायकवाड** यांचा दुहेरी अंमल चालू असे. या प्रांताच्या वसुलांपैकीं अनेक वर्षांची बाकी गायकवाडाकडे येणें होती. तीबद्दल **बाजीरावानें** **बडोद्याकडे** तगादा सुरू केला व अखेरीस बडोदें दरबारतर्फे **गंगाधरशास्त्री पटवर्धन** यास तडजोडीचें बोलणें बोलण्यासाठीं बडोद्याहून पाठविण्यांत आलें. गंगाधरशास्त्री पटवर्धन हा इंग्रजांचा हस्तक व त्यास इंग्रजांसारख्या बलिष्ठाचा पाठिंबा असल्यानें तो बडोद्याच्या कारभारांत लुडबुड करी. तो तेथील स्थानिक अधिकाऱ्यांस अगदीं नापसंत असल्यानें, ते **गंगाधरशास्त्र्यास** पाण्यांत पहात. गंगाधर

शास्त्र्याचें प्रस्थ असें डोईजड असल्यानें तो आपणाकडे मध्यस्थी करण्यास येऊं नये, अशी बाजीरावाचीहि फार फार इच्छा होती व तसे त्यानें प्रयत्नहि केले. परंतु अखेरीस त्यास इंग्रजांच्या निर्णयापुढें नमावें लागलें. नंतर **गंगाधरशास्त्री** वकील म्हणून पुण्यास आल्यावर बाजीराव त्याच्याशीं मिळतें घेऊन त्याचें मन न दुखेल अशाच रीतीनें वागत असे. बाजीरावाचा सल्लागार त्रिंबकजी डेंगळे, ज्याच्या-वर पुढें **गंगाधरशास्त्र्याच्या** खुनाचा आरोप करण्यांत आला, त्याचा व गंगाधरशास्त्र्याचा फार स्नेह जमून उभयतांच्या रोज बैठका होत असत. गंगाधरशास्त्र्याला खूष करण्यासाठीं बाजीरावानें आपल्या नात्यांतील एक मुलगी गंगाधरशास्त्र्याच्या मुलास देण्याचें निश्चित केलें होतें; पण **एल्फिन्स्टननें** तो प्रयत्न हाणून पाडला. ही सर्व स्थिति लक्षांत घेतली असतां **बाजीरावानें** गंगाधरशास्त्र्याचा खून करविला हा आरोप किती दुष्टाव्याचा आहे हें दिसून येईल.

**राघोबाच्या** हातून एक ब्रह्महत्या घडली त्यामुळें अगोदर धर्म-प्रवृत्तीचा **बाजीराव** धर्मकर्माकडे जास्त लक्ष पुरवूं लागला व त्याच्या स्वभावांत जो चंचलपणा दिसून येतो त्याचें कारण आपल्यामागें **नारायणरावाची** ब्रह्महत्या लागली आहे, असा त्याचा ग्रह झाला होता किंवा कांहीं स्वार्थसाधूंनीं तो तसा करून दिला होता, हें आहे. असें असतां अखिल हिंदुमात्रांस वंद्य अशा एका पवित्र क्षेत्राच्या ठिकाणीं देवालयाच्या प्रदक्षिणेच्या वाटेवर एका ब्राह्म-णाचा खून **बाजीरावासारखा** धर्मभीरु इसम करवील ही गोष्टच अशक्य. वस्तुतः हा खून झाला तो शास्त्र्याच्या बऱ्यावर नसलेल्या बडोद्याच्या लोकांकडून. खुद्द पटवर्धनांचा इतिहास जो प्रसिद्ध झाला आहे त्यांतहि बाजीरावावर खुनाचा किंचितहि आरोप करण्यांत आलेला नाहीं. परंतु निमित्तास टेकलेल्या एल्फिन्स्टनास

हें एवढें कारण पुरें झालें. त्यानें खुनाचा आरोप त्रिंबकजीवर करून त्याला स्वाधीन करण्याबद्दल बाजीरावामागें तगादा लागला.

बाजीरावाची या वेळीं इतकी वाईट स्थिति झाली होती कीं, मनांतलें कोणाजवळ खुल्या दिलानें बोलावें तर तसा कोणी विश्वासपात्र मनुष्य जवळ नव्हता. सर्वत्र चहाडखोरांचा सुळसुळाट झाला होता. घरचे नोकर चाकर त्याच्या बातम्या रुपया दोन रुपयांसाठीं एल्फिन्स्टनास जाऊन विकीत. या गोष्टीचा बाजीरावास इतका जाच झाला कीं, माहुली येथें माल्कमसाहेबाशीं त्याची जेव्हां मुलाखत झाली, तेव्हां त्यानें अत्यंत दीनवाणीनें ही सर्व हकीगत त्यास सांगितली व मी आज काय जेवलों, भाज्या कसल्या होत्या इतकी बारीकसारीक बातमी मिळविण्यासाठीं आपल्याभोंवतीं हेरांचें जाळें पसरलें आहे त्यांत मी राहूं तरी कसा, असें जीव तोडून त्यानें विचारलें.

## बाजीरावांची करुण दशा

अशा स्थितींत त्याच्या जिवाभावाचा स्नेही सल्लागार असा एकटा त्रिंबकजी होता. म्हणून त्यासच उचलण्याचें एल्फिन्स्टननें ठरविलें व अखेरीस बाजीरावाचा नाइलाज होऊन त्याला त्रिंबकजीला एल्फिन्स्टनच्या स्वाधीन करावें लागलें. त्रिंबकजीस ठाण्याच्या तुरुंगांत ब्रिटिश सोजिरांच्या कडेकोट पाहाऱ्यांत ठेवला असतां तेथून तो निसटून गेला. अर्थात् याबद्दल बाजीराव जबाबदार कसा ? परंतु तूं नाहीं तुझ्या बापानें, या न्यायानें तो अपराधहि बाजीरावावर लादण्यांत येऊन, त्रिंबकजीस आमच्या ताबडतोब स्वाधीन करा व तो ताब्यांत देईपर्यंत गुजराथप्रांत, पुरंदर, सिंहगड व रायगड हे किल्ले हमीदाखल आमच्या ताब्यांत द्या, असा

एल्फिन्स्टननें बाजीरावामागें तगादा लावला. बाजीरावानें या संबधानें पुष्कळ तक्रार केली. हे किल्ले म्हणजे मराठी राज्याच्या किल्लया असल्यानें व गुजराथ हा सोन्याचा तुकडा असल्यानें हा अपमानास्पद तह होऊं नये म्हणून बाजीरावानें नाना प्रयत्न केले. परंतु अखेरीस दुर्बलाला वाली कोणीच नसतो या न्यायाप्रमाणें त्याला ' पुण्याचा तह ' म्हणून प्रसिद्ध असलेला तह करून वरील प्रांत व किल्ले इंग्रजांच्या स्वाधीन करावे लागले.

पुण्यांत असा बनाव बनत होता. त्याच्यापूर्वी इंग्रजांनीं आपल्या कारस्थानांच्या जाळ्यांत एकामागून एक देशी राजे अडकविण्यास सुरवात केली होती. शिंदे व होळकर यांमध्यें कलह माजवून त्यांची परस्पर शक्ति हरण करण्याचा त्यांचा डाव यशस्वी झाला. रजपूतमंडळ मराठी सत्तेस मानीत असे. त्यांचीं मनें मराठी सत्ते-विरुद्ध कलुषित करण्याचें काम टॉडनें यशस्वीपणें पार पाडलें. यशवंतराव होळकरसारखा खंदा वीर निवर्तल्यानें इंग्रजांस उत्तर मोकळी सांपडली व आपला हस्तक अमीरखान पठाण होळकर-दरबारांत घुसवून त्याच्या करवीं आपला डाव यशस्वीपणें साध्य करून घेण्याचा प्रयत्न साधला. निजामनें अगोदरच अंकितपणा स्वीकारला होता. टिपूचें राज्य हिंदी लोकांच्या मदतीनेंच बुड-विल्याकारणानें तिकडेहि इंग्रजांस पायबंद लावील असा कोणी नव्हता. मराठ्यांची सत्ता जरा प्रबल होती पण **नाना फडणीसा**-मागें ती सांवरून धरणारा **यशवंत फडणीस** कोणी राहिला नाहीं. **नानांना** इंग्रजांचें संकट दिसत होतें व तो विद्यमान होता तोंपर्यंत त्यानें इंग्रजांचा पाय मराठी राज्यांत ठरूं दिला नाहीं; परंतु त्याच्यामागें अंधार झाला, स्वार्थ बोकाळला व इंग्रजांचें फावलें.

अशा प्रकारें सर्व बाजूंनीं पेशव्यांची गळचेपी झाली. कोणी

पाठिराखा नाहीं, विश्वासाचा कोणी माणूस जवळ नाहीं. एकटा त्रिंबकजी विश्वासाचा ,तोहि इंग्रजांनीं हिरावून घेतला. या सर्व प्रकारांमुळें बाजीराव हताश होऊन अशा स्थितींत राहण्यापेक्षां एकदां सोक्षमोक्ष करावा असें त्यास सहजच वाटलें, यांत आश्चर्य नाहीं.

## राज्याचे धनी सातारचे महाराज

सातारचे महाराज हे अखिल मराठी साम्राज्याचे प्रमुख सत्ताधीश असून पेशवे त्यांना त्या दर्जाप्रमाणें वागवीत. सातारचे राजे पेशव्यांच्या कैदेंत होते अशीं अनैतिहासिक विधानें कित्येकांकडून मुद्दाम केलीं जातात व मराठी राज्य नष्ट करण्याचा सर्व दोष बाजीरावावर टाकण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु खरी वस्तुस्थिति अशी नाहीं. स. १८७३ मध्यें सातारच्या महाराणी श्रीसगुणाबाईसाहेबांनीं आपलें राज्य परत मिळण्याबद्दल महाराणी व्हिक्टोरिया हिच्याकडे एक अर्ज केला होता. त्या अर्जांत शाहूमहाराजांपासून पेशवाई अखेरपर्यंत राज्यांत घडणाऱ्या बारीकसारीक सर्व गोष्टीहि, पेशवे, महाराजांकडे रुजू करीत असें सांगून त्यांची तारीखवार नोंद दिली आहे. या गोष्टीवरून महाराज, मराठी राज्याचे अधिपति म्हणून सर्व पेशवे मानीत असल्याचें स्पष्ट दिसून येतें. आतां सातारच्या गादीवर शाहूमहाराजांनंतर कित्येक नादान अधिपति आले व त्यांना आपल्या अधिकाराचा बोज राखून घेतां आला नाहीं यांत दोष कोणाचा?

शेवटच्या प्रतापसिंह महाराजांचीच गोष्ट घ्या. प्रतापसिंह महाराज हे सातारच्या गादीवरील एक कर्तृत्ववान् राजे होऊन गेले. शाहूमहाराजांच्या नंतर ते गादीवर येते तर मराठ्यांचा इतिहास अगदीं वेगळाच लिहावा लागला असता. परंतु दुर्दैवानें मराठी राज्याच्या

पडित काळीं ते राज्यावर आले. योग्य मार्गदर्शक कोणी नाहीं अशी स्थिति. त्यामुळें अंगीं कर्तृत्व असूनहि मराठ्यांच्या पडत्या सत्तेला त्यांना आधार देतां आला नाहीं. स्वार्थपरायण हस्तकांच्या हातीं सांपडल्यानें मराठी सत्तेवर अजाणतां का होईना पण त्यांच्या हातून जे आघात झाले ते मराठी सत्तेला अत्यंत घातुकच ठरले.

बाजीरावानें करूं नये असा मानहानीचा तह नाइलाजानें इंग्रजांशीं केला. तो पाळण्यास मराठी राज्याचे हे धनी खास बांधले गेले नव्हते. उलट अगदीं शेवटच्या काळीं चतुरजी भोसल्याकरवीं मराठ्यांच्या एकीकरणाचा जो प्रयत्न झाला, तसा प्रारंभींच होता तर बाजीरावाचा तह नामंजूर करून बाजीरावास पदच्युत करून पडती मराठी सत्ता सावरून धरता आली असती, पण तसें न करतां मराठी सत्ता बुडविण्यास टपून बसलेल्या इंग्रजांना सामील होण्यांत सातारच्या छत्रपतींनीं स्वतःचा व त्याबरोबर आपल्या मराठी सत्तेचा अत्यंत घोर अपराध केला.

## धनीच फितूर झाले.

ज्या रंगो बापूजीनें प्रतापसिंह महाराजांचें राज्य परत मिळावें म्हणून हाडांचीं काडें केलीं, सात समुद्र ओलांडून विलायतेंत निकरानें भांडला, नानाप्रकारचे कष्ट केले, तोच रंगो बापू, एल्फिन्स्टनास पेशवाई बुडविण्याकरितां सामील व्हावा, यापेक्षां दैवदुर्विलसित कोणतें? रंगो बापू, बळवंतराव चिटणीस, निंबाजी व सुभानजी भोसले, गणु कोंबडा, हे सातारकरांचे हस्तक पेशवाईविरुद्ध कारस्थानें करण्यांत अग्रगण्य होते व हा स्वजनद्रोह कशासाठीं? तर अगदीं सामान्य प्रकारच्या वतनांसाठीं. एल्फिन्स्टनाशीं झालेल्या पहिल्याच भेटींत त्यानें रंगो बापूस पांच मोहोरा नजर केल्या व अशा रीतीनें महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यविक्रीचा बयाणा रंगोबानें खिशांत घातला.

अशा प्रकारें सातार्‍यास पेशवाईविरुद्ध बनाव बनत असतांना, इंग्रजांनीं जें धोरण स्वीकारलें त्याचा एकदां सोक्षमोक्ष करावा असा बाजीरावानें विचार करून, तो छत्रपतींची मान्यता घेण्यास माहुलीस गेला. तेथें इंग्रजांशीं बिघाड कसा झाला याचीं कारणें निवेदन करून, त्यानें अखेरच्या मोहिमेस छत्रपतींची संमति मिळविली. परंतु नवलाची गोष्ट अशी कीं, या महाराष्ट्राच्या धन्यानें, बाजीरावानें स्वातंत्र्ययुद्धाची अशी अशी खटपट चालविली आहे, ही बित्तंबातमी, बाजीरावाची पाठ फिरते न फिरते तोंच बळवंतराव चिटणविसांकरवीं एल्फिन्स्टन यास कळविली. छत्रपतींचा मनसुबा बरोबर नाहीं हें बाजीरावानें थोडें जाणलें होतेंच व म्हणूनच त्यानें युद्धारंभापासून छत्रपतींस आपल्याबरोबर घेतलें.

इंग्रजांशीं हा शेवटचा सामना द्यावयाचा बाजीरावानें ठरविला, त्यावेळीं त्याची सर्व बाजूंनीं अत्यंत शोचनीय अवस्था झाली होती. परंतु अशा आपत्काळांतहि त्यानें एक कोटी रुपये उभे केले. मेहेंदळे, काळे या रुसलेल्या सरदारांची समजी करून त्यांस कामीं लावलें. नागपूरकर भोंसल्याशीं संगनमत केलें. परंतु अशी तयारी करूनहि त्यांत बाजीरावास अखेर अपयशच पदरीं घ्यावें लागलें; याचें कारण, अत्यंत घरभेदीपणा; स्वार्थपरायणतेला विलक्षण आलेला ऊत; खाल्ल्या अन्नास जागणारा कोणी भेटला असेल तर तो एकटा बापू गोखले; बाकी सर्व फितुर्‍यांचा बाजार. अशी व्यवस्था असल्यानें, ऐन युद्धाच्या वेळीं दगा देणारे आप्पा निपाणकरासारखे स्वजनद्रोही लष्करांत भरल्यानें व बाहेर बाळाजी नातूसारखे बाजीरावाची नालस्ती करून त्याविरुद्ध लोकमत करण्याची

खटपट करणारे निघाल्यानें, हें शेवटचें युद्ध बाजीराव हरला, यांत विशेष आश्चर्य मानण्यासारखें काय आहे ?

## राज्य कोणीं बुडविलें ?

मराठ्यांच्या राज्याचें उदक **बाजीरावानें इंग्रजांच्या** हातावर सोडलें हा महत्त्वाचा आरोप नेहमीं केला जातो. तो निरर्थक व निर्मूल कसा आहे तें आतां पाहूं. बाजीरावावर तो पळपुटा, भीरू असाहि आरोप करण्यांत येतो. परंतु हा आरोपहि वृथा आहे. चोहोंबाजूंनीं आकाश फाटलेलें, कोणाचा हि आधार नाहीं, विश्वास ठेवण्यास पात्र असा मनुष्य जवळ नाहीं, चौफेर इंग्रजी फौजा मागें लागलेल्या, अशा स्थितींत सतत सहा महिने इंग्रजी फौजांची दम-छाटी करणारास पळपुटा म्हणवयाचा असल्यास खुशाल म्हणावें ! परंतु त्यांत बाजीरावाचें रणकौशल्य मात्र निर्विवाद दिसून येतें. जयापजय कोणाच्या हातचा आहे ? पण अखेपर्यंत लढत राहणें हाच खरा वीरधर्म आणि तो बाजीरावानें शेवटपर्यंत अंगीकारला, एवढें मात्र खरें !

## तीन जाहीरनामे.

आपलें अंगीकृत कार्य बाजीराव अशा रीतीनें करीत असतां, इंग्रजांशीं आगाऊ गुप्तसंकेत ठरल्याप्रमाणें **प्रतापसिंह महाराज** मध्यंतरीं इंग्रजांच्या स्वाधीन झाले. ते स्वाधीन होतांच ता. ४ एप्रिल १८१८ रोजीं महाराजांचे **प्रतिनिधि** या नात्यानें इंग्रजांनीं एक जाहीर-नामा प्रसिद्ध केला. त्यांत महाराजांनीं बाजीरावास पदच्युत केल्याचें प्रसिद्ध केलें. अशा रीतीनें **बाजीरावास** पदच्युत केल्यानंतर म्हणजे तो **पेशवाईपदावरून** कमी केल्यानंतर, तीन महिन्यांनीं म्हणजे ता. ४ जून १८१८ रोजीं **बाजीराव मालकमसाहेबाच्या** स्वाधीन झाला

व त्यानंतर त्यानें आपल्या पोटाची सोय करून घेतली. यावरून राज्याचें उदक इंग्रजांच्या हातावर कोणीं सोडलें याचा निर्णय वाचकांनींच करावा.

**बाजीरावाशीं** युद्ध सुरूं झाल्यापासून **इंग्रजांनीं** एकंदर तीन जाहीरनामे काढले. पहिला जाहीरनामा ता. ११ फेब्रुवारी १८१८ रोजीं काढला. हा जाहीरनामा बाजीरावाच्या निंदेनें भरलेला असून, त्याच्या-अंगीं असते नसते सर्व दोष लादण्यांत आले होते. बाजीरावाकडे विकृतपणें पाहण्याची जी दृष्टि उत्पन्न करण्यांत आली आहे, तिचें उगमस्थान या जाहीरनाम्यांत आहे व त्याचें कारण उघड आहे. इंग्रजांना राज्य ध्यावयाचें होतें बाजीरावाकडून. अर्थात् त्याची बदनामी शक्य तितक्या भडक शब्दांत केल्याशिवाय त्यांना गत्यंतरच नव्हतें. **हिंदुस्थानांत** हा प्रयोग करण्यापूर्वीं स. १८१४ मध्यें **युरोपांत** अशाच प्रकारचे जाहीरनामे **टॉलिरण्डनें** काढून **नेपोलियनविरुद्ध** लोकमत क्षुब्ध केलें होतें. त्याचाच उपयोग **हिंदुस्थानांत** यशस्वी झाला यांत नवल नाहीं !

## रावबाजीवरील आक्षेप

**बाजीरावाच्या** अंगांत अत्यंत चंचलपणा होता, स्थिरबुद्धि नव्हती ही गोष्ट खरी. पण तशी वृत्ति **इंग्रजांच्या** कुटिल कारस्थानामुळें उत्पन्न झालेली होती. ऐन युद्धाच्या वेळीं स्वराज्याचें अन्न खाल्लेले व त्यावर पोसलेले अनेक सरदार त्यास सोडून गेले; तथापि तो स्वतः रणांगण सोडून कधींहि गेला नाहीं, इतकेंच नव्हे तर पत्नीस मर्दानी पोषाक देऊन तो सैन्याबरोबर चालवीत असे. हा त्याचा भित्रेपणा असें कोणास वाटल्यास खुशाल वाटो !

**बाजीराव** हा अत्यंत जुलमी असल्यानें त्याचें वर्णन केलेलें आहे.

परंतु ई. **रिचर्ड्स्** नांवाचा इसम पुण्यास आला असतां त्यानें तेथें पाहिलेलें वर्णन लिहून ठेवलें आहे. त्याचा उतारा **डिग्बी** यानें आपल्या " प्रॉस्परस् ब्रिटिश इंडिआ " या प्रसिद्ध पुस्तकांत घेतला आहे. त्यांत सदर **रिचर्ड्स्** म्हणतो, " मीं **दक्षिणेंत–पुण्यांत**–आलों, तेथील रस्ते गजबजलेले; लोकांचे पोषाकही सुंदर व व्यापारधंदाहि भरभराटीस आलेला दिसला. सर्वत्र आनंद, आबादानी नांदत होती. यासंबंधानें मीं रेसिडेन्टास विचारतां त्यानें मला सांगितलें, "**पेशव्यांनीं पुणें** शहराचें वैभव वाढावें म्हणून पुण्याच्या आसमंतांतील सर्व कर माफ केले आहेत व लोकांवर किंचितहि जुलूम होऊं नये म्हणून कोतवालीहि कमी केली आहे" यावरून बाजीरावाची राज्यपद्धति लक्षांत येण्यासारखी आहे.

जेवण घालून त्यानें राज्य बुडविलें, तो अत्यंत उधळ्या होता, असाहि त्याजवर आरोप करण्यांत येतो; परंतु तोहि वृथा आहे. **बाजीराव** अत्यंत मितव्ययी होता. त्याच्या रोजच्या पंक्तीला १२५ पान असे व त्याचा मक्ता पात्रीं बारा आणेप्रमाणें दिला जाई. गणपतीउत्सव हा विशेष मोठ्या प्रमाणांत होई व त्याचा खर्च पात्रीं दोन रुपये असे. हल्लींचे **गव्हर्नर, संस्थानिक** यांच्या डिनर-पार्ट्यांची वर्णनें ऐकून **बाजीराव** त्यांच्या पासंगालाहि पुरणार नाहीं असेंच कोणीहि म्हणेल. बाजीरावावरील आक्षेपांचें अशा प्रकारें निरसन करतां येईल.

## स्वार्थानें स्वातंत्र्य घालविलें.

मराठी साम्राज्य कोणीं बुडविलें याचें उत्तर विस्तृत द्यावयाचें म्हणजे असें म्हणावें लागेल कीं, लोकांत एकराष्ट्रीयत्वाची भावना किंचितही नव्हती; आपल्या पोळीवर तूप ओढण्याची प्रत्येकाची

धडपड चाले; क्षुद्र अशा वतनांसाठीं सर्व देशाचें वतन बळी देण्याचा अधमपणा लोकांत उत्पन्न झालेला; शिवाय स्वाभिमान-शून्यता; इंग्रजांमध्यें कोणते गुण आहेत, त्यांनीं अल्प काळांत हिंदुस्थानासारख्या अफाट देशांत प्रभुत्व गाजविण्या इतकी सत्ता कशी निर्माण केली या गोष्टीचें पूर्ण अज्ञान; सर्व देशभर पसर-लेल्या सरदारांना लगामीं लावण्याजोगी मध्यवर्ती सत्ता नसणें व आपसांतील कलह मिटविण्यासाठीं परकीयांच्या साहाय्याची याचना करण्याची आत्मघातकी वृत्ति; हीं व अशा प्रकारचीं अनेक कारणें मराठी साम्राज्य बुडण्यास कारणीभूत झालीं; मग निमित्तमात्र कारण कोणतेंहि असो.

## " हिंदी लोक कुत्र्याप्रमाणें आहेत. "

Indians are like dogs असे उद्गार एका गृहस्थानें काढले आहेत. त्याचें स्पष्टीकरण असें कीं, एका कुत्र्याला दुसरा कुत्रा पाहवत नाहीं; तो दृष्टीस पडतांच लागलाच तो त्यावर भुंकू लागतो; परंतु आपल्या धन्याशीं मात्र तो एकनिष्ठ असतो. तसा हिंदी मनुष्य आहे. लांडग्याप्रमाणें टोळ्या करून राहण्याची त्याला संवयच नाहीं.

" Slaves are thus traitors to their country. "

## प्रकरण चौथें

# मराठी साम्राज्याच्या आदिपीठाचा ग्रास.

ब्रिटिश मुत्सद्यांचें राजकारण यशस्वी होऊन त्यांनीं सातारचे महाराजे प्रतापसिंह यांजकरवीं बाजीराव रघुनाथ पंतप्रधान यांस बण्डखोर ठरवून पदच्युत केलें व मराठी साम्राज्याचा अधिकार महाराजांसाठीं आपल्या हातीं घेतल्याचा जाहीरनामा ता. ११ फेब्रुवारी स. १८१८ रोजीं प्रसिद्ध केला. हा जाहीरनामा काढून पेशवाईच नाहीं तर अवघ्या मराठी सत्तेला मूठमाती कशी देण्यांत आली, याचें विवेचन मागील प्रकरणीं केलें आहे. या प्रकरणांत मराठी सत्तेचा अवशेषहि कसा खुडून काढण्यात आला हें दाखवावयाचें आहे.

महाराजा प्रतापसिंह यांच्या पूर्वी शाहूमहाराजानंतर जे राजे सातारच्या सिंहासनारूढ झाले, ते कर्तृत्वशून्य असल्यानें, मराठी राज्याचा सर्व कारभार पेशव्यांनीं आटोपला व ज्या हिंदवी स्वराज्याचें बीज शिवछत्रपतींनीं पेरलें त्यास भरपूर खतपाणी घालून अखिल भारतवर्ष त्यांनींच त्या छायेखालीं आणला. पेशव्यांइतके कर्तबगार पुरुष शाहूनंतर सातारा घराण्यांत झाले नाहींत. पेशव्यांचा हा जाच आपणांस होत आहे अशी सातारच्या महाराजांची कल्पना करून देण्याचे प्रयत्न कांहीं थोडेथोडके झाले नाहींत. प्रतापसिंह महाराजांचे वडील आबासाहेब महाराज यांनीं या दृष्टीनें थोडाफार प्रयत्न केला, परंतु तो सुरू होतांच कोलमडून पडला.

रावबाजींनीं इंग्रजांना घरांत घेतल्यापासूनच नव्हे तर फार आधींपासून मराठी सत्ता रसातळास मिळवून टाकण्याचे ब्रिटिश मुत्सद्यांचे प्रयत्न सतत सुरू होते. कारण अखिल हिंदुस्थानांत इंग्रजांना विरोध करणारी प्रबल सत्ता कोणती असेल तरी ती मराठ्यांची, अर्थात् तीच नष्ट केली म्हणजे निर्वीर्य अशी स्थिति इंग्रजांना

सहज सांपडणार होती व हिंदी माणसाच्या हाडीं माशीं खिळलेला स्वार्थ, परस्परांविषयीं द्वेष, परधार्जिणेपणा या राष्ट्रीय रोगांचा पुरा फायदा इंग्रजांनीं घेतला यांत नवल काय ? पेशवाई मोडल्यावर राहिलेलीं मराठी राज्यें मोडणें फारसें कठीण नव्हतें व झालेंहि तसेंच. पेशवाई मोडण्याचा डावहि इंग्रजांनीं मोठ्या कुशलतेनें टाकला. मराठी सत्ता पेशवाईभोंवतीं केंद्रीभूत झालेली, ती सत्ताच उखडून टाकली म्हणजे तिच्या प्रभावावर वाढलेल्या वृक्षवेली खरडून टाकणें म्हणजे हातचा मळ होय, अशी यथार्थ कल्पना इंग्रजी मुत्सद्यांची होती व एल्फिन्स्टन्‌मारखा अव्वल प्रतीचा कावेबाज मुत्सद्दी इंग्रजपक्षाला लाभल्यानें सकृद्दर्शनीं अवघड वाटणारें कार्य सहज घडून आलें.

पेशवाई पोखरण्याच्या कामीं ज्याप्रमाणें बाळाजी नारायण नातू प्रभृतींनीं इंग्रजांना सहाय्य केलें, त्याचप्रमाणें सातार्‍यामध्येंहि इंग्रजांना कांहीं कमी हस्तक मिळाले नाहींत व त्यांनींच एल्फिन्स्टनशीं कारस्थानें करून, बाजीराव पेशवा आपत्तींत सांपडेल अशी रचना केली. स्वराज्यसंरक्षणासाठीं शेवटचा मराठा वीर बापू गोखला अष्टी मुक्कामीं धारातीर्थीं शयन करता झाला व तोच सुसमय जाणून, प्रतापसिंहाच्या हस्तकांनीं महाराजांना अष्टी मुक्कामींच इंग्रजांच्या स्वाधीन केलें. इंग्रजांचें राजकारण कल्पनेबाहेर यशस्वी झालें.

ही घटना अद्भुत आहे यांत संशय नाहीं. परंतु मराठी राज्याची त्यावेळची उतरती दशा, मराठमंडळांत मुत्सद्दीगिरीचा असलेला दुष्काळ व उलट एल्फिन्स्टन् सारखा पक्का राजकारणी पुरुष यांची गांठ पडल्यावर अखेर परिणाम व्हावयाचा तोच झाला. बाजीरावानें इंग्रजांच्या काचांतून सुटण्यासाठीं अटीतटीचा सामना देण्याचा अट्टाहास कसा केला व दुर्दैवानें तो अपयशी कसा झाला हें मागील

प्रकरणीं निवेदन केलेंच आहे. ईस्ट इंडिया कंपनीनें आपलें या वेळचें कारस्थान अत्यंत यशस्वीपणें व सफलतेनें चालविलें होतें.

इंग्रजांनीं प्रथम साताराच्या महाराजांच्या नांवानें एक जाहीरनामा प्रसिद्ध करून, बाजीराव हा बंड असल्याचें जाहीर केलें. हें करण्याचा हेतु काय होता तो तत्कालीन लेखकाच्या उद्गारांत स्पष्ट दिसून येईल. ब्लॅकर्स मराठा वॉर १८१७–१८ या पुस्तकांत पुढील विचार मांडले आहेत.

"The object of all political manifestoes is to make out a case and this contains the British side of the question. The other side is never publicly exhibited, for the native power have yet to learn the practice of this diplomatic weapon.

At present the epithets of "treacherous and faithless" are so commonly applied to the conduct of the Mahrathas that whatever foundation there is for the general imputation by no discremination are any of their acts exempted from that character."

मेजर आलिफन्ट या जाहीरनाम्यासंबंधानें म्हणतो,

"When in 1817/18 the Peshwa Bajeeraw was in arms against the British Government, one of his first acts after the battle of Poona was to secure the person of the Raja of Satara to cause him accompany his camp and thus to identify with himself the lawful Sovereign of the Empire. The representative of the British empire the Hon. Mr. Elphinstone fully sensible of the importance of this measure to the cause of Bajeeraw, resolved to counteract it and suggested to the governor "to set up the Raja of Satara," with the view of bringing the war more speedly to a close by inducing the Maratha chiefs to quit the Peshwa standard. The suggestion was approved and the proclamation of the 11th Feb. 1818 was issued."

साताऱ्च्या महाराजांचा अशा रीतीनें उपयोग करून घेऊन, इंग्रजांनीं बाजीरावाला बंड ठरविलें व त्याच्या भोंवतीं जे कांहीं निष्ठावन्त लोक राहिले होते त्यांना फोडलें. खुद्द महाराज, इंग्रजांच्या स्वाधीन झाले. ही गोष्ट करण्यांत महाराजांना असें भासविण्यांत आलें कीं, आम्हीं बाजीरावाला मोडून तो आपणाशीं बेइमान झाला आहे, त्याचा पराजय करून सर्व राज्य आपलेंच असल्यानें आपल्या स्वाधीन करूं. आम्हाला आपल्या राज्याचा अभिलाष काडीचाहि नाहीं. फक्त आपल्या वर्तानें आम्हीं हें बंड मोडीत आहों. जाहीरनाम्याच्या द्वारें प्रजेचीहि अशीच समज करून देण्यांत आली व साताऱचें राजघराणेंहि या मोठ्या आभिलाषास भुललें व आपण होऊन इंग्रजांच्या स्वाधीन झालें.

प्रतापसिंह महाराजांना कोणतें आमिष दाखविण्यांत आलें होतें तें महाराजांच्याच शब्दांत सांगणें बरें. प्रतापसिंह महाराजांनीं पुढें आपली कैफियत मांडण्यासाठीं जे कागदपत्र जमा केले होते, त्यावरून मि. डी. वूलमर यानें महाराजांचें म्हणणें बोर्डापुढें मांडलें तें पार्लमेंटरी कागदपत्रांत प्रसिद्ध झालें आहे. त्यांत महाराज म्हणतात, "स. १८१७।१८त माझा अविश्वासू नोकर बाजीराव व ईस्ट इंडिया कंपनी यांमध्यें युद्ध झालें, त्यावेळीं ईस्ट इंडिया कंपनीनें आपण होऊन माझ्याशीं बोलणें सुरू केलें. मला आपल्या लष्करांत बोलावलें व तेथें मला योग्य तो मानमरातब व संरक्षण देण्यांत येईल असें आश्वासन देण्यांत आलें. हें निमंत्रण करण्यांत आलें त्याच्याबरोबर एल्फिन्स्टनकडून अशी खातरजमा करण्यांत आली कीं, 'आपण बाजीरावाशीं असलेला सर्व संबंध तोडून आमचे स्नेही म्हणून आमच्याकडे आलांत तर, आपलें सर्व राज्य व सत्ता पूर्ववत् आपल्याकडे चालू राहील.' या आश्वासनावर भरंवसा ठेवून मी इंग्रजी लष्करांत दाखल

झालों. बाजीराव पेशव्याला अव्यवस्थित राज्यकारभार करणारा, नालायक म्हणून कामावरून कमी केलें. तेव्हां मला गव्हर्नर जनरलच्या नांवानें पुनः आश्वासन देण्यांत आलें कीं, 'माझें सर्व राज्य मला देण्यांत येईल.' एल्फिन्स्टन साहेबानेंहि पत्र पाठवून पुनः वरीलप्रमाणेंच आश्वासन दिलें."

महाराजा प्रतापसिंह यांच्या वरील विधानाला पुढीलप्रमाणें दुजोरा मिळालेला आहे. सर रॉबर्ट ग्रांट यानें ता. ३१ मे १८३८ सालीं "मि. एल्फिन्स्टन यानें सातारच्या राजाचा विश्वासघात केला" म्हणून आपलें मत व्यक्त केलें आहे. त्यांत ग्रांटसाहेब लिहितो कीं, "पेशव्यांचा पाडाव होण्यापूर्वीच एल्फिन्स्टन व राजे यांच्यांत गुप्त करार झाला होता. राजे प्रतापसिंह, जनरल स्मिथ याच्या ताब्यांत गेल्यानंतर, सेनापतीसाहेबांनीं पहिल्याच मुलाखतींत राजेसाहेबांना आश्वासन दिलें कीं, "यापुढें मराठ्यांच्या साम्राज्याचे धनी आपणच आहांत, याविषयीं शंका धरूं नये. सिंहासन महाराजांचें आहे." पेशव्यांचा पराजय होण्याचें मुख्य कारण, राजे प्रतापसिंह इंग्रजांच्या स्वाधीन झाले हें आहे. राजेसाहेब लष्करांत आल्यानंतर त्यांचा योग्य मानसन्मान ठेवण्यांत आला. गांवोगांवचे नजराणे त्यांजकडे येऊं लागले. सर्व मराठी-राज्य महाराजांचें आहे याविषयीं एकसारखीं आश्वासनें देण्यांत आलीं."

परंतु हा सर्व प्रकार बाजीरावाचा पुरा पाडाव होऊन कंपनीचा अंमल सर्वत्र बसेपर्यंत. ता. २३ फेब्रुवारी १८१८ रोजीं बाळाजीपंत नातू मार्फत एल्फिन्स्टननें जें पत्र राजेसाहेबांना लिहिलें त्यांतहि वरील आश्वासन पुन्हां दिलें आहे.

परंतु इंग्रजी राजकारण इतकें सहज समजण्यासारखें नसतें! इंग्रजांनीं जाहीरनामा काढून बाजीरावास कोणीं साहाय्य करूं नये

असें प्रसिद्ध केलें. त्यांतच त्यांनीं कलम घातलें होतें कीं, "आम्हीं महाराजांची मुक्तता बाजीरावाच्या अटकेंतून केली व त्यांना राज्यावर बसविलें." प्रतापसिंहानें या कलमाला आक्षेप घेतला. तो म्हणाला "माझी मुक्तता तुम्हीं कशी केली ? मी आपण होऊन तुमच्या स्वाधीन झालों व माझें राज्यारोहण तर पूर्वींच झालें आहे. मी त्या सिंहासनाचा वारस आहें."

परंतु राजकारणपटु एल्फिन्स्टनला हें कसें रुचावें? आम्हीं स्वबल-पराक्रमानें राज्य जिंकून तें महाराजांस मोठ्या कृपेनें बक्षीस देत आहों, असा देखावा करणें हें त्याच्या हिताचें व धोरणास इष्ट होतें. इंग्रजी सैन्य, सातारा नगरींत फेब्रुवारी १८१८ मध्यें शिरलें व तेथें एक नाटक करण्यांत आलें. जणूं काय आम्हीं साताराचा किल्ला व नगर जिंकून घेतलें आहे, असें दाखविण्यासाठीं किल्ल्यावर चार दोन तोफांचे गोळे डागले. किल्यांतून कांहींच प्रतिकार झाला नाहीं व तो होणार नव्हताहि. तेव्हां इंग्रज पलटणी किल्ल्यांत शिरल्यावर प्रथम तेथील महाराजांचा झेंडा काढून त्या जागीं ब्रिटिश निशाण फडकावलें. नंतर कांहीं वेळानें तें काढून त्या जागीं महा-राजांचा भगवा झेंडा पुन्हां लावण्यांत आला !

फेब्रुवारी १८१८ मध्यें सातारानगरांत प्रवेश केला तरी प्रताप-सिंह महाराजांच्या हातीं राज्यकारभार मात्र लागलींच दिला नाहीं. महाराजांचा एकसारखा तगादा सुरू झाला. "माझें राज्य माझ्या ताब्यांत द्या," अशी प्रतापसिंहाची मागणी सुरू झाली. एल्फिन्स्टननें महाराजांशीं असा करार स्पष्टपणें केला होता कीं, पेशव्यांचा मुलूख घेऊन तो आपल्या ताब्यांत देऊं. महाराजांचा तगादा सुरू झाला, त्यावेळीं सर थॉमस मनूरो यानें अलफिन्स्टन यास ता. २९ मार्च १८१८ रोजीं एक पत्र लिहिलें त्यांत असें

म्हटलें आहे कीं, "राजाला किती मुलूख द्यावयाचा त्याच्या निश्चित सीमा आतां कळवूंच नका. कारण अद्याप युद्ध संपलें नाहीं. जरा स्थीरस्थावर झालें म्हणजे तें ठरवूं. परंतु मराठे लोक खूष व्हावेत म्हणून राजाकडून पेशवाईपद ब्रिटिशसरकारला द्या."

यानंतर ब्रिटिशांच्या प्रेरणेनें प्रतापसिंहानें ता. १४ एप्रिल १८१८ रोजीं दुसरा जाहीरनामा काढून बाजीरावाशीं कोणीं कसलाहि संबंध ठेवू नये असा लोकांस हुकूम काढला. परंतु प्रताप-सिंहास फसविण्याची योजना अगोदरच सिद्ध झाली होती. ता. ८ एप्रिल १८१८ रोजीं अलफिन्स्टननें साताराचा पोलिटिकल एजन्ट कॅ. जेम्स ग्रांट याला पत्र लिहिलें कीं, "साताराच्या राजाला सुखानें राहतां येईल अशा बेताचें लहानसें संस्थान द्यावयाचा सरकारचा इरादा आहे. राजा इंग्रजसरकाराच्या धोरणानें वागेल अशी दक्षता घ्यावी. त्याला जें राज्य द्यावें असा सरकारचा इरादा आहे त्याची मर्यादा, उत्तरेस नीरानदी व दक्षिणेस कृष्णा व वारणा, पूर्वेस पेशव्याचा मुलूख व पश्चिमेस सह्याद्रीचे घाट याप्रमाणें आहे." अलफिन्स्टननें प्रतापसिंहास दिलेलें आश्वासन व हें त्याचेंच पत्र पाहिलें म्हणजे राजाला बुडविण्याचा कसा पद्धतशीर प्रयत्न चालला होता हें दिसून येईल. सर्व मराठा साम्राज्याचे आपण धनी या नात्यानें प्रतापसिंहाचे खर्च चालू होते. त्याला आळा घालण्याचा ग्रँट यानें अलफिन्स्टनच्या आज्ञेनुसार पुष्कळ प्रयत्न केला; परंतु त्याला यश आलें नाहीं. तेव्हां त्या कामीं त्यानें बाळाजीपन्त नातू याची योजना केली व त्यानें इंग्रजांचा कार्यभाग त्यांना पसंत पडेल अशा रीतीनें साधला. प्रतापसिंहाच्या आईनें तर आपण गच्चीवरून उडी टाकून जीव देऊं अशी धमकीही दिली; परंतु जी गोष्ट ग्रांटला साधली नाहीं ती बाळाजीनें सिद्धीस नेली.

सुमारें दीडवर्ष राजाला राज्य मिळालें नाहीं. दरम्यान पेशव्यांचा

पाडाव झाला. देशांत स्थिरस्थावर झालें. राजाला हातीं ठेवण्यांत इंग्रजांचा जो हेतु होता तो सफल झाला असल्यानें, राजाला यापुढें इंग्रजांच्या कृपेवर सर्वथा अवलंबून राहणें प्राप्त झालें. कंपनीनें आपल्या अटी राजाला सांगितल्या व त्या मान्य करण्याशिवाय अन्य गतीच राजा प्रतापला राहिली नाहीं. कंपनीची कपटनीति कशी आहे, ती असत्यवादी, ढोंगी व विश्वासघातकी कशी आहे याचा अनुभव प्रतापसिंहाला आतां आला; पण आतां त्याचा उपयोग काय होता ?

प्रतापसिंहाशीं ता. २७ नोव्हेंबर १८१९ रोजीं इंग्रजांचा तह झाला. हा तह अकरा कलमी होता. पहिल्या कलमांत राजाला वंशपरंपरागत भोगवटयाला मुलूख दिला त्याचा उल्लेख आहे. दुसऱ्या कलमांत हा मुलूख ब्रिटिशाच्या सत्तेखालील संस्थान म्हणून त्यास मान्यता दिली आहे. तिसऱ्या कलमांत सातारा–राज्याचें रक्षण करण्याची हमी ब्रिटिश सरकारनें घेतली असून व राजानें व त्याच्या वारसांनीं त्यांना युद्धप्रसंगीं सर्वप्रकारें साहाय्य करावें असें नमूद करण्यांत आलें. राजानें इंग्रजसरकारच्या संमतीखेरीज आपलें सैन्य कमी अगर जास्त करूं नये अशी चौथ्या कलमांत अट होती. पांचव्या कलमांत राजानें व त्याच्या वारसांनीं कोणत्याहि राजांशीं कसलाहि व्यवहार करतां कामा नये असें नमूद होतें. राजानें आपल्या राज्याचा कारभार आपल्या मर्जीनुरूप करावा, परंतु त्याला सल्लामसलत देण्यासाठीं एक ब्रिटिश अधिकारी असावा, हें सहाव्या कलमांत सांगितलें असून, राज्यांतील जहागीरदारांवर नियंत्रण राजाचें असलें तरी त्यांची हमी ब्रिटिश सरकारनें घेतली आहे, असें सातव्या कलमांत नमूद आहे. आठवें कलम अपराध्यांच्या देवघेवीसंबंधाचें आहे. कोंकणजवळील घाट ही राज्याची त्या बाजूची सरहद्द ठरली

असली तरी त्या प्रांताची पाहाणी होऊन कांहीं हक्क कंपनी राखून ठेवील, हें नवव्या कलमांत असून, व्यापारी संबंधाविषयीं दहावें कलम आहे. अकराव्या कलमांत राजास कोणता मुलूख दिला हें नमूद केलें आहे. या तहनाम्यावर हेस्टिंग्ज्, जेम्स स्टुअर्ट, जे. ॲडॅम्स यांच्या सह्या आहेत.

प्रतापसिंहास दिलेल्या मुलखांत दक्षिणेस कृष्णा व वारणा या नद्या, उत्तरेस नीरा व भीमा, पश्चिमेस सह्याद्रीचे घाट, पूर्वेस पंढपूर व विजापूर प्रांत इतक्यांचा समावेश झाला होता. याखेरीज अक्कलकोट, भोर, औंध, जत व फलटण या जहागिरींत महाराजांचें स्वामित्व मान्य करण्यांत आलें होतें. या तहाचा विश्वकर्मा जो अलपिन्स्टन यानें मुद्दाम हें कलम त्यांत घातलें होतें. तथापि या जहागिरींवरील आपली सत्ता मान्य करण्यासाठीं राजे प्रतासिंह यांना अत्यंत कष्ट पडले. त्यांना इंग्रजांनीं गादीवरून काढून टाकल्यानंतर स. १८४४ सालीं त्यांनीं कोर्ट ऑफ डायरेक्टरांकडे जो खलिता पाठविला त्यांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, “स. १८३२ सालीं लॉर्ड क्लेअर हा मुंबईचा गव्हर्नर असतांना स. १८१९ च्या तहनाम्याप्रमाणें आपली जहागिरदारांवरील सत्ता मान्य करावी असा प्रयत्न केला. लॉर्ड क्लेअर या गोष्टीस अनुकूल नव्हता, परंतु कोर्ट ऑफ डायरेक्टरांनीं तो अधिकार मान्य केला. तथापि लॉर्ड क्लेअर विलायतेस परत जाईपर्यंत वरील निर्णय त्याच्या हातीं पडला नाहीं व प्रश्न तसाच पडून राहिला;” असो.

राजे प्रताप यांच्या सर्व आकांक्षा नष्ट झाल्या, दैवाच्या दुर्घटनेपुढें त्यांस नमावें लागून तहास मान्यता द्यावी लागली व एकदां ती गोष्ट पत्करल्यानंतर त्यानीं राजकारणांत आपलें लक्ष

घातलें व प्रजानुरंजन योग्य रीतीनें होईल असा कारभार चालविला. स. १८२२ सालीं एल्फिन्स्टन हा मुंबईचा गव्हर्नर या नात्यानें साताऱ्यास गेला असतां, प्रतापसिंहाचा कारभार व सुराज्यव्यवस्था पाहून त्यानें धन्योद्गार काढले आहेत. स. १८२६ सालीं राजे प्रताप पुण्यास गेले असतां एल्फिन्स्टननें त्यांचें केलेलें वर्णनहि प्रतापसिंहांच्या आदर्शवागणुकीचें द्योतकच आहे. कित्येक इंग्रजांनीं तर प्रतापच्या राज्याची तुलना रामराज्याशीं केलेली आहे, जनरल रॉबर्टसन् हा कित्येक वर्षे साताराचा रेसिडेन्ट होता व नंतर ईस्ट इंडिया कंपनीचा एक डायरेक्टर झाला. बोर्डाच्या एका सभेंत भाषण करतांना तो म्हणाला,

"In the course of his experience he had never met with a man, Englishman or native of more scrupulous veracity and stricter integrity than the Raja."

कोणत्याहि देशी राजा संबंधानें कधींहि प्रशंसोद्गार काढावयाचेच नाहींत, असें ईस्ट इंडिया कंपनीचें स्पष्ट धोरण होतें. कंपनीला त्यांच्यांत चांगलें असें कांहींच दिसत नव्हतें. तसें कंपनीचें धोरणच नसतें तर देशी राजांविरुद्ध लढाया करण्यास व त्यांचा मुलूख जिंकून घेण्यास कारणें त्यांना कशीं सांपडलीं असतीं ? देशी राजांची निंदा करणें हा त्यांचा राजकीय डाव होता. कंपनीचें हें धोरण अगदीं स्पष्ट असतांहि प्रतापसिंहाबद्दल बोर्डानें प्रशंसोद्गार काढले व त्याच्या उत्कृष्ट राज्यकारभाराबद्दल त्याला तीनहजार पौंड किंमतीची रत्नजडित तलवार नजर करण्याचें ठरलें व त्याप्रमाणें ता. २९ डिसेंबर १८३५ रोजीं बोर्डानें स्वतंत्र ठराव करून तो राजाकडे पाठविला. यापूर्वींहि स. १८२९ व १८३१

मध्यें प्रतापसिंहाच्या राज्यकारभाराबद्दल डायरेक्टरांनीं असेच धन्योद्गार काढलेले आहेत.

राजा प्रताप हा उत्तम राज्यकर्ता होता, परंतु धर्मविषयक कल्पनांमध्यें तो त्या काळच्या मानानें बराच पुढारलेला होता. शिवछत्रपतींनीं 'गोब्राह्मणप्रतिपालक' हें उपपद धारण केलें. त्यांच्या धोरणाप्रमाणें राजा प्रतापचें वागणें झालें नाहीं. त्याच्या डोक्यांत 'वेदोक्त कर्माचें बंड' शिरलें. त्याप्रमाणें त्यानें, आपल्या घराण्याचे चिटणवीस बळवंतराव चिटणवीस यास अग्निहोत्र देऊन त्याजकडून यज्ञ करण्याचा घाट घातला. आजच्या काळांत ही गोष्ट अगदीं सामान्य दिसते व तिला कोणीं फारसें महत्त्वहि देत नसलें तरी, शंभर वर्षांपूर्वींची स्थिति ध्यानीं घेतां महाराजाचें हें बंड ब्राह्मण वर्गास किती बोचलें असेल त्याची कल्पना येईल. याचा अखेर परिणाम असा घोर झाला कीं, प्रतापसिंहाची पदच्युती होण्यास जीं अनेक कारणें घडलीं त्यांत या वेदोक्ताला प्राधान्य देण्यांत आलें आहे.

या वेदोक्त कामांत ब्राह्मण समाजानें भाग घेण्याचें नाकारलें. तेव्हां प्रतापसिंहानें ब्राह्मणांचा मनस्वी छळ केला. त्यांपैकीं कित्येकांना तुरुंगात घातलें. तेव्हां कांहीं पळून, सांगलीकर चिंतामणराव यांचेकडे आश्रयाला गेले. महाराजांचें म्हणणें आपण क्षत्रियकुलावतंस, उदेपूरच्या राजवंशापैकीं असल्यानें आपणांस वेदोक्ताचा सर्वाधिकार आहे; परंतु महाराष्ट्रांतील मराठ्यांना हे अधिकार नाहींत व 'नंदान्तं क्षत्रियकुलम्' हें वचन आधारास घेऊन ब्राह्मणसमाज वेदोक्तास मान्यता देईना. ब्राह्मणांची ही वृत्ति गेलीं दहा वर्षेंपर्यंत कायम होती; मग त्यावेळीं ती किती तीव्र असेल याची कल्पना करतां येण्याजोगी आहे. स. १८२० च्या सुमारास संकेश्वराचे शंकराचार्य माहुलीला गेले असतांना, प्रतापसिंह त्यांच्या भेटीस गेला नाहीं व त्यांचा योग्य

सत्कार त्यानें केला नाहीं; यामुळेंहि ब्राह्मणसमाज रुष्ट झाला. बळवंतराव चिटणवीस हा महाराजांचा पिढिजाद चिटणीस. त्यानें वेदोक्त-प्रकरणांत प्रामुख्यानें भाग घेतल्यानें एल्फिन्स्टनच्या कृपेंतील बाळाजीपंत नातू व चिटणवीस यांमध्यें वाद सुरू झाला. अखेरीस ग्रँट यानें नातूचें तेथून उच्चाटन केलें, तेव्हां वाद जरा थांबला.

परंतु पुनः स. १८२४ मध्यें हाच वाद रंगाला आला. नातूचे आप्त नीलकंठशास्त्री, साताऱ्चे रेसिडेन्टचे विश्वस्त आबा जोशी, वांईचा नागूदेवराव वैद्य व त्यांना सहाय्यकारी सांगलीचे चिंतामणराव पटवर्धन, यांनीं संगनमत करून प्रभु लोकांविरुद्ध काहूर केलें. शंकराचार्यांनीं प्रभूलोकांविरुद्ध ता. २६ नोव्हेंबर १८२६ रोजीं आज्ञापत्र काढलें. तें काढण्यास वरील गृहस्थ कारणीभूत झाले होते, असें पुढें स्वामींनींच कबूल केलें. हा प्रकार सुरू असतां, सांगली, कोल्हापूर व संकेश्वर येथील मंडळींशीं प्रतापसिंहानें गुप्त कारस्थानें सुरू केलीं आहेत, असा रिपोर्ट नातूनें रेसिडेन्ट क. ब्रिग्ज याजकडे केला. ब्रिग्ज यानें त्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. पुढें त्याच्या जागीं कर्नल रॉबर्टसन रेसिडेन्ट आला. दरम्यान स. १८२६ मध्यें नागू वैद्य हा संकेश्वरस्वामींबरोबर गोव्याला गेला.

सर जॉन माल्कम् हा दक्षिण भागांत फिरतीवर आला असतां, रहिमतपुराजवळ सुमारें दहा हजार ब्राह्मणांनीं त्यास गराडा देऊन "प्रभु व ब्राह्मण यांमधील वाद मिटवावा. कारण महाराजांनीं प्रभु लोकांची बाजू घेतली असल्यानें त्यांजकडून न्याय मिळण्याची आशा नाहीं" अशी तक्रार केली; तेव्हां प्रभु लोकांनींहि उलट तशीच तक्रार केली. त्यावर वाद पंचायतीतर्फे सोडवावा असा प्रयत्न करण्याचें माल्कम्नें आश्वासन दिलें. पण हा वाद असाच चिघळत राहिला.

लॉर्ड क्लेयर हा बदलून त्याच्या जागीं सर रॉबर्ट ग्रांट हा गव्हर्नर झाला. लॉर्ड क्लेयर हा प्रतापसिंह राजाबद्दल थोडी सहानुभूति बाळगणारा होता. त्याच्या उलट ग्रँट होता. कंपनीच्या डायरेक्टर बोर्डानें राजाची प्रशंसा केली, त्यास रत्नजडित तलवार अर्पण केली; परंतु या बहाद्दर ग्रांटनें या गोष्टींचा मागमूसहि प्रतापसिंहास लागूं दिला नाहीं. खूप गोडगोड थापा माराव्या, जहागिरीसंबंधानें तुमचें काम ताबडतोब करून टाकतों म्हणून आश्वासनें द्यावींत, परंतु प्रत्यक्ष हातून कांहींहि कृति करूं नये असा त्याचा खाक्या होता. ज्याच्या नांवाचें मुंबईचें ग्रँट मेडिकल कॉलेज स्थापन झालें आहे, तो महानुभव हा ! राजा भेटीस गेला, त्याच्या परत भेटीस न जाणें, यासारखे राजाच्या मनास लागणारे दुसरे प्रकार तो करी. जहागिरीबाबत ग्रँट कडून आपलें काम होत नाहीं असें दिसतांच, आपण कोर्ट ऑफ डायरेक्टरांकडे आपला प्रतिनिधी पाठविणार असें राजानें ग्रँट यास सांगितलें. हें ऐकतांच मात्र ग्रँट घाबरला. कारण राजाचा प्रतिनिधी तेथें गेला तर डायरेक्टरांनीं राजाचा केलेला गौरव, त्यास दिलेली तलवार, आपण दाबून बसलों, हे सर्व प्रकार चव्हाट्यावर येऊन आपलीच बेइज्जत होणार, अशी ग्रँटची खात्री होती. तेव्हां त्यानें राजाचा नाश करण्याचा व्यूह रचण्यास सुरुवात केली.

या कामीं त्याला योग्य सहाय्यकर्ता नातू हा मिळाला. पेशवे मोडल्यावर महाराजांचें पेशवेपद आपणास मिळावें अशी नातूनें फार खटपट केली. तो पेशवा होता तर इंग्रजांसही तो नको होता असें नाहीं. परंतु प्रतापसिंहास नातूचा अत्यंत तिटकारा असल्यानें, त्याच्या इच्छेविरुद्ध ग्रँट (रेसिडेंट) यास त्याची नेमणूक करतां येईना. तेव्हां त्यानें त्यास पुण्यास पाठवून दिला. परंतु

सातारा-दरबारांतील बातम्या कळविण्यासाठीं आपला एक आप्त त्यानें तेथें ठेवला व त्याचा ब्रिटिशांस चांगला उपयोग होई, असें जनरल ब्रिग्ज यानेंच लिहिलें आहे. ग्रँट व राजा प्रतापचें बिनसलेलें पाहतांच स. १८३५ च्या सुमारास नातूनें महाराजांचे भाऊ अप्पासाहेब यांच्याशीं संधान बांधलें. ग्रँट व त्याचा सेक्रेटरी विलोग्बी हे खरे सूत्रचालक. त्यांनीं बाळाजीकरवीं पुढील नाश घडवून आणला.

या शोकपर्यवसायी नाटकाचा प्रथमांक, कर्नल लॉड्विक हा साताराचा रेसिडेन्ट असतांना झाला. त्याच्या पूर्वी कॅप्टन ग्रँट, जनरल जॉन ब्रिग्ज व कर्नल रॉबर्टसन यांच्या कानांवरहि प्रतापसिंहाबद्दल अनेक गोष्टी येत. परंतु त्यांनीं तिकडे फारसें लक्ष दिलेंच नाहीं. मात्र कर्नल लॉड्विक हा वेगळ्याच प्रकृतीचा गृहस्थ होता. त्याच्या कानावर बाळाजी नातू व त्याचे हस्तक यांनीं अशा बातम्या घातल्या कीं, प्रतापसिंह हा सातारा येथील ब्रिटिश पलटणींतील कांहीं अधिकारी फोडण्याच्या उद्योगांत आहे. लॉड्विकनें या गोष्टींतील सत्यांश किती याचा शोध न घेतां, वरील बातम्यांच्या आधारावर मुंबई-सरकारकडे रिपोर्ट केला. लॉड्विकचें मन राजाबद्दल शुद्ध नसण्याला कारण असें होतें कीं, रेसिडेन्टची संमती घेतल्याखेरीज इंग्लंडला व कलकत्त्याला आपला वकील पाठवून, आपल्यावर चाललेल्या अन्यायांची दाद लावून घेण्याचा प्रयत्न राजानें केला, ही गोष्ट रेसिडेन्ट लॉड्विक यास अपमानास्पद वाटली व तशा अर्थाचें त्यानें एक पत्र ता. २० जून १८३६ रोजीं मुंबईसरकारला पाठविलें. या पत्रांत लॉड्विकनें राजावर भलते आरोप केले नाहींत, परंतु राजाचें वर्तन निषेधार्ह आहे म्हणून त्यांत लिहिलें.

सर रॉबर्ट ग्रांट याला, प्रतापसिंह, इंग्लंडला आपला मनुष्य पाठविणार, असें समजतांच त्याचें धाबें दणाणून गेलें व राजाच्या नाशाचा कट करण्याचें त्यानें ठरविलें. त्याला लॉड्विकचें पत्र आयतेंच आधारभूत झालें व लष्करांतील अधिकाऱ्यांच्या जबान्या ध्या असा हुकूम लॉड्विकला देण्यांत आला. तो येतांच लॉडविकनें राजाला या गोष्टीची कांहीं एक दाद लागू न देतां, साताऱ्यांतील कांहीं लष्करी अधिकाऱ्यांच्या जबान्या घेतल्या. मुंबई सरकारनें लॉड्विकला पत्र लिहिल्यानंतर लागलीच ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरबोर्डाच्या 'सिक्रेट कमिटी'ला १५ सप्टेंबर १८३६ रोजीं एक पत्र लिहून, राजा प्रतापसिंह लष्करांतील लोकांना फितवून हिंदुस्थानांतून ब्रिटिश सत्ता उखडून टाकण्याचा मोठा कट करीत असल्याचें कळविलें. बोर्डानें राजावरील आरोपाची चौकशी करण्यासाठीं एक कमिशन नेमिलें. या कमिशनचें काम सातारा येथें गुप्तपणें चाललें होतें. त्यासंबंधानें मुंबईसरकारच्या चिटणिसानें एक पत्र ता. १० आक्टोबर १८३६ रोजीं रेसिडेन्टला लिहिलें. त्या पत्रांत राजाला आपला बचाव करण्यास कसलाहि पुरावा मिळूं नये अशी दक्षता घेण्याबद्दल सूचना आहे.

राजाच्या या चौकशी-कमिशनमध्यें फिर्यादी रेसिडेन्ट लॉड्विक्, मि. विलोग्बी (मुंबई सरकारचा चिटणीस, यानें ता. १५ सप्टेंबर १८३६ रोजीं कोर्ट ऑफ डायरेक्टरांना पत्र लिहून, राजा कंपनीशीं बेइमान झाल्याबद्दल कळविले होतें), ले. क. इव्हान्स, (हा गृहस्थ अत्यंत अप्रामाणिक, बऱ्यावाईट गोष्टींचा विधिनिषेध न बाळगणारा असा होता.) अशा त्रयींपुढें राजावरील आरोपांची चौकशी झाली. राजावरील आरोप असे होतेः—

" राजानें एका ब्राह्मणाच्या मध्यस्थीनें सुभेदार शिवगुलामसिंग

याला गांठून शिंदे व इतर राजेरजवाडे व देशी सैन्य मिळवून ब्रिटिशांना हाकून देण्याची सिद्धता केली आहे. सातारच्या सैन्यानें उठावणी केली पाहिजे असें राजाच्या वतीनें बोलणें झालें. हवलदार चंदुसिंग, सुभेदार गुलजार मिसर वगैरेंशींहि असेंच बोलणें झालें. राजानेंच या गोष्टी घडवून आणल्या. ब्रिटिश राज्य उलथून टाकण्याचा राजाचा कट होता."

जे फिर्यादी तेच न्यायाधीश असा प्रकार होता. कटहि असाच बनावट होता, मग साक्षीदार बनावट होते हें सांगावयास नकोच! कारण पुढें कांहीं दिवसांनीं या कमिशनचा प्रमुख लॉड्विक यानें उघडपणें असें प्रसिद्ध केलें कीं, "साक्षीदारांनीं साक्षी खोट्या दिल्या व अशा कमिशनच्या निवाड्यावर मीं सही केली याबद्दल मला आमरणान्त पश्चात्ताप होत राहील."

साक्षीदारांच्या उलट तपासण्या झाल्या नाहींत. चौकशीच्या वेळीं राजाला आपला प्रतिनिधी हजर ठेवण्यास मनाई करण्यांत आली. त्याला साक्षीच्या नकला दिल्या नाहींत. अशी वस्तुस्थिति असतांहि कमिशनरांनीं मुंबई सरकारला असा बेदिक्कत रिपोर्ट केला कीं, "राजाला आपल्या वरील आरोप नाशाबीत करतां आले नाहींत."

मुंबई सरकारच्या प्रेरणेनेंच जर हा फार्स झाला तर त्याचें पर्यवसान काय होणार हें ठरल्यासारखेंच होतें. मुंबई सरकारनें राजाला अपराधी ठरविलें. कमिशनचें काम ता. १२ आक्टोबर ते ४ नोव्हेंबर १८३६ असे २१ दिवस चाललें होतें. राजाचे दिवाण गोविंदराव यांना राजाच्या संमतीखेरीज अटक करून तुरुंगांत टाकले व फौजेंत फितुर करण्याचा त्यावर आरोप ठेवला. असें म्हणणारे साक्षीदार समोर आणा असें दिवाणांनीं आव्हान करतांच, त्यास सातार्‍याहून पुण्यास नेऊन ठेवलें. कमिशनचें कृष्णकृत्य केल्यानंतर मात्र लॉड-

विक याला ती गोष्ट खाऊं लागली व त्यानें ता. १३ सप्टेंबर १८३९ रोजीं मुंबई सरकारला पत्र लिहिलें त्यांत असें म्हटलें आहे कीं, "गेलीं दोन वर्षें जहागिदारांच्या स्वामित्वासंबंधीं जो वाद चालला आहे त्यामुळें राजाचें डोकें ठिकाणावर नाहीं. त्या भरांत त्याच्या हातून कांहीं गोष्टी घडल्या असल्यास त्याच्यावर दया करावी, असें मला वाटतें."

लॉडविकचें मन राजाकडे झुकूं लागलेलें पाहतांच, लॉडविकवर टपका ठेवून त्याचीच उचलबांगडी साताऱ्याहून केली. लॉडविकनें डायरेक्टरांच्या बोर्डाला ता. ९ आक्टोबर १८४० रोजीं एक पत्र लिहिलें. त्यांत रॉबर्ट ग्रांटचें कारस्थान सुंदरपणें चव्हाट्यावर आणलें आहे. त्या पत्रांत लॉडविक लिहितो, "देशी सैन्यांतील अधिकाऱ्यांना राजाची गांठ घेऊं द्यावी, त्यांच्याकडून राजाला सांगवावें कीं, असा असा कट केला तो फुटला, आपण आमचें संरक्षण करा. त्यासाटीं राजाच्या सही शिक्क्यानिशीं त्यांना दाखला द्या;" अशा आशयाचें सूचनात्मक टिपण मला रॉबर्ट ग्रांट यानें पाठविलें.

लॉडविकच्या जाग्यावर कर्नल ओव्हान्स याची नेमणूक करण्यांत आली. क. ओव्हान्स हा राजाविरुद्ध नेमलेल्या कमिशनमध्यें होता. याची नेमणूक करण्याचें कारण अगदीं उघड होतें. याला नेमल्यावर त्यानें राजाशीं कसें वागावें याबद्दल सेक्रेटरी विलोग्बी यानें पत्र लिहिलें त्यांत तो म्हणतोः—

"In all your communications with the Raja, Government are of opinion that you should be reserved and distant."

राजाविरुद्ध नेमलेल्या कमिशनचा एक सभासद (रेसिडेन्ट ओव्हान्स) वर दर्शविल्याप्रमाणें मुंबई सरकारच्या हुकुमान्वयें

राजाशीं वागूं लागला, तर राजाला त्याबद्दल प्रेम कसें वाटावें व त्याबद्दल विश्वास तरी कसा वाटावा ?

दिवाणाची आई गिरजाबाई इनें कांहीं माहिती मुंबईसरकारला कळविली. ती माहिती दिवाणाची जाचांतून सुटका व्हावी या बुद्धीनेंहि गिरजाबाईनें दिली असण्याचा संभव आहे; परंतु त्या जोरावर कारस्थानास सुरवात झाली. ओव्हन्स याला सूचना झाल्याप्रमाणें तो वादळ शांत न करतां प्रकरण विकोपास नेण्याच्या तयारीस लागला. स. १८१९ च्या तहाप्रमाणें रेसिडेन्ट हा नुसता मह्लागार असावयाचा, परंतु ओव्हान्सनें प्रथम हें कलमच झुगारून दिलें. त्यानें आपल्या हाताखालीं कॅ. डच्चूरॅक नांवाच्या अधिकाऱ्यास राजाविरुद्ध पुरावा तयार करण्याच्या कामावर नेमलें व त्यानें भाऊ लेले नांवाच्या इसमास पैसे चारून राजाविरूद्ध पुरावा तयार केला. यासंबंधानें राजाची बाजू डायरेक्टरापुढें मांडतांना रेसिडेन्टाच्या कृष्णकारस्थानांचें वर्णन मि. थॉम्सन यानें ता. २४ सप्टेंबर १८४५ रोजीं केलेल्या भाषणांत उत्कृष्ट केलें आहे.

ओव्हान्स रेसिडेन्ट होतांच त्यानें दिवाण गोविंदरावाला पुण्याहून नगरच्या किल्ल्यांत तुरुंगात डांबून व तेथें त्याचे अनन्वित छळ करून, त्याजकडून अवश्य तो कबुलीजबाब लिहून घेतला. याखेरीज मुंबई सरकारच्या हुकुमावरून त्यानें साताराचे अनेक लोक तुरुंगांत घातले. गुप्तपणानें पुरावे तयार केले व त्यांच्या आधारावर राजावर दोषारोप करण्यांत आले. राजानें आपल्याविरुद्ध झालेल्या साक्षींच्या नकला अनेक वेळां मागितल्या; परंतु कमिशनची चौकशी गुप्त असल्यानें नकला देतां येत नाहींत असें उत्तर देण्यांत आलें.

पूर्वीच्या कमिशननें देशी सैन्यांत फितवाफितवी केल्याचा राजावर आरोप ठेवला होता. ओव्हान्स बहादुरानें आणखी नवे आरोप

राजावर लादले व ते म्हणजे राजानें पोर्तुगीज व्हाईसरायाशीं इंग्रजांचें हिंदुस्तानांतून उच्चाटन करण्याचें कारस्थान केलें व तसेंच नागपूरच्या माजी राजाशीं ( आप्पासाहेब ) संगनमत करून त्याकरवीं रशीयन व तुर्कांचें साहाय्य मागितलें. हे दोन आरोप राजाला पदच्युत करतांना सांगण्यांत आले. महाराजांविरुद्ध कागदपत्र व त्यांचे शिक्के तयार करणाऱ्या एका बदमाशाला माफी देऊन त्याला ४०० रुपये बक्षीसादाखल देण्यांत आले. पोर्तुगीजांच्या गव्हर्नरानें स्पष्टपणें खुलासा केला कीं, माझ्या नांवावर जीं पत्रें राजाविरुद्ध पुढें आणलीं जात आहेत तीं माझीं नव्हेत व साताराच्या राजाशीं मीं कसलाच पत्रव्यवहारहि पण केला नाहीं. राजाचा पत्रव्यवहार ओव्हान्स मध्येंच फोडी.

राजाविरुद्ध असें कारस्थान चाललें असतां, राजा निरापराधी आहे असें म्हणणारे त्याचे कांहीं हितचिंतकहि मुंबईदरबारीं होते. सर्जन जनरल डॉ० मिल्टन, कॅ. कोगन, मुंबई-गॅझेटचे संपादक मॅक्डोनाल्ड यांना राजाचें निरपराधित्व पूर्णतः पटलें होतें. डॉ० मिल्टन यानें मुंबई सरकार व हिंदुस्थानसरकारला तसें कळविलेंही, परंतु तिकडे कोणींच लक्ष दिलें नाहीं. तेव्हां राजानें विलायतेला सय्यद मीर अफजलअल्ली, यशवंतराव राजे शिर्के, भगवंतराव विठ्ठल व रंगो बापूजी असे चार वकील पाठविले.

प्रथम सय्यद मीर यास पाठविलें; त्याच्यानें कांहींच काम न झाल्यानें मागाहून दुसरी मंडळी पाठविली. या गोष्टीचा मुंबई सरकारला राग येऊन त्यानें या शिष्टमंडळाला मनस्वी त्रास दिला. रंगो बापूजी यानें यासंबंधानें प्रसिद्ध केलेली कैफियत मोठी मनोरंजक आहे. ओव्हान्सनें राजाविरुद्ध चालविलेल्या कारवाईबद्दल

ग्रँट त्याला वरचेवर शाबासक्या देत होता. सातारच्या राज्याचा नाश हें त्याचें धोरण निश्चित झालें होतें. त्या संबंधानें तो लिहितो,

" An opinion is now very commonly entertained that the erection of Satara into a separate principality was a mistaken proceeding. It is at least clear that this principality includes the finest part of the Deccan and by its position most awkwardly breaks the continuity of the British territory. There are those, therefore, who will hail the present crisis as affording an excellent opportunity of repairing the error alluded to, by pulling down the inconvenient pageant we have erected."

राज्याचा नाश करण्याचीं कारणें वरील अवतरणांत स्पष्ट झालीं आहेत. सर रॉबर्ट ग्रँट यानें राजाविरुद्ध एक मिनिट ता. ३१ मे १८३८ रोजीं लिहिलें, त्यांत तो म्हणतो, " गोवा सरकार व जोधपूरवाले यांशीं राजानें कट केला, याला मी फार महत्त्व देत नाहीं; परंतु त्यानें सैन्यांत फितुरीचा प्रयत्न केला, हा त्याचा घोर अपराध होय. बाजीरावाला जें प्रायश्चित्त मिळालें तेंच राजाला मिळणें इष्ट आहे" राजाचा भाऊ आपासाहेब यास गादीवर बसवावा हेंहि त्यास संमत नव्हतें. त्याच्या मतानें राजा आपले सर्व हक्क गमावून बसला होता. ग्रँट म्हणतो, " राजाला पदच्युत करून तो मुलूख आपल्या मुलुखांत जोडावा व एक जाहीरनामा काढून राजाचा अपराध किती घोर होता हें स्पष्टपणें प्रसिद्ध करावें." साताऱ्याबरोबर गोवाप्रांतहि खालसा करावा अशी त्यानें शिफारस केली. गोव्यासंबंधींचा बनावट पत्रव्यवहार हा ओव्हान्सनें ग्रँटच्या साहाय्यानें तयार केला असा प्रवाद आहे.

राजाला योग्य न्याय मिळूं नये अशाविषयीं ग्रँटनें फार दक्षता घेतली. राजावर जर आरोप आहेत तर त्यांची योग्य चौकशी व्हावी,

त्याला फिर्यादीच्या साक्षी पुराव्याच्या नकला मिळाव्यात, असा पुष्कळ अधिकाऱ्यांचा आग्रह होता. परंतु ओव्हान्सनें तो साधूं दिला नाहीं. राजाला आपलें म्हणणें मांडण्याची संधीहि देण्यांत आली नाहीं. लॉर्ड ऑक्लंडनें सर्व कागदपत्र पाहून राजावर कसलाच आरोप सिद्ध होत नाहीं असा अभिप्राय व्यक्त केला. राजा चौकशीला मुळींच भीत नव्हता तर उलट 'माझी खुली चौकशी करा' अशी त्याची मागणी होती; परंतु सरकारी अधिकाऱ्यांच्या पोटांत भीति असल्यानें ते त्या दिव्यास तयार नव्हते. कारण चौकशी सुरू होतांच आपलीं कारस्थानें बाहेर पडणार ही ओव्हान्सची खात्री होती.

राजावर कोणते आरोप करण्यांत आले आहेत त्यासंबंधीची लेखी माहिती राजाला द्या, अशी ग्रँटनें ओव्हान्सला सूचना केली असतां तीहि त्यानें धाब्यावर बसविली. राजाला न्याय मिळतां कामा नये अशीच त्याची इच्छा होती. राजा प्रतापला शिक्षा झालीच पाहिजे; कारण तो आपणांस हिंदुपदपातशहा म्हणवी. मोठा महत्त्वाकांक्षी होता तो. अर्थात् असा मनुष्य ब्रिटिश अधिकाऱ्यांस पटावा कसा ? राजाचा मनस्वी छळ करणारा ग्रँट मात्र ता. ९ जुलै १८३८ रोजीं पुण्याजवळ दापुडी येथें मरण पावला. नंतर त्याचें भूत तेथें दिसें असें मि. जेम्स डग्लस यानें लिहिलें आहे !

ग्रांटच्या मागून सर जेम्स रिव्हेट कारनॅक हा मुंबईचा गव्हर्नर झाला. यापूर्वी तो ई. इं. कंपनीचा डायरेक्टर व कांहीं दिवस चेअरमनहि होता. तो डायरेक्टर असतांना प्रतापसिंहाच्या प्रशंसेचा ठराव करून त्याला रत्नजडित तलवार अर्पण करण्याचा ठराव बोर्डानें केला. त्यावर बोर्डाचा उपाध्यक्ष या नात्यानें त्याची सहीहि होती. हा स्वतः चेअरमन असतांना जहागिरदारांवरील राजाची सत्ता मान्य करण्यांत आली. त्या ठरावावर ता. ७-२-१८३८ ची

त्याचीच सही होती. याशिवाय त्याला गव्हर्नरच्या जागेवर नेमला तेव्हां डायरेक्टरांनीं त्याला स्पष्ट सूचना दिली होती कीं,—

"We have no hesitation in giving it as our decided opinion, that would be not only a waste of time but seriously detrimental to tho character of our Government to carry on any further inquiry in the matter."

राजाच्या संबंधांत कसलीहि चौकशी करूं नका असा कंपनीनें स्पष्ट इशारा दिला असतां, कारनॅक त्याप्रमाणें वागला नाहींच. कारनॅक लांचखाऊ असल्यानें राजाच्या हितशत्रूंनीं त्याची मूठ भरली व तो त्यांच्या आहारीं गेला. तो स्वत: सातारा येथें गेला व ता. २२ २४ व २६ ऑगष्ट १८३९ रोजीं त्यानें राजाची भेट घेऊन कोणत्या अटींवर राजाला माफी करण्यांत येईल तें सांगितलें. प्रतापसिंहाला हा सर्वच प्रकार अभिनव वाटला. तो अत्यंत स्वाभिमानी व तेजस्वी पुरुष होता. त्यानें आपली कैफियत दिली, तींत "सर्व आरोपांचा धिक्कार करून मजवर आरोप सिद्ध होईपर्यंत मी राजसंन्यास घेतों, पण भलते आरोप मात्र सहन करणार नाहीं" असें उत्तर दिलें.

कारनॅकनें राजाला जो खलिता दिला त्यांत असें म्हटलें आहे कीं, "तुमच्यावर फार गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यांत आले त्याची चौकशी सरकारनें केली; त्यावरून असें आढळून आले आहे कीं, तुम्ही दुष्ट सल्लागारांच्या नादीं लागून तहनामा मोडला. त्यामुळें ब्रिटिश सरकारच्या स्नेहसंबंधास बाधा आली आहे. परंतु आलेल्या आपत्तींतून तुमची सुटका व्हावी म्हणून सरकारनें खालील अटींवर तिकडे दुर्लक्ष करण्याचें ठरविलें आहे.

१. ता. २५ सप्टेंबर १८१९ च्या तहान्वयें तंतोतंत वागेन व इंग्रजांना अधिराजे म्हणून मानीन.

२. आप्पासाहेबांला तनखा देऊन त्यांची खाजगी मिळकत त्यांच्या स्वाधीन करीन.

३. बळवंतराव चिटणविसास नोकरीवरून कमी करून राज्यांत इंग्रजांच्या परवानगीखेरीज राहूं देणार नाहीं.

४. यादींत दर्शविलेल्या लोकांना कसलाही त्रास देणार नाहीं. (राजाविरुद्ध कारस्थानांत असलेले हे सर्व लोक होते).

या सर्व अटी मान्य केल्यास ब्रिटिश सरकार कृपावंत होऊन सर्व अपराध पोटांत घालून सातारा राज्याला धक्का लावणार नाहीं."

राजा प्रतापला या अटी अर्थातच मान्य झाल्या नाहींत. आपण कसलाही गुन्हा केला नाहीं असें त्यानें वारंवार निक्षून सांगितलें. कारनॅक साहेब आपल्या अटींत माघार घेईना. अखेर ता. ९ सप्टेंबर १८३९ रोजीं राजा प्रतापसिंहाला पदच्युत करण्यांत आलें.

कारनॅकच्या या कृत्याला हिंदुस्थानसरकारनें व कोर्ट ऑफ डायरेक्टरांनींहि मान्यता दिली. त्यानें आप्पासाहेबास गादीवर बसविलें व त्याच्याकडून जहागिरीवरचा हक्क कंपनीच्या ताब्यांत घेतला !

प्रतापसिंहाला गादीवरून काढतांच त्याची रवानगी साताऱ्याहून काशी येथें करण्यांत आली. तेथें त्याला दरमहा दहा हजार रुपये तनखा देण्याचें ठरलें. राजाची खासगी मिळकत त्याला देण्याचें आश्वासनहि देण्यांत आलें ! काशीला जाण्यापूर्वीं कांहीं दिवस राजाला साताऱ्या जवळील लिंब या गांवीं ठेवण्यांत आलें. तेथून ता. ७ डिसेंबर १८३९ रोजीं त्याला ले० क्रिस्टल नांवाच्या अधिकाऱ्यासमवेत बनारसला पाठविण्यांत आलें. तेथें ता. २५ मार्च १८४० रोजीं तो पोहोंचला. राजाबरोबर त्याचा आप्त बाळासाहेब सेनापती यास सक्तीनें पाठविण्यांत आलें. त्यावेळीं सेनापतींची

प्रकृती बिघडली होती. त्याची बायकोहि गरोदर होती. अशा स्थितींत त्याची रवानगी करण्यांत आली. ले. क्रिस्टल याच्यांत माणुसकीचा सर्वथा अभाव होता. त्याच्या हलगर्जीपणामुळें वाटेंत सेनापतीचा मृत्यू झाला. त्याच्या बायकोला वाटेंत प्रसववेदना सुरू झाली तरीहि तो मुक्काम करीना. अखेरीस त्या वनवासी राजाच्या सेनापतीच्या स्त्रीस रस्त्याच्या कडेस बाळंत व्हावें लागलें!

अशा रीतीनें हा दुर्दैवी राजा बनारसला पोहोंचला व तेथें त्याचा ता. १४ आक्टोबर १८४७ रोजीं मृत्यु होई पर्यंत तो न्यायसंपादनासाठीं झगडत होता. या कामीं त्याला अत्यंत मनःपूर्वक कोणीं सहाय्य केलें असेल तर तें रंगो बापूजी या त्याच्या निष्ठावन्त नोकरानें. रंगो बापूजी यानें विलायतेंत जाऊन तेथें इंग्रजी शिकून तेथें वृत्तपत्रांतून, जाहीरसभांतून, ई० इं० कंपनीच्या डायरेक्टर बोर्डापुढें खटला मांडण्याची मनस्वी शिकस्त केली. कागदपत्र प्रसिद्ध करून राजाची बाजू सत्य कशी आहे व हिंदुस्थानांत अधिकाऱ्यांनीं कसा अन्याय चालविला आहे, यासंबंधानें मनुष्य प्रयत्नांची शिकस्त केली. या कामीं 'दि ब्रिटिश फ्रेंड ऑफ इंडिया' या पत्रानें सर्वतोपरी पाठिंबा दिला. मि. थॉम्सन, डॉ. मिल्टन, जनरल जॉन ब्रिग्ज, मि. बाबर, इत्यादि गृहस्थांनीं त्यास अनेक प्रकारें साहाय्य केलें. परंतु रंगो बापूला माशानें गिळलेलें माणिक परत मिळवितां आलें नाहीं व तो अत्यंत निराश होऊन ब्रिटिशांकडून न्याय मिळण्याची आशा नाहीं अशा भावनेनें परत आला.

सातारा-राज्याच्या उलाढालींत प्रस्तुत लेखकाच्या पितामहांचा (कृष्णाजी सदाशिव यांचा) बराच संबंध आलेला आहे. बाळाजीपंत नातू व क० ओव्हान्स यांनीं लोकांवर जुलूम कसा चालविला व लांचलुचपत कशी घेतली यासंबंधानें मुंबई-सरकार, हिंदुस्थानसरकार

व कोर्ट ऑफ डायरेक्टर्सपर्यंत कृष्णाजीपंतांनीं झगडा केला. त्यांत रंगो बापूजींचें त्यांना मोठें साहाय्य झालें. त्या प्रकरणाचे मूळ कागदपत्र लेखकाच्या संग्रहीं आहेत. त्यांत रंगो बापूजीच्या विश्वप्रयत्नाची योग्य कल्पना येते. रंगो बापूजींचें मोडी हस्ताक्षर म्हणजे मोत्यांच्या ओळी आहेत. त्याचप्रमाणें ' दि ब्रिटिश फ्रेंड ऑफ इंडिया ' या वृत्तपत्राचे तत्कालीन अंकहि माझे संग्रहीं असल्यानें रंगो बापूच्या प्रयत्नाची चांगली कल्पना येते; असो.

राजा प्रतापला पदच्युत केल्यानंतर, ब्रिटिश सरकारनें सात कलमी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यांत, बाजीरावाला जिंकून त्याच्या कैदेंतून ( ! ) आपण प्रतापसिंहाला सोडवून सिंहासनावर बसविलें; परंतु अखेरीस तो कृतघ्न होऊन त्यानें फंदफितुरी केली, त्यामुळें त्याच्या गादीवर आप्पासाहेब यांना गादीवर बसविलें इ० मजकूर आहे. आप्पासाहेबाचें राज्यारोहण ता. १८नोव्हेंबर १८३९ रोजीं मोठ्या समारंभानें करण्यांत आलें.

आप्पासाहेब हा दुर्बल, कमकुवत व व्यसनासक्त राजा होता. सर्व राज्यकारभार तो वस्तुतः रेसिडेन्ट व बाळाजीपंत नातूच्या करवीं चालवी. तो राजकारणांत मुळींच लक्ष घालीत नसल्यानें रेसिडेन्टास तो सहजच आवडूं लागला व त्याच्या नांवावर तो वाटेल तसा कारभार करूं लागला. राजाच्या हातून, सतीला बंदी, ब्रिटिश नाणें आपल्या राज्यांत चालविण्याला परवानगी, गरिबासाठीं दवाखाना, रस्ते, पूल, वगैरे गोष्टी त्यानें घडविल्या. आपला राजवाडाहि राजानें या वेळीं बांधला. एकंदरींत ब्रिटिश सरकारला त्याच्या विरुद्ध तक्रारीला जागा राहिली नाहीं.

कर्नेल ओव्हान्स व बाळाजीपंत हेच खरेखुरे राज्यकर्ते होते. त्यांनीं लोकांचा छळ आरंभला. पार्लमेंटरी कागदपत्रांत या प्रकर-

णावर भरपूर प्रकाश पाडण्यांत आला आहे. हे उभयतां लोकांस कसें छळीत हें तपशिलवार लिहून कृष्णाजी सदाशिव भिडे यांनीं मुंबई सरकार, हिंदुस्थानसरकार व ईस्ट इंडिया कंपनीकडे फिर्याद करून दाद् मागितली व या प्रकारची चौकशी करा अशी मागणी केली. नातूनें जहागिरदार, इनामदार व इतर प्रजाजन यांना भीति, धाकदपटशा दाखवून खूप पैसा मिळविला. कर्नल ओव्हान्स यानेंहि आप्पासाहेब महाराजांकडून खूप पैसा उपटला. विलायतेंत प्रतापसिंहानें खटला चालविला आहे, त्याला तोंड देण्यासाठीं आपलाहि वकील तेथें पाहिजे अशी आप्पासाहेबांची समज करून देऊन, ओव्हान्सनें आपल्या सासऱ्याला महिना १५०० रुपये चालू केले. सासऱ्याच्या मृत्यूनंतर ती तैनात आपल्या मेहुण्याला सुरू केली. रेसिडेन्टाचीं बायकामुलें विलायतेस परत निघालीं, तेव्हां पन्नास हजारांचे अलंकार व द्रव्य रेसिडेन्टाला मिळालें.

भिडे यांनीं, मी हे सर्व आरोप सिद्ध करण्यास तयार आहे असें म्हणून सरकारनें मागितलेला १ हजारांचा जामीन व पांच हजारांचा जातमुचलका दिला; परंतु या प्रकरणांत हात घातला तर बाजू आपल्यावर शेकणार, ही खात्री असल्यानें, सरकारनें या प्रकरणांत चौकशी न करतां फिर्याद काढून टाकली. उभयतांच्या या छळानें आप्पासाहेबहि गांजून गेले होते; परंतु त्यांना त्यांच्याविरुद्ध प्रत्यक्ष कांहींच करतां येत नव्हतें. अशा रीतीनें काळ कंठीत असतां ता. ५ एप्रिल १८४८ रोजीं आप्पासाहेब कैलासवासी झाले. त्यांना पुत्र नव्हता म्हणून ते आजारी पडतांच, सातारा येथील डॉ० मरे याच्या समक्ष त्यांनीं अंबूजी भोसला शेडगांवकर यांचा पुत्र व्यंकटराव यास दत्तक घेतलें. यावेळीं रेसिडेन्ट फ्रीयर सातारा येथें नव्हता, म्हणून हा दत्तविधानसमारंभ डॉ० मरे

याच्या समक्ष झाला. त्यासंबंधीं डॉ. जे. मरे यानें ता. ५ एप्रिल १८४८ रोजीं मुंबई सरकारला लिहिलेल्या खलित्यांत तपशिलवार हकीगत लिहिली आहे.

सातारा—राज्य खालसा करून मराठी सत्तेचा वटलेला का होईना मूळ वृक्षच उपटून काढावा, ही ब्रिटिशांची कल्पना आप्पासाहेबांच्या मृत्यूनें सुलभ झाली. त्यावेळीं डलहौसी हा गव्हर्नरजनरल असल्यानें व तो एका विशिष्ट नीतीचा पुरस्कर्ता असल्यानें, त्यानें एका लेखणीच्या फटकाऱ्यासरशी सातारा-राज्य धुळीस मिळविलें !

इतिहास—लेखनाला अवश्य असणारी साधनसामुग्री, सातारा-प्रकरणीं मुबलक आहे; रंगो बापूजी यानें विलायतेंत केलेल्या सर्व खटपटी तत्कालीन पत्रांत प्रसिद्ध झाल्या असून, पार्लमेंटरी कागदांत सातारा-प्रकरण साद्यंत प्रसिद्ध झालें आहे. इतिहासाभ्यासकानें हे कागदपत्र मननपूर्वक अभ्यास करण्याजोगे आहेत. ब्रिटिश राजनीती-वर स्पष्ट प्रकाश पाडण्यास त्यांचा फार उपयोग होईल.

असल्या सामुग्रीचा थोडासा नमुना म्हणून पुढें एक उतारा देतों. या उताऱ्यांत पुणें-गादी, सातारा-गादी, छत्रपतींचे जहागीरदार आणि कुंपिणीचे जाहीरनामे व वचनें यांसंबंधीं सारांशरूपानें माहिती आली आहे. ती इतकी स्पष्ट आहे कीं, तिच्यावर टीका करण्याची मुळींच गरज नाहीं. कुंपिणीच्या कुटिल नीतीचें नागडें स्वरूप तींत अगदीं ठळकपणें दृग्गोचर होत आहे. उतारा पुढीलप्रमाणें:—

"The circumstances under which Mr. Elphinstone's proclamation of 1818 guaranteeing the landholders of the Peishwa's territories in their possessions, was promulgated, must first come under review. When the manifesto was issued, the power of Bajirao, the Peishwa was yet unbroken; while the assurances it breathed,

and the reputation of our Government for scrupulous adherence to its engagements, were among the most powerful causes which contributed to its ruin. It is hard to say whether the Mahrttas or our Govrnment attached the more importance to the appearance of that manifesto. It was carefully timed upon the fall of Satara up to which date the pursuit of the Peishwa had been productive of nothing important, if we expect the political effect of holding him up as a fugative in the eyes of the country.

"The truth is, we faught Bajirao first with the proclamation and then with the Satara family, which most opportunately fell into our hands at Ashtah, some ten days after its appearance. The assurances of the proclamation and the reinstatement of the Raja of Satara, ruined the Peishwa; and our deliberate withdrawal now from the pledges then given merits the reprobation of every conscientious man, however specious the argument upon which the withdrawal has been recommended."

"**The Inam Commission Unmasked**"
by Robert Knight pp. 45–46

[ आधारभूत ग्रंथ —

Rise of the Christian power in India by Major B. B. Basu.
राणी सगुणाबाईचा अर्ज.
Story of Satara by B. B. Basu.
मराठी दप्तर रु. २.
स्वतःजवळील कागदपत्र व रंगो बापूजी यांचीं पत्रें.
The British friend of India चे अंक. ]

# प्रकरण पांचवें

—-:o:—-

# नागपूरच्या राजसत्तेची अखेर.

It is clear ..... that Nizam's cessions in 1853 led to the annexation of Nagpur in 1853. For as Lord Dalhousie phrased it, the 'essential interest of England' required that the territory of Nagpur should pass under British Government. The great field of supply of the best and cheapest cotton grown in India lies in the valley of Berar ( ceded by the Nizam ), and in 'the districts adjacent' to it. Those ' Districts adjacent ' were in Nagpur. During the past year the Government had obtained by treaty with Nizams, not the Sovereignty indeed, but the perpetual possession and administration of the vally of Berar. This cotton field, was, however 'inaccessible for want of railroads.' The possession of Nagpur would enable us to make them. We took both, as has been.

( Ludlow–Thoughts on the policy of the Crown towards India.)

**सन १८१८ साली** मराठ्यांची केंद्रशक्ती **पेशवाई** नष्ट झाली व या गोष्टीस कोणाकडूनहि प्रतिकार झाला नाहीं. जो तो आपलें घर सांवरण्याच्या नादांत; अशी स्थिति उत्पन्न झाल्यानें **ईस्ट इंडिया कंपनीनें** जास्त दृढतेनें आपलें तेंच धोरण पुढें चालू ठेवलें. **पेशवाईच्या** अंताबरोबरच सर्व देशी राजेरजवाड्यांनीं उठाव केला असता तर पुढें **डलहौसीनें** जो स्वाहाकार केला त्यास खात्रीनें आळा पडला असता. परंतु या सुवर्णभूमीच्या दुर्दैवानें स्वार्थ, दुही, मत्सर, घरभेदेपणा या रोगांनीं सर्वच देश पछाडल्यानें कोणासही हें आगामी संकट आकलन करतां आलें नाहीं व पेशवाईचा मोठा ग्रास फार थोडया श्रमानें पचला. असें पहातांच इंग्रजांनीं **सातारा** गिळंकृत केला व मराठयांच्या सत्तेविषयीं जो सामान्य दबदबा असे तो मुळांतच उखडून टाकण्यांत आला. त्यावेळीं देशी राजांत गडबड उडाली, परंतु ती प्रकट स्वरूपांत नव्हती. या दोन गोष्टी साध्य होतांच मग उघड उघड कंपनीचें धोरण स्पष्ट झालें व एकामागून एक देशी

संस्थानांची आहुती त्यांत पडूं लागली. त्यांतील **नागपूर**–राज्याचा शेवट कसा झाला, त्याची माहिती या लेखांत देण्याचें योजिलें आहे.

**नागपूरचे राजे, दुसरे रघूजी भोसले** गादीवर असतांनाच त्यांनीं **सबूसिडियरी सिस्टीमची** तांत आपल्या गळ्याभोंवतीं लावून घ्यावी अशाबद्दल **ईस्ट इंडिया कंपनीनें** नाना प्रकार केले; परंतु कंपनीच्या नोकरांची कारवाई त्यांच्या चांगलीच प्रत्ययास आली होती व मराठी राज्यांत दुफळी पाडून एकास पळ, दुसऱ्यास छू, करण्याचे प्रकार कंपनी कसे खेळत होती याचा त्यांना पुरा अनुभव आला होता. त्यामुळें इंग्रजांच्या कारस्थानास ते बळी पडले नाहींत. ते विद्यमान होते तोंपर्यंत सबसिडियरी सिस्टीम **नागपूरकर भोसल्यांवर** इंग्रज लादूं शकले नाहींत. परंतु सन १८१७ मध्यें त्यांस देवाज्ञा झाल्यानंतर ज्या दिवसाची कंपनीचे अधिकारी मोठ्या उत्सुकतेनें वाट पहात होते तो सुदीन उजाडला.

**दुसऱ्या रघूजींना, परसोजी** नांवाचा एक पुत्र होता. तो बुद्धीनें मंद व राजकारण चालविण्यास लागणारें ज्ञान त्याच्यांत नसल्यानें, **रघूजीराजे** हयात असल्यापासूनच रघूजींचा पुतण्या **आप्पासाहेब** यांजकडे भावी राज्यकर्ता या नात्यानें जनता पाहत असे. **रघूजीराजे** विद्यमान असतांना त्यांचें व **आप्पासाहेब** यांचें सख्य नव्हतें. आप्पासाहेबांची कांहीं वडिलार्जित मिळकत **रघूजी राजे** घेण्याच्या प्रयत्नांत होते, असा एक आरोप करण्यांत येतो. तो कितपत खरा हें सांगतां येणें कठीण असलें तरी **रघूजी** व **आप्पासाहेब** यांचें सख्य नव्हतें ही गोष्ट मात्र खरी व या बेबनावाचा फायदा इंग्रज मुत्सद्यांनीं पुरा घेतला.

दुसरें मराठी युद्ध झाल्यानंतर **नागपूर-दरबारांत** इंग्रजांचा वकील रहावा असें ठरलें व त्याप्रमाणें **एल्फिन्स्टन साहेबाची** योजना त्या

कामीं झाली. **एल्फिन्स्टन साहेबानें** पेशव्यांच्या दरबारांत प्रवेश केल्यानंतर तेथें गोंधळ उडवून अखेरीस त्यानें **पेशवाईचा** घास कसा घेतला, याची माहिती इतिहासवाचकांस आहेच. तो हा सुप्रसिद्ध **एल्फिन्स्टन** नागपूर-दरबारीं वकील म्हणून नेमला गेला; त्यावेळीं, तो अवघा २४ वर्षांचा कोंवळा छोकरा होता; परंतु इंग्रजी राजनीतीस आवश्यक असे गुण उपजतच **एल्फिन्स्टनच्या** अंगीं असल्याचें ओळखून **माल्कम साहेबानें** गव्हर्नर जनरलकडे भीड-वशिला खर्चून त्याची वर्णी लावली व **एल्फिन्स्टनहि** आपल्या गुणांस बरोबर उतरला. **रघूजीराजे** विद्यमान होते तोंपर्यंत त्यांस तो सबसिडियरीच्या जाळ्यांत ओढूं शकला नाहीं हें खरें; तथापि **रघूजी** व **आप्पासाहेब** यांच्यांतील वैमनस्याचा पुरा फायदा त्यानें घेतला. त्याखेरीज लांचलुचपतीच्या प्रयोगानें त्यानें अनेक घरभेदे उत्पन्न केले व पेशवाई बुडवितांना, जे जे प्रयोग तेथें झाले, ते ते सर्व **नागपुरांत** सुरूं झाले; परंतु **एल्फिन्स्टननें** सुरूं केलेल्या कार्याचें यश त्याला मिळालें नाहीं. त्यांची तेथून बदली झाली व त्याच्या जागीं त्याच्याच तोलाचा **जेन्किन्स** नांवाचा वकील आला. तो वकील असतांनाच **रघूजीराजे** निवर्तले.

**रघूजीराजे** अत्यवस्थ असतांना त्यांनीं पूर्व वैर मनांत न ठेवून, **आप्पासाहेबांस** बोलावून आणून **परसोजीचा** हात त्यांच्या हातांत दिला व त्यास सांभाळून राज्य कर अशी आज्ञा दिली. **रघूजींच्या** निधनानंतर **परसोजी** राज्यावर बसविण्यांत आला व **आप्पासाहेबांच्या** अध्यक्षतेखालीं राज्यकारभार चालविण्यासाठीं एक **कौन्सिल** नेमण्यांत आलें. **आप्पासाहेब** हाच खरा सत्ताधारी झाल्यानें आपला फार दिवसांचा हेतु सफळ करण्याचा प्रयत्न **जेन्किन्समार्फत गव्हर्नर जनरल** करूं लागला व **नागपूरकर**

भोसलेशाहीच्या दुर्दैवानें आप्पासाहेबांस दुर्बुद्धी सुचून एका काळरात्रीं त्यानें सब्सिडियरी सिस्टीमचा काळफांस जवळ केला.

आप्पासाहेबांचें हें कृत्य राजघराण्यांतील लोकांना व दरबारी लोकांना बिलकूल मान्य झालें नाहीं व ते लोक बाळासाहेबांच्या हातून आप्पासाहेबांचा करार उलथून टाकल्याखेरीज राहणार नाहींत, अशी भीति जेन्किन्स यास वाटूं लागली. हा प्रकार झाला त्यानंतर लागलीच थोड्या दिवसांनीं परसोजी ऊर्फ बाळासाहेब याचा खून झाल्याचें आढळून आलें. या खुनाच्या प्रकरणांत इंग्लिश रेसिडेन्टाचें अंग असावें असा दाट संशय लोकांना आला.

परंतु इंग्रजांनीं आपली कारवाई अत्यंत यशस्वी रीतीनें पार पाडून सनदी फौजेच्या जाळ्यांत भोसल्यांना अडकावून टाकलें असल्यानें आतां ते अगदीं निर्धास्त झाले होते. आप्पासाहेबानें सनदी फौजेचा करार मान्य केल्यानंतर त्याचें मन त्याला खाऊं लागलें व त्या तहांत बदल करावा अशा प्रयत्नाला तो लागला. त्याच्या वृत्तींत असा बदल झालेला पाहतांच त्याच्या हातीं नागपूरराज्याचीं सूत्रें राहाणें कंपनीस इष्ट नसल्यानें, त्यानें अधिकारसूत्रें धारण केलीं तरी त्याचा अधिकार कंपनी मानण्यास तयार होईना. यामुळें अर्थातच वाद उत्पन्न होऊन त्या पायीं आप्पासाहेबांस स्वतःचा व स्वराज्याचा गौरव सांभाळण्यासाठीं हातीं शस्त्र कसें धारण करावें लागलें व घरांतीलच कांहीं घरभेदामुळें त्यांत त्याचा कसा पराभव होऊन त्यास राज्यवंचित व्हावें लागलें, पुढें इंग्रजांनीं त्यास कैदेंत टाकलें व त्यांतून तो शिताफीनें कसा बाहेर पडला व अखेरीस महाराजा रणजितसिंग यांनीं त्यास कसा आश्रय दिला, ही सर्व कथा अत्यंत रोमांचकारी आहे. तथापि ती साग्र निवेदन करण्यास येथें अवकाश नाहीं. शेवटचे बाजीराव व आप्पासाहेब यांच्या अखेरच्या

चरित्रांत अनेक प्रकारचें साम्य आढळून येतें. उभयतांवरहि सारखेच प्रयोग झाले. दोन्हीं ठिकाणीं सारखेच घरभेदे भेटून त्यांनीं स्वराज्याला सुरुंग लावण्यास मदत केली.

**आप्पासाहेबाचा** कांटा दूर केला तेव्हांच वस्तुतः **नागपूर-राज्य** इंग्रजांनीं आपल्या कबजांत घेतलें. नागपूरच्या सर्व सुभ्यांवर मुख्य सुभेदार इंग्रज व त्याच्या हाताखालीं एक देशी अंमलदार. वसुली-खातें व लष्कर, खास **रेसिडेंटच्या** ताब्यांत, अशी तजवीज करण्यांत आली. परंतु या आपत्तींतूनही **नागपूरराज्य** कांहीं दिवस तग धरून राहिलें, याचें सर्व श्रेय **महाराणी बांकाबाई** यांना आहे. **नागपूरकर भोसल्यांच्या** इतिहासांत **राणी बांकाबाई** यांना फार मोठें स्थान आहे. परिस्थिति अनुकूल असती तर अहिल्याबाई **होळकर** यांच्या तोलाचें स्थान त्यांना सहज प्राप्त झालें असतें. **दुसरे रघूजी** यांच्या या पत्नी. **नागपूरकर भोसल्यांच्या** स्वतंत्र राज्याच्या सम्राज्ञी म्हणून त्यांनीं मान उपभोगिला. **दुसरे रघूजी** विद्यमान असेतोंपर्यंत त्यांनीं हा मान उपभोगिला. पुढें **परसोजीच्या** वेळीं नेमलेल्या रीजन्सींतहि त्या प्रमुख होत्या. परंतु **आप्पासाहेबांच्या** पदच्युतीनंतर नागपुरकरांचें घराणें बुडतें अशी स्थिति येऊन ठेपली. तेव्हां या बाईनीं मोठ्या दूरदर्शीपणानें मुत्सद्दीगिरी करून, नागपूर घराण्याच्या एका आप्त घराण्यांतील एक मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव **तिसरा रघूजी** असें ठेवलें.

**तिसरा रघूजी** दत्तक घेतला त्या वेळीं तो अल्पवयी असल्यानें राज्यकारभार रेसिडेंटच्या संमतीनें चालू लागला. बांकाबाईची रघूजी-वर देखरेख असे. तो वयांत येईपर्यंत बदलत्या परिस्थितीच्या मानानें कारभार बरा चालला व तिजोरींत कांहीं शिल्लकही उरली. पुढें १८२६ मध्यें **रघूजी** वयांत आला तेव्हां त्याच्या हातीं राज्यसूत्रें

देण्यांत आली. आप्पासाहेबाला पदच्युत करून **रघूजी** वयांत येईपर्यंतच सर्व काळ नागपूर राज्याचा सर्व कारभार कंपनीच्या नोकरांच्या हातींच असल्यानें त्यांनीं तेथें आपलें आसन स्थिर करून ठेवलें होतें. राजाच्या हातीं काडीचीहि सत्ता उरली नव्हती. अशा वेळीं कंपनी घालील त्या अटी राजाला मान्य करण्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. या संधीचा फायदा कंपनीनें भरपूर करून घेतला.

सन १८२६ सालीं कंपनीनें राजाशीं तह केला, त्याच वेळीं **नागपूरची** राजसत्ता खरीखुरी संपुष्टांत आली. या तहांत व त्या-नंतर सन १८३० सालीं सुधारून केलेल्या नव्या तहांत एक महत्त्वाचें कलम होतें. त्यामुळें **नागपूर**–राजसत्ता कंपनीच्या इच्छेवर कशी अवलंबून होती हें दिसून येईल. तें कलम असें–" राजेसाहे-बास सर्व प्रसंगीं सल्ला देण्याचा कंपनीसरकारास अधिकार आहे; तो त्यांनीं मान्य करावा. परंतु कंपनी सरकारनें दिलेला सल्ला अमान्य झाल्यास अगर राज्यांत अत्यंत जुलूम व अव्यवस्था झाल्यास आणि प्रजेस दुःख होऊन तिची कोणत्याहि प्रकारें हानि झाल्यास, राजेसाहेबांच्या कांहीं प्रांतांची सर्व व्यवस्था आपल्याकडे घेण्याचा अधिकार कंपनी सरकारास राहील."

या कलमावरून कंपनीचा हेतु स्पष्टपणें दिसून येतो व पुढें **तिसरे रघूजी** निपुत्रिक न वारते तरीही वरील कलमानुसार राज्य नष्ट करण्याची तयारी कंपनीनें आगाऊच करून ठेवली होती. इतर कांहीं स्थिति झाली असती तरी आगेमागें **नागपूर**–राज्य खालसा करण्याचें कंपनीचें धोरण आगाऊच ठरलें होतें असें म्हणण्यास आधार आहे; तो शिरोभागीं उध्दृत केलेल्या उताऱ्यावरून स्पष्टपणें ध्यानीं येणार आहे. **अयोध्येच्या नबाबांशीं** तह झाला, त्यांतहि वरील आशयाचेंच कलम होतें. **अयोध्येच्या नबाबास** औरस

संततीहि होती. परंतु कोणते प्रान्त घेणें आपल्यास हिताचें आहे, हें आगाऊ ठरवून त्या धोरणास अनुसरून मागाहून कारणें शोधण्यांत आलीं. त्याच वेळीं संस्थानें बेवारसा करण्याची सांथच असल्यानें कंपनीच्या ती चांगली पथ्यावर पडली.

**नागपूरचा** प्रकारहि असाच झाला. **तिसरे रघूजी राजे** ता० ११ डिसेंबर १८९३ रोजीं निवर्तले. त्यांस औरस संतती नव्हती. परंतु अनौरसत्वाचें कारण तयार होण्यापूर्वींच कंपनीनें रघूजीचा कारभार अत्यंत वाईट, त्यांना कर्ज झालें, रयत असंतुष्ट झाली, अशा कंड्या अगोदरपासूनच उठविण्यास सुरवात केली होती. म्हणजे रघूजी अनौरस वारले नसते तरीहि राज्य नष्ट करण्यास पुरेसें कारण आगाऊच तयार करण्यांत आलें होतें; असो.

**रघूजीराजे** मरण पावतांच, **महाराणी बांकाबाईनें**, **यशवंतराव अहीरराव** नांवाच्या मुलास दत्तक घेतलें. त्यावेळीं **नागपूर** दरबारीं **मि. मॅन्सेल** नांवाचा **रेसिन्डेट** होता. तो दत्तविधानप्रसंगीं जातीनें हजर होता. परंतु त्यानें दत्तविधानास विरोध केला नाहीं व विशेष असें प्रोत्साहनहि दिलें नाहीं. त्यानें दत्तकप्रकरणाची हकीकत **कल-कत्त्यास** कळवून तिकडून निकाल लागेपर्यंत म्हणून, जामदारखाना, जवाहीरखाना यांवर कंपनीच्या मोहरा करून शिक्कामोर्तब आपल्या ताब्यांत घेतलें. ता० २८ जानेवारी १८९४ रोजीं **डलहौसीनें** खलिता लिहून वारसाच्या अभावीं **नागपूरराज्य** खालसा करण्यांत आल्याचें जाहीरहि केलें.

सन १८४४ सालीं **नागपूरचा रेसिडेंट कर्नल स्पायर्स** यानें **गव्हर्नर–जनरल–इन्–कौंसिलला** पत्र लिहून राजा निपुत्रिक मरण पावला तर काय करावयाचें, याबद्दल निर्णय मागितला असतां, त्या-वेळीं राजास व **भोसले--राजघराण्यास** दत्तक घेण्याचा हक्क आहे,

असें स्पष्ट शब्दांत कळविलें होतें. लॉर्ड डलहौसी यानें नागपूर-राज्य खालसा करण्याचा खलिता लिहिला त्याला त्याच्या कौन्सिल-मधीलच एक सभासद कर्नल लो म्हणून होता, त्यानें कसून विरोध केला. त्यावर लॉर्ड डलहौसीनें दिलेलें उत्तर मोठें वाचनीय आहे. तो म्हणतोः—

I am well aware, that the continuance of the Raja of Nagpur under the same Mahratta rule as an act of grace and favour on the part of the British Government, would be highly acceptable to Native Sovereigns and nobles of India, and there are doubtless many high authorities who would advocate the policy on that special ground. I understand the sentiment and respect it, but remembering the responsibility that is upon me, I cannot bring my judgment to admit that a kind and generous sentiment should outweigh a just and prudent policy.

डलहौसीची ही मानभावीपणाची 'न्यायाची व दूरदृष्टीची नीति' येथपर्यंतच थांबली नाहीं. नागपूरच्या राजास त्याचें म्हणणें काय हें सांगण्याचीहि संधी देण्यांत आली नाहीं किंवा हिंदुस्थानसरकारचा निर्णय काय झाला, हेंहि त्यांना कळविण्यांत आलें नाहीं. 'नागपूरच्या राज्याला वारस नसल्यानें तें राज्य कंपनीसरकारनें आपल्या ताब्यांत घेतलें आहे' इतकाच राणीला अखेरचा निर्णय सांगण्यांत आला व त्या मनगटें चावीत जागच्या जागीं बसल्या. महाराणी बांकाबाईनें हा निर्णय फिरावा व रेसिडेन्ट समक्ष घेतलेला दत्तक कायम करावा अशाबद्दल विश्वप्रयत्न केले. परंतु त्या दुर्दैवी स्त्रीच्या प्रयत्नास यश आलें नाहीं. एका काळीं स्वतंत्र नागपूर राज्याची पट्टाभिषिक्त राणी म्हणून गाजलेल्या बांकाबाइस नागपूरच्या राज-लक्ष्मीचे धिंडवडे निघालेले आपल्या डोळ्यांनीं पहावे लागले. कोण हा दैवदुर्विपाक !

**बांकाबाईच्या** प्रयत्नास कांहींचेंहि यश आलें नाहीं. **रेसिडेन्ट मॅन्सेल** यानेंहि डलहौसीजवळ बरीच रदबदली केली. परंतु **डलहौसीनें** आपल्या धोरणांत मुळींच फरक केला नाहीं. उलट आक्टोबर इ. स. १८५४ मध्यें, ब्रिटिश सैनिकांनीं **नागपूरच्या** राजवाड्यास व दरबाराशीं निष्ठेनें वागणाऱ्या सरदार–मानकऱ्यांच्या घरांस वेढा देऊन सर्वत्र रस्ता बंद केला. राजघराण्यांतील कोणत्याहि माणसाशीं कोणीं कसलाहि पत्रव्यवहार करण्यास बंदी करण्यांत आली. अनेक लोकांनीं मध्यस्थी केली; परंतु त्याबद्दल त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. राजवाड्यांत काय प्रकार चालले आहेत, यांची दाद बाहेर लागेना, बाहेरची दाद आंत पोहोंचेना. सर्वत्र अस्वस्थता उत्पन्न झाली.

याच वेळीं **डलहौसीच्या** वतीनें असें जाहीर करण्यांत आलें कीं, या पुढें राजघराण्यांतील मंडळींना आपल्या दागदागिन्यांचें, जडजवाहिराचें नीट संरक्षण करतां येणार नाहीं. तेव्हां ते विकून त्याची येईल ती रक्कम आम्ही त्यांच्यासाठींच आपल्या जवळ ठेवणार आहों. ही वार्ता राजवाड्यांत समजतांच केवढा तरी हलकल्लोळ उत्पन्न झाला. **राणी बांकाबाई** तर संतापानें वेडी होण्याच्या पंथास आली. **नागपूरकर भोसल्यांनीं** पूर्वदिग्विजय करून नाना रत्नांच्या राशींनीं आपला जवाहीरखाना तुडुंब भरून ठेवला होता. त्याचा उपभोग अनेक पिढ्यांनीं घेतला. त्या **नागपूरकर भोसल्यांच्या** राजलक्ष्मीचा भर चव्हाठ्यावर लिलांव व्हावा, ही कल्पनाच संतापजनक असल्यानें तिची प्रत्यक्ष बजावणी होण्याचा प्रसंग येऊन ठेपतांच राजवाड्यांत काय अनर्थ उडाला असल, याची कल्पना सहज करतां येण्याजोगी आहे ! ‘ माझ्या कसल्याहि तनसडीला हात लावाल तर मी राजमहालच पेटवून देईन, पण तीस परकीयांचा

स्पर्श होऊं देणार नाहीं,' असा त्रागाहि राणी बांकाबाईनीं केला; परंतु ती वयानें वृद्ध झालेली, राजकुळाचा अधःपात डोळ्यानें पाहतां पाहातां खंगून गेलेली, तिच्यानें शब्दांपलीकडे सहजच कांहीं करतां आलें नाहीं. **नागपूरचा** राजवाडा शब्दशः धुवून नेलेला तिला पहावा लागला! तिनें अशा स्थितींतहि **इंग्लंडला** एक वकील पाठविला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

अशा आपत्काळीं एक इंग्रज अधिकारी **नागपूर**–राजघराण्याला एकनिष्ठ राहिला व तो म्हणजे **मेजर औस्ली** हा होय. **नागपूर**-राजघराण्यावर हें संकट अत्यंत अन्यायानें आणलें आहे, या वेळीं आपण त्यांना कांहीं सहाय्य करणें आपलें कर्तव्य आहे, असें समजून तो आपल्या मुक्कामाहून निघाला; पण त्यास वाटेंतच अटक करण्यांत आली.

या वेळीं **ब्रिटिश** सैनिकांनीं सुमारें दहा लक्ष पौंडांचें जवाहीर राजवाड्यांतून हालविलें! **नागपूरचे मुख्य प्रधान** तर दुःखातिशयानें प्राणासच मुकले. एका काळीं ज्याच्या नुसत्या नांवानें शत्रू थरारा कापत, त्याची पत्नी **बांकाबाई** इचें दुःख तर विचारावयासच नको. तिनें शक्य ते सर्व प्रयत्न केले. परंतु अखेरीस हताश होऊन तिनें आपला स्वतः राज्यावरील हक्क सोडून दिला. तेव्हां राणीवशावरील पहारा उठला. तरी पण मानकरी लोक कांहीं गडबड करतील म्हणून त्यांजवर पहारे ठेवले. परंतु एवढ्यानें **डलहौसीची** राक्षसी इच्छा तृप्त झाली नाहीं. त्यानें **नागपूरच्या** लक्ष्मीचा जाहीर लिलांव **कलकत्त्यास** केला. त्याची जाहिरात ता. १२ आक्टोबर १८५५ च्या तेथील **मॉर्निंग क्रॉनिकल** नांवाच्या पत्रांत दिली. तींत पुढील अलंकार होते.

**हिरे**:—अतिशय मोठ्या आकाराचे व वजनाचे, शुद्ध पाण्याचे,

कमरपट्टे, बांगड्या, अंगठ्या, यांवर बसविलेले. यांखेरीज अनेक वजनाचे हिरे, दर्या–ई–नूर या प्रसिद्ध हिऱ्या पेक्षांहि मोठे.

**मौक्तिकमाला:**—अपूर्व, फार मोठ्या मोत्यांच्या; एकेरी, दुहेरी व चौपदरी, मधून हिरे जडवले आहेत व हिऱ्यांचीं पदकें आहेत.

**मोठ्या रत्नमाला:**–अत्यंत सुबक; इतरहि अनेक हिरे व माला.

**हिंदुस्थानी कर्णफुलें**:—फार सुंदर, हिरे व मोत्यें बसविलेलीं नानाप्रकारचीं मूल्यवान् मोतीं.

**दरबारी अंगरखा**—हिरे, मोतीं, माणकें व इतर रत्नें सर्वत्र बसविलीं आहेत.

घोड्यावरील नानाप्रकारचीं आजीनें–हिरे, मोतीं, माणकें यांचें अप्रतीम काम केलेलीं. शिवाय घोड्यांचे नानाप्रकारचे अलंकार, गुंड, हायकोल, कलगी, तुरे, हिरेजडित गाशे इ०

अत्यंत मूल्यवान् रत्नजडित अंकुश, नाना प्रकारचे—रत्नजडित अत्तर व गुलाबदाण्या, कलमदानें, सुरया, हिरेजडित हुक्का, हिऱ्याची चिलीम, सर्व काम हिऱ्यांनीं केलेलें आहे.

रत्नजडित तलवारी, ढाली, जंबिये, धनुष्यें, बाण, भाते वगैरे.

तलवार अडकविण्याचे अत्यंत अमूल्य कमरपट्टे, चांदीसोन्याचे, नानाप्रकारचे दागिने, अत्तरदाण्या, गुलाबदाण्या, तांबे, ताटें, तबकें वगैरे.

सोन्याचे दागिने— बांगड्या, हार, वांकी, वेळा, कमरपट्टे, चंद्रहार, कर्णफुलें, बांगड्या, अनेक प्रकारच्या.

सुवर्णांकित चिलखतें, शिरस्त्राणें, भाले, परशू, खांडा, ढाली वगैरे.

यांखेरीज शंभर पात्रांची चांदीचीं भांडीं.

हिंदुस्थानांतील अत्यंत विख्यात अशा राजघराण्यांतील लक्ष्मीचा असा बाजारपेठेंत जाहीर लिलांव झालेला पाहून, त्या वेळीं देशी राजांच्या अंतःकरणांत काय विचारकल्लोळ उसळले असतील याची कल्पना सहज करतां येण्याजोगी आहे ! असो.

परंतु कंपनीनें आपली लिलावाची हौस येथेंच थांबविली नाहीं. राजघराण्याच्या मालकीचे हत्ती, घोडे, बैल व गायींचीं खिल्लारें, उंट यांचा जाहीर लिलांव खुद्द नागपुरांत सीताबर्डीवर करण्यांत आला. या संबंधानें के ( Kaye ) हा सुप्रसिद्ध इतिहासकार आपल्या A History of the Sepoy war in India या पुस्तकांत लिहितो.

It must have been a great day for speculative cattle dealers at Seetabaldee when the royal elephants, horses and bullocks were sold off at the price of currion, and a sad day indeed, in the royal household, when the venarable Banka Baee with all the wisdom and moderation of four score well-spent years upon her, was so stung by a sense of the indignity offered to her that she threatened to fire the palace if the furniture were removed. But the furniture was removed and the jewels of the Bhosala family were sent to the Calcutta Market. And I have heard it said that these seizures, these sales created a worse impression not only in Berar but in the surrounding provinces, than the seizure of the kingdom itself.

पांच–सहाशें हत्ती, उंट, घोडे, बैल फक्त १३००० रुपयांस विकण्यांत आले. शंभर रुपयांचा माल अवघा पांच रुपयांस विकण्यांत आला. राजवाड्यांतून ४२ पेट्या जवाहीर भरून नेण्यांत आले. याखेरीज राजांची खाजगी शिल्लक सुमारें दहा लक्ष रुपये व दहा हजार मोहरा होत्या. राणिवशांतील दहा हजार मोहरा होत्या. हा सर्व ऐवज जप्त करण्यांत आला.

**भोसल्यांच्या** इस्टेटीचा जो लिलांव करण्यांत आला, त्याची किंमत सुमारें वीस लक्ष रुपये आली असें म्हणतात. या पैशास **भोसलाफंड** असें नांव देण्यांत येऊन, त्यांतून राजघराण्यांतील मंडळीस पेन्शन देण्यांत येतें. याखेरीज कांहीं गांव, मोकासे व कांहीं जमिनी एवढ्या मात्र नागपूरघराण्याकडे राहिल्या. अशा रीतीनें नागपूर–घराण्याचें सर्व ऐश्वर्य नष्ट करण्यांत आलें.

मराठी राज्याचे उत्तरेचे दिग्गज **शिंदे, होळकर,** दक्षिणेचे **पटवर्धन,** त्याप्रमाणें पूर्वेकडील **सेनासाहेब सुभे नागपूरकर भोसले** हे होत. **नागपूरकर भोसल्यांनीं** कलकत्त्याला शह देऊन **मेदिनीपूर--कटक--जगन्नाथ** येथपर्यंत आपली सरहद्द पसरवून दिली होती. **बंगालमध्यें** कंपनीनें तेथील राजघराणें नाहींसें केल्या-नंतर तिची दृष्टी आसपास सहज पडली; परंतु **नागपूरकर भोसल्यांच्या** दराऱ्यामुळें तीस **बंगालबाहेर** सरकतां आलें नाहीं. पुढें मराठी राज्यांतील त्यावेळची जूट, पराक्रम, ईर्षा या गुणांना खो देऊन त्या जागीं चुगलखोरपणा, स्वार्थ, मत्सर, या अवगुणांनीं आपलें आसन स्थापलें व त्यामुळें मराठी साम्राज्यांतील एकेक अंग गळून पडूं लागलें. त्यांतील **नागपूरकर राजघराण्याचा** शेवट कसा झाला, हें वर थोडक्यांत दर्शविलें आहे.

[ आधारभूत ग्रंथ—

Torrens—Empire in Asia.

Kaye—A History of Sepoy War.

काळे–नागपूरकर भोसल्यांचा इतिहास. ]

---

# प्रकरण सहावें

# अयोध्येची आहुती.

" It had been said of the Company that there was something in their operations which combined the meanness of a pedlar with the proffligacy of a pirate. Alike in the Military and in the political line could be observed auctioneering ambassadors and trading generals and thus we saw a revolution brought about by affidavits, an army employed in executing an arrest, a town beseiged on a note of hand, a prince dethroned for the balance of an account. Thus it was they united the mock majesty of a bloody Sceptre and the little traffic of a merchant's counting house, wielding a truncheon with one hand and picking a pocket with the other."

( Sheridon–Speech on Begums of Oudh, 7th Feb. 1787 ).

## अयोध्याप्रान्त कां खालसा केला ?

**लॉर्ड डलहौसी** यानें **हिंदुस्थानांतील** राज्यें खालसा करण्याचें जें धोरण स्वीकारलें त्याला प्रमुख कारण म्हणजे, राज्याधिकारी हा औरस संततीखेरीज निवर्तला म्हणून राज्य खालसा करण्यांत आलें असें सांगण्यांत येतें. अर्थात् कांहीं मतलबी व स्वार्थी लोकांनीं निर्माण केलेलें हें कारण आहे. सरळ मनानें विचार करणाऱ्या कोणासही हें कारण पटणारें नाहीं. शिवाय वरील विधान अस्थानीं असल्याचा दुसरा पुरावा खुद्द **वॉरन हेस्टिंग्ज्नें** आपल्या हातानेंच तयार करून ठेवलेला आहे व तो **अयोध्याप्रान्त** खालसा करून! कारण तेथील शेवटचा अधिपति **वाजीद्अल्ली शहा** याच्या बाबतींत औरस-अनौरस असा प्रश्नच उपस्थित झालेला नव्हता व खुद्द नबाबाला गादी मिळाली तीहि इंग्रजांच्या कृपेमुळें. असें असतां **अयोध्याप्रान्त** खालसा कां करण्यात आला? याचें एका वाक्यांत उत्तर म्हणजे **इंग्रजांना** तो प्रांत पाहिजे होता म्हणून!

जी गत सातारा, तंजावर, नागपूर, झांशी, कच्छ, सिंध

इत्यादि प्रांतांची झाली, तीच अयोध्येची झाली व स० १८५७ चें युद्ध न होतें तर ग्वाल्हेर व निजामराज्यावरहि तीच पाळी येणार होती. पण १८५७ नें त्यांचे प्राण वांचविले. भारतवर्ष सुवर्णाची भूमि म्हणूनच बुभुक्षितांची दृष्टि तिजकडे वळली व अशा एक ना दुसऱ्या कारणासाठीं एकेका प्रांताची आहुति घेण्यांत आली. सातारा बुडविला; कारण, मराठेशाहीचें मुख्य केंद्रच नष्ट केल्यानें बलिष्ठ समजल्या जाणाऱ्या मराठ-मंडळावर वचक बसावा ! नागपूर घेतलें, कारण तो प्रांत समृद्ध व विशेषतः कपाशीच्या लागवडीला उपयोगी म्हणून. अयोध्या प्रांत दुर्दैवानें धनसंपन्न व इंग्रजांच्या प्रकृतीला मानवणारा असल्यानें तो त्यांला नकोसा कसा वाटणार? तेव्हां इंग्रजाला तोहि प्रांत हवा म्हणून त्यानें तो घेतला.

इंग्रजांचा व अयोध्येच्या नबाबाचा संबंध आल्यापासून अयोध्येच्या नबाबांनीं इंग्रजांची मर्जी नाखूष होईल असें वर्तन केव्हांहि केलें नाहीं. मग त्यांच्याविरुद्ध शस्त्र उचलण्याचें कारण काय ? अशी स्थिति असतांहि इंग्रजांनीं अगदीं क्षुल्लक कारणासाठीं अयोध्या प्रांत कसा गिळंकृत केला, आपल्या वाढत्या भुकेपायीं अयोध्येची आहुति कशी घेतली, ती अत्यंत करुणकथा या ठिकाणीं संक्षेपतः देण्याचें योजिलें आहे.

## स्नेहाच्या तंतूचें पर्यवसान.

सब्सिडियरी पद्धतीच्या द्वारें प्रथम आपलें लष्कर देशी राजांवर लादावयाचें, त्याच्या खर्चासाठीं मुलूख तोडून मागावयाचा, वरचेवर खर्चासाठीं जास्त रकमा मागत सुटावयाचें, त्यासाठीं एक एक प्रांत घशांत घालावयाचा व नंतर सर्व राज्याची ढेकर द्यावयाची, अशी ब्रिटिशनीति त्या वेळीं हिंदुस्थानांत धुमाकूळ घालीत होती,

असें लॉर्ड मेकॉले यानें, आपल्या वॉरन हेस्टिंग्ज या निबंधांत स्पष्टच म्हटलें आहे. तसाच प्रकार अयोध्येच्या बाबतींतहि झाला.

अयोध्येचा नबाब सुजाउद्दौला याचा व इंग्रजांचा प्रथम संबंध आला तो बंगालचा नबाब मीर कासीम याच्यामुळें. मीरकासीमचा पराजय झाल्या नंतर तो सुजाकडे साहाय्य मागण्यासाठीं गेला व सुजानेंहि त्यास मदत दिली; मग त्याला घेऊन तो बिहार प्रांतांत घुसला. नंतर बक्सार येथें १७६४ मध्यें इंग्रजांची व त्याची लढाई होऊन त्यांत सुजाचा पराभव झाला; त्या वेळेपासून अयोध्येचे नबाब इंग्रजांच्या भोवऱ्यांत सांपडले ते कायमचेच. या पराजया-नंतर इंग्रजांचा व सुजाचा तह ता० १६ ऑगस्ट १७६५ मध्यें झाला. या तहानें, सुजानें इंग्रजांना खर्चासाठीं ५० लक्ष रुपये दिले व हा जो स्नेहभावाचा सूक्ष्म तंतु निर्माण केला, त्याच्या आधारें इंग्रजांनीं सर्व अयोध्या प्रांत च वशा खालीं उतरविला. या संबंधानें अयोध्येचा असि० रेसिडेन्ट मेजर बर्ड हा म्हणतो,

"By this slender thread the **Kingdom of Oudh** was gradually drawn into the meshes of the Company, was taxed and impoverished, cramped and tethered, and tormented until it was presumed to be ready for final annexation."

## इंग्रजांचें पहिलें वचन

इंग्रज अत्यंत घातकीपणानें व विश्वासघातानें नबाबाशीं वागत असले तरी नबाबानें मात्र त्यांच्याशीं विश्वासघात अगर द्रोह केला नाहीं हें लक्षांत घेण्यासारखें आहे. वरील तह झाल्यानंतर तीन वर्षांनीं नबाबाविरुद्ध अशा कंड्या उठविण्यांत आल्या कीं, नबाब आपल्या सैन्यांत जास्त भरती करीत आहे. ही सबब सांपडतांच

कंपनीनें त्यावर नवा तह लादून त्याच्या सैन्याची मर्यादा फक्त ३९ हजार कायम केली. हा करार झाला, तेव्हां नबाबावर अगर त्याच्या वंशजांवर, आम्हीं यापुढें कसलेहि निर्बंध घालणार नाहीं असेंहि कंपनीनें वचन दिलें. परंतु वचन देणें व त्याचा भंग करणें यांत इंग्रज मुत्सद्दी केव्हांच भेद करीत नसल्यानें पुढें त्यांच्या हातून वरील करार-भंग झाला यांत नवल काय ?

पुढें आपला मित्र नबाब याचें राज्य रक्षण करण्यासाठीं म्हणून इंग्रजांनीं त्याच्या राज्यांतील चुनारगड हा किल्ला त्याच्या इच्छे-विरुद्ध घेतला. प्रयागहि त्याजकडून घेतलें व अशा रीतीनें सुजाला त्याच्या हयातींतच इंग्रजांनीं आपल्या "मित्रत्वाचा व दृढ सख्याचा" योग्य परिचय करून दिला. पुढें त्यावर आपली फौज लादून त्यासाठीं दर महिना २ लक्ष १० हजार रुपये, सुजानें द्यावे असा करार झाला. पुढें सुजा १७७५ मध्यें वारला.

## हें सर्व चिरमैत्रीसाठीं !

त्यानंतर त्याचा मुलगा असफ उद्दौला नबाब झाला. सुजावर जेव्हां फौज लादली तेव्हां दोन लक्ष दहा हजारांपेक्षां जास्त रक्कम कंपनीनें घेऊं नये असा करार झाला असतां, त्याचा मुलगा असफ याजकडून चिरमैत्रीसाठीं म्हणून ती रक्कम महिना ५ लक्ष कर-ण्यांत आली. याखेरीज त्याजकडून बनारसची जमीनदारी आपणा-कडे घेतली ती वेगळीच. परंतु अग्नींत आहुति घातली म्हणजे तो जास्तच भडकत जातो तशी इंग्रजी क्षुधा वाढतच गेली. स० १७७७ मध्यें त्याजवर 'तात्पुरती' म्हणून आणखी एक जादा पलटण लादली व सैन्याच्या खर्चाची रक्कम १॥ कोटीवर केली. अशा रीतीनें खर्चाची रक्कम अमर्याद वाढली. नबाबाच्यानें ती देववेना तेव्हां त्यानें

१७७९ मध्यें गव्हर्नर जनरलकडे तक्रार केली. परंतु तक्रारीचा उपयोग कांहीं न होतां, नबाबालाच त्याचें सैन्य कमी करण्यास लावलें. खासगी खर्चाला ठराविक रकमच खर्च करावी, व सरकारी खर्च रेसिडेन्टच्या सल्ल्यानें दिवाणांनीं करावा, असें कंपनीनें फर्मान सोडलें. ता० १ फेब्रुवारी १७७४ पासून ता० ८ एप्रिल १७८९ या वर्षापर्यंत कंपनीनें **नबाबाकडून** २ कोटी ३० लक्ष रुपये लुबाडले. अशा स्थितींत देशाची सुस्थिति राहणार कशी? यासंबंधानें खुद्द **वॉरन हेस्टिंग्जच** म्हणतो,

" The number, influence and enormous amount of the salaries, pensions and emoluments of the **Company's** service, civil and military, in the **Vizir's Service** have become an intolerable burden upon the revenue and authority of his Excellency."

या सर्व गोष्टींचा **असफ उद्दौल्यावर** इतका घातुक परिणाम झाला कीं, त्यामुळें तो आजारी पडला, औषधहि घेईना; ' हृदय-भंगावर कांहीं औषध नाहीं. मला औषधच नको ' असें म्हणत त्यानें प्राण सोडला.

## कंपनीची वाढती क्षुधा.

त्यानंतर त्याचा मुलगा **वझीरअल्ली** गादीवर आला. परंतु तें कंपनीला न आवडून **सर जॉन शोअरनें** असफचा भाऊ **सादतअल्ली** यास गादीवर बसविलें व तत्प्रीत्यर्थ त्याजकडून १ कोटी ५० हजार रुपये, या ना त्या कारणासाठीं वसूल केले. याखेरीज **प्रयागचा किल्ला** व त्याच्या दुरुस्तीसाठीं ८ लक्ष रुपये, फत्तेगडच्या दुरुस्ती-साठीं ३ लक्ष, १२ लक्ष रुपये गादीवर बसविल्याबद्दल व वार्षिक खंडणी ७६ लक्ष रुपये, याप्रमाणें रकमा पिळून काढण्यांत आल्या. परंतु कंपनीची क्षुधा वाढतच होती. लवकरच **नबाबाकडून** सर्व

दुआबप्रांत गिळंकृत करण्याचा बेत करण्यांत आला. ता० २० मार्च १७७४च्या तहानें त्यांनीं मागेंच चुनारगड घेतला होता. ता. २१ मे १७७५ च्या तहानें बनारस, गाझीपूर व कानपूर हे जिल्हे घेतले. १७९८ मध्यें प्रयागचा किल्ला घेतला व आतां त्यांची धाड दुआबकडे वळली. नबाबाच्यानें काडीचाहि प्रतिकार होणें शक्य नाहीं, अशी खात्री होतांच त्यांनीं मागणी वाढविण्यास सुरवात केली व १८०१ मध्यें एक नवा तह उपस्थित करून त्याजकडे १ कोटी ३५ रुपये उत्पन्नाचा मुलूख तोडून मागितला. म्हणजे पूर्वी ठरलेल्या खंडणीपेक्षां ही उत्पन्नाची रक्कम ५९ लक्षांनीं जास्त होती. नबाबानें या संबंधांत खूप तक्रार केली. परंतु गव्हर्नर जनरलानें नबाबाच्या म्हणण्याकडे काडीचेंहि लक्ष न देतां रेसिडेन्टाला कळविलें कीं, नबाब त्या प्रांताचा मुकाट्यानें ताबा न देईल तर सक्तीनें तो घ्यावा. अखेर, या जुलमास तो कंटाळला व वैतागून गेल्यानें सादतअल्लीच्या प्रकृतीवर परिणाम होऊन तो १८१४ सालीं मरण पावला.

अयोध्येच्या नबाबाचा इंग्रजांशीं प्रथम तह १७६५ सालीं प्रयागास झाला व खर्चासाठीं कांहीं रक्कम कंपनीनें घेतली. पुढें १७६८ मध्यें कंपनीनें त्याच्या शिबंदीवर मर्यादा घातली. १७७३ मध्यें त्याजवर गोरें लष्कर लादून त्याच्या खर्चासाठीं २ लक्ष १० हजार रुपये प्रतिमासीं घेण्याचें ठरलें. पुढें १७७५ मध्यें ही रक्कम पांच लक्षांची करण्यांत आली. स० १७७७ मध्यें एक 'तात्पुरती' पलटण लादण्यांत आली व त्यासाठीं १७८६ सालीं एकंदर रक्कम ८४ लक्षांवर गेली. पुढें खंडणी बंद करून लॉर्ड वेलस्लीनें १ कोटी ३९ रुपये उत्पन्नाचा दुआब प्रांत घशाखालीं उतरविला.

सादतअल्लीनंतर त्याचा मुलगा गाझीउद्दीन गादीवर आला. सादतअल्लीला कंपनीनें इतका पिळून काढला होता कीं, त्याचा

मुलगा **गाझीउद्दीन** यापासून जास्त कांहीं निघेल अशी कंपनीची कल्पना नव्हती व त्याप्रमाणें **गाझीउद्दीन** गादीवर आल्यानंतर **कंपनीनें** त्याला फार त्रास दिला नाहीं. परंतु त्यावेळीं जो तह झाला त्यांत मागें झालेले तह कालाच्या अंतापर्यंत ('till the end of the time') पाळावेत असें अभिवचन कंपनीनें दिलें. तें कंपनीनें कितपत पाळलें हें आतां पाहावयाचें आहे.

## खुषीचें कीं सक्तीचें कर्ज ?

**वॉरन हेस्टिंग्जनें** ज्या **बेगमेचा** छळ केला ती निवर्तल्यानंतर तिच्या दौलतीचा वारस **गाजीउद्दीन** हाच झाला. परंतु कंपनीनें ती इस्टेट त्याला पचूं दिली नाहीं. त्यांतून एक कोटी रुपये कंपनीनें लांबविले. त्यास सबब काय सांगितली तर, बेगमेच्या इस्टेटींचे ट्रस्टी आम्हीं आहोंत. अशा रीतीनें वॉरन हेस्टिंग्जच्या तडाख्यांतून राहिलेली मिळकत कंपनीच्या तिजोरींतच गेली. नबाबानें ही ईस्टेट परत मिळण्याबद्दल अनेक अर्ज केले. परंतु दाद लागली नाहीं.

**गाझीउद्दीनचे** वडील **सादतअल्ली** हा मितव्ययी असल्यानें, त्यानें आपल्या खजिन्यांत बरीच शिल्लक टाकली होती. त्यांतून एक कोट रुपये कर्जाऊ म्हणून कंपनीनें घेतले. यासंबंधीं हकीकत अशी सांगण्यांत येते कीं, **वॉरन हेस्टिंग्ज** व नबाब वझीर यांची एक मुलाखत झाली. तींत वझिरानें आपल्याकडून एक कोट रुपये बक्षीस घ्यावे अशी **हेस्टिंग्जला** विनंती केली. परंतु हेस्टिंग्जनें ती रक्कम देणगी म्हणून घेण्याचें नाकारलें व कर्जाऊ म्हणून तिचा स्वीकार केला ! कारण त्यावेळीं नेपाळच्या युद्धामुळें खर्चाची तंगी होती. पुढें नबाबानें आणखी एक कोटी कर्ज द्यावें अशी निकड त्याच्यामागें लावण्यांत आली. नबाबाजवळ इतकी रक्कम नसल्यानें मोठ्या संकटानें त्यानें पन्नास लक्ष रुपये 'कर्जाऊ' म्हणून दिले.

## नासिरुद्दीनचा लोकप्रिय कारभार.

सन १८२७ मध्यें **गाझीउद्दीन** वारला व त्याच्या मागून **नसिरुद्दीन** गादीवर आला. त्याच्याकडून ६२ लक्ष ४० हजार रुपये कर्जाऊ म्हणून घेण्यांत आले. या रकमेच्या व्याजांतून कंपनीनें राजघराण्यांतील कांहीं व्यक्तींना तैनात म्हणून द्यावी व ते बिनवारस मेल्यास सदर रक्कम नबाबाला मिळावी असें ठरलें. परंतु हीहि सर्व रक्कम कंपनीच्या तिजोरींत जाऊन बसली. तिला पुन्हां अयोध्या पाहण्यास मिळाली नाहीं. यानंतर **नबाबानें** पुन्हां चार टक्के व्याजानें ३ लक्ष रुपये कंपनीकडे व्याजीं ठेवले व त्या व्याजांतून लंगडे, लुळे, आंधळे, वृद्ध, निराश्रित, रोगी यांना मदत करावी असें ठरलें. याखेरीज **नासिरुद्दिनानें. लखनौ विद्यालयाच्या** विद्यार्थ्यांना मासिक तीन हजारांच्या शिष्यवृत्ती ठेवल्या, दवाखाने काढले, गरिबांना अन्न देवविण्याची सोय केली, गुलामाची प्रथा बंद केली, ठग व इतर लुटारू यांचा बंदोबस्त केला. अशा रीतीनें त्याचा राज्यकारभार व्यवस्थित चालला असतांहि '**दि प्रायव्हेट लाइफ ऑफ अॅन ईस्टर्न किंग**' म्हणून नसिरुद्दीन याचें हिडिस चित्र रंगविणारी एक कादंबरी विलायतेंत प्रसिद्ध करण्यांत आलीच.

## राजवाड्यावर तोफा.

हा राजा १८३७ सालीं मरण पावला. त्या गादीवर **नासिरुद्दीन** याच्या इच्छेप्रमाणें त्यानें योजलेला मुलगा न बसवितां तेथील **रेसिडेन्ट कर्नल जॉन लो** यानें कारवाई करून **नासिरुद्दीन** याचा चुलता **महंमद अलीशाह** यास गादीवर बसविण्याचें निश्चित केलें. या प्रसंगाची हकीकत त्याच वेळीं प्रसिद्ध झालेल्या **आशिॲटिक जर्नल** मध्यें पुढील प्रमाणें दिली आहे. " वझीर वारल्यानंतर त्याचा मुलगा

गादीवर बसला. पण त्यास कंपनीनें मान्यता न देतां, माजी वझिराचा चुलता त्या जागीं नियुक्त केला. कंपनीनें आपल्या पलटणी राजवाड्याजवळ गोळा केल्या व नासिरुद्दीनची पत्नी व मुलगा यांस पांच मिनिटांच्या आंत सिंहासन सोडून वाड्याबाहेर निघण्याची ताकीद दिली. त्याप्रमाणें त्यांनीं न ऐकल्यास तोफा लावून वाडाच जमीनदोस्त करूं, असेंहि त्यानें धमकावलें." बेगमनें रेसिडेन्टच्या बोलण्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. त्याबरोबर **कर्नल लो** यानें राजवाड्यावर व तेथील माणसांवर तोफा डागण्यास हुकूम केला. त्यांत नबाबाचीं बरींच माणसें ठार झालीं. अखेर राणीस व राजपुत्रास कैद करण्यांत आलें व नंतर **महंमद अल्लीशहाचा** राज्यारोहण-समारंभ झाला. मध्यंतरीची जी चकमक झाली तींत कंपनीचे शिपायी राजवाड्यांत घुसून त्यांनीं मनस्वी लूट केली. सिंहासनाचा हिरान्‌हिरा काढून नेला.

## पुनः नवा करार

महमदअल्ली उर्फ नसीरउद्दौला याला गादीवर बसविण्यापूर्वी **कर्नल लो**नें त्याजकडून पुढील आशयाच्या कागदावर सही घेतली.

"आम्हांला कंपनीशीं नवे करार करून द्यावे लागतील, ही गोष्ट रेसिडेन्टसाहेबांनीं मला कळविली आहे व मला गादीवर बसविल्यास **गव्हर्नर जनरल** सांगतील त्या तहावर मी सही करीन"

गादीवरचा कायदेशीर वारस बाजूला सारून ज्याला गादीवर बसण्याचा कधींच संभव नाहीं, अशा माणसाला गादीवर बसविल्यानंतर तो वाटेल ते करार करून देईल यांत नवल काय ? याप्रसंगीं जो नवा तह झाला त्याप्रमाणें नबाबास आपल्या राज्याच्या बंदोबस्तासाठीं जरूर तेवढी शिबंदी ठेवण्यास परवानगी देण्यांत आली.

परंतु " कंपनी सांगेल त्यावेळीं खर्चांत काटकसर करीन, राज्यकारभारांत सर्वत्र सुधारणा केली पाहिजे. ती ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या संमतीनें व मंजुरीनें करण्यांत येईल व एखाद्या प्रांतांत जास्त अव्यवस्थता माजल्यास तो प्रांत कंपनी आपल्या स्वतःच्या देखरेखीखालीं घेईल " या अटी वझिरानें मान्य केल्या.

या ठरावावरून नबाबाचें स्वातंत्र्य कसें नष्ट करण्यांत आलें होतें याचा स्पष्ट बोध होईल.

हे नबाबसाहेब सन १८४२ मध्यें मरण पावले व त्यांच्यामागें सुरियाजाह अमजुद अलीशाह हा गादीवर बसला. हा नबाब मोठा बुद्धिवान व हुषार होता. राज्यकारभाराकडे चांगलें लक्ष पुरवून त्यांत त्यानें अनेक सुधारणा केल्या. ब्रि०सरकारशींहि तो निष्ठेनें वागला. पंजाबचें युद्ध उत्पन्न झालें, तेव्हां त्यानें कंपनीला सर्व प्रकारें मदत केली. यानें चांगलें नांव मिळविलें, पण तो अल्पायुषी ठरून ता० १३ फेब्रुवारी १८४७ रोजीं मृत्यु पावला. त्याच्या मागून वाजीदअल्ली शाह हा गादीवर बसला. याच्याच कारकीर्दींत अयोध्येची पूर्णाहुति घेण्यांत आली.

## सुधारणांचा तगादा.

यानें राज्यकारभार चांगला चालविला असल्याबद्दल, खुद्द डलहौसीनें, तो १८४७ मध्यें लखनौला गेला असतांना, उद्गार काढले आहेत. लॉर्ड ऑक्लंडनें तर याचेबद्दल पुढील उद्गार काढले आहेत,

"In comparison with times past, he had greatly improved the kingdom."

परंतु अशा प्रशस्तीपत्रांचा कंपनीला विसर पडून, राज्यांत अव्यव्यवस्था माजली आहे, तींत सुधारणा न झाल्यास कंपनीला हात

घालावा लागेल, अशी तंबी नबाबाला देण्यांत आली. त्याबरोबर नबाबानें सुधारणा कशा करावयाच्या याची एक योजना, रेसिडेन्ट-कडे मागितली व त्या योजनेप्रमाणें ब्रिटिश मुलखाला लागून असलेल्या आपल्या मुलखांत प्रथम त्या सुधारणा लागूं करूं असेंहि कळविलें. तेव्हां रेसिडेन्टनें दु० रेसिडन्ट मेजर बर्ड याला वायव्य प्रांताचा ले० गव्हर्नर थॉम्सन याच्या संमतीनें सुधारणा करण्यासाठीं रवाना केला. मेजर बर्ड यानें एक योजना तयार केली ती त्यानें थॉम्सनला दाखविली. थॅाम्सननें तींत कांहीं सुधारणा सुचवून ती मान्य केली. त्यानंतर मेजर बर्ड लखनौला आला व रेसिडेन्ट कर्नल रिचमण्ड याच्या मान्यतेनें त्यानें नबाबाला त्या सुधारणा–सूचना सादर केल्या. नबाबानें त्यांनाहि मान्यता दिली. अशा रीतीनें सर्व प्रकार नीट झाला व अखेर हिंदुस्थान-सरकारच्या मान्यतेसाठीं त्या सूचना कलकत्त्यास पाठविण्यांत आल्या. परंतु तेथें परराष्ट्रमंत्री सर हेनरी इलियट यानें सर्व सूचना फेटाळून, "नबाब जर सर्व मुलूख आमच्या स्वाधीन करील तरच आम्ही सुधारणांचा विचार करूं," असें म्हणून मेजर बर्डची योजना धुडकावून लावली.

## शेवटच्या ग्रासाची तयारी.

यानंतर लखनौ—रेसिडेन्टच्या जागेवर कर्नल स्लीमन याची नेमणूक झाली. याच्या नेमणुकीनें अयोध्येचें भवितव्य ठरून गेल्यासारखें झालें. कारण कर्नल स्लीमन हा लखनौला नेमल्यानंतर लॉर्ड डलहौसी यानें त्याला एक पत्र लिहिलें, त्यांत डलहौसी म्हणतो, "१८४७ च्या आक्टोबरांत अयोध्येच्या राजाला लिहिलेल्या पत्रांत त्याला स्पष्टच बजावलें आहे कीं, दोन वर्षांच्या आंत जर राज्यकारभारांत सुधारणा न झाली, तर ब्रि० सरकार आपल्या हातीं सर्व कारभार घेईल. परंतु दोन वर्षांत कांहींच सुधारणा होणार नाहीं,

हें पक्कें लक्षांत घ्या. अशा सुसंपन्न प्रांताचा कारभार चालविण्यास योग्यच मनुष्य पाहिजे व तो आतां मिळाला, ही उत्तम गोष्ट झाली. तुम्हांला राज्यकारभाराचा अनुभव मोठा, तेव्हां तुम्हीच लखनौचे रेसिडेन्ट होणें योग्य आहे."

## ढवळाढवळीस प्रारंभ

कर्नल **स्लीमनची** अशी हेतुपूर्ण निवड झाली असल्यानें, तो **लखनौला** येतांच त्यानें राज्यकारभारांत ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली. **लखनौच्या** मुख्य प्रधानाचा दु० मंत्री, **वसीअली-खान** म्हणून होता. हा सुशिक्षित, सुविद्य, अनुभवी मनुष्य असून, त्याला इंग्रजी कायदेकानू व राज्यसंस्था यांचें चांगलें ज्ञान होतें. अर्थात् आपलें कारस्थान यशस्वी करावयाचें तर असा मनुष्य अधिकाराच्या जागेवर उपयोगी नाहीं, हें जाणून स्लीमननें ता० २२ **मार्च** १८४९ रोजीं नबाबाला एक पत्र लिहिलें व "**वसीअलीखान** यास **कर्नल** लो व **कॉलफील्ड** या रेसिडेन्टांच्या कारकीर्दीत कामावरून कमी केलें असून त्यास हद्दपारहि केला होता, तेव्हां अशा राजद्रोही माणसाला लखनौंत यापुढें ठेवूं नये" असें सुचविलें. वसीअलीखान पूर्ण निरपराधी असल्याची नबाबाची खात्री असल्यानें, त्यानें उलट कळविलें कीं, त्यावर कोणताहि अपराध शाबीत झाल्याखेरीज हद्दपार करण्यानें राज्यांत घोंटाळा माजेल. परंतु स्लीमनला हें साधें उत्तर कसें खपणार ? त्यानें निर्लज्जपणानें व उद्धटपणानें पुन: लिहिलें,

"There is no necessity to prove his ( Wassee Ali's ) guilt, as the appointment imposed upon him is not his jageer or hereditory property. Therefore it is not necessary at the time of his dismissal to investigate the proofs."

नबाबाचा वसीअल्लीखानावर पूर्ण विश्वास होता. त्यावर केलेले आरोप सर्वथैव असत्य असल्याची त्याची खात्री होती. परंतु सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं, या न्यायानें नबाबास **वसीअल्लीखानास** लखनौ सोडून जाण्यास सांगावें लागलें.

अशा रीतीनें लोकदृष्टया नबाबाचें महत्त्व जितकें कमी करतां येईल तितकें स्लीमन करीत होता. **वसीअल्लीखानास** हद्दपार करून त्याची तृष्णा शमली नाहीं, म्हणून **वसीअल्लीखान** आपला खून करण्यास टपला आहे. अशा कंड्या त्यानें उठविल्या व तें प्रकरण इतकें चिडीला गेलें कीं, अखेर नबाबानें या प्रकरणाची न्यायकोर्टाकडून चौकशी करण्याचें ठरविलें. या खटल्याला हजर राहण्याबद्दल स्लीमनलाहि बोलावण्यांत आलें होतें, पण त्यानें निमंत्रण नाकारलें. या कोर्टानें सर्व प्रकारची कसून चौकशी केली; परंतु त्यांत एकमतानें असा निर्णय लागला कीं, वसीअल्लीखान पूर्ण निरपराधी आहे. तेव्हां कोर्टानें त्याला दोषमुक्त केलें. परंतु या सर्व छळानें **वसीअल्लीखानावर** फार वाईट परिणाम होऊन, तो अखेर १८५५ मध्यें मरण पावला आणि तेव्हांच छळांतून सुटला.

## नबाबाच्या मागें हेर.

परंतु नबाबाच्या मागें **स्लीमन** हात धुऊनच लागला असल्यानें, नबाबानें **कुरन अहमद** नांवाच्या एका बदमाशाला हद्दपार केलें होतें, त्याचा कैवार घेऊन स्लीमन साहेब उठले. वरील **कुरन अहमद** हा इंग्रजांचा हस्तक व त्यांचा हेर होता. तो खऱ्याखोट्या हव्या त्या बातम्या **रेसिडेन्टला** पुरवून आपली तुंबडी भरी. तेव्हां त्याचा कैवार **स्लीमन** साहेबानें घेतला हें सहजच झालें. त्यामुळें संतापून त्यानें नबाबाला पत्र लिहिलें कीं, "**कुरन अहमद** मला

भेटतो म्हणून तो जर दोषी, तर यापुढें मला आपल्या प्रधानास अगर वकिलास भेटीस पाठवूं नये. तुमच्या प्रजाजनांपैकीं मला कोणीं भेटूं नये अशी जर तुमची इच्छा, तर मग येथें रेसिडेन्सी तरी कशाला ? व तुम्ही असें बंड उभारल्यावर ब्रिटिश सैन्याचें कारण तरी काय ?"

## बंडखोरांचा पाठीराखा स्लीमन

परंतु नबाबाला तुच्छ लेखणें येथेंच थांबलें नाहीं. स्लीमननें नबाबाला कळविलें कीं, " यापुढें तुम्ही ' गाझी ' ( Majesty ) ही पदवी लावतां कामा नये. "

**स्लीमन** एवढेंच करून राहिला नाहीं. त्यानें अयोध्येच्या न्यायखात्यांत ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली. एका सामान्य माणसाच्या तक्रारीवरून **छत्तरसिंग** नांवाच्या एका जमीनदाराला पकडण्यासाठीं त्यानें पलटणी पाठविल्या व **छत्तरसिंग** स्वखुषीनें स्वाधीन न झाला तर त्याचा गांव तोफा लावून उडवून देण्यास फर्माविलें. परंतु **छत्तरसिंग** स्वखुषीनें स्वाधीन झाला. त्याच्या अपराधांची चौकशी झाली. तेव्हां छत्तरसिंगावर निष्कारण आळ घेण्यांत आला हें सिद्ध झालें व माहिती देणारीं माणसेंच बदमाष असल्याचें दिसून आलें.

याखेरीज त्यानें मोठी ढवळाढवळ केली, ती म्हणजे सारा-वसुलीबाबत. कित्येक जमीनदार सारा देण्यास तयार नसत. त्यांना स्लीमन पाठीशीं घाली. त्यामुळें ते चढेल बनले. नबाबाच्या तिजोरींत पैसा येईनासा झाला. या सर्व अत्याचारांवर कळस म्हणजे त्यानें अयोध्याराज्यांत काढलेला दौरा हा होय.

## राज्यहरणासाठीं नबाबाच्या खर्चानें दौरा.

हा दौरा त्यानें सन १८५० मध्यें काढला. अयोध्यादरबारची या दौऱ्याला मान्यता नव्हती. त्याचप्रमाणें ब्रि० सरकारनेंहि या दौऱ्यास विरोध केला. परंतु स्लीमननें दोन्ही सरकारांस धाब्यावर बसवून हा दौरा काढलाच. या दौऱ्यांत स्लीमननें दरबाराविरुद्ध लोकांच्या तक्रारी गोळा करण्यास सुरुवात केली. यासंबंधानें हूकर म्हणतो:—

"He who goeth about to persuade a multitude that they are not so well governed as they ought to be, shall never want attentive and favourable hearers."

या दौऱ्यांत स्लीमननें ज्या तक्रारी व अर्ज मिळविले त्यांचा एक रिपोर्ट त्यानें लॉर्ड डलहौसीकडे रवाना केला. स्लीमननें या दौऱ्यांत दरबाराविरुद्ध पुरावा गोळा केला. तो सर्व दौरा त्यानें दरबारच्याच खर्चानें केला; दरबारला या दौऱ्यापायीं लक्षावधी रुपये खर्चावे लागले ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. या दौऱ्यामुळें सारावसुली कमी-अतिशय कमी-झाली. दरबाराविरुद्ध सुमारें १९० तक्रारी स्लीमननें गोळा केल्या. या तक्रारी गोळा करतांना त्या खऱ्याखोट्या पाहण्याचेंहि त्यानें सोडून दिलें. शिवाय राजाविरुद्ध कोणाची बारीकसारीक तक्रार असली, तरी त्या तक्रारवाल्याचें नांव नोंदून त्यांची एक मोठी यादी तयार करण्यांत आली. अशा प्रकारची जरूर ती सामुग्री निर्माण करून प्रकृती बिघडल्यानें सन १८५४ सालीं स्लीमन लखनौ सोडून गेला.

## औट्रामची नेमणूक.

त्याच्या जागीं जनरल औट्राम याची नेमणूक करण्यांत आली. त्याच्याकडे मुख्य काम असें सोंपाविण्यांत आलें होतें कीं, .... ....

" With a view to determine whether Oudh's affairs still continue in the state in which Colonel Sleeman from time to time described them to be."

या हुकमावरून स्लीमनचें काम पुरें करण्यासाठींच औट्रामची नेमणूक होती हें स्पष्ट दिसतें. औट्राम ता० ५ डिसेंबर १८५४ रोजीं लखनौस गेला. ता० १५ मार्च १८५५ पर्यंत त्यानें आपली चौकशी पुरी केली व तिचा रिपोर्ट सादर केला. या रिपोर्टावरून अयोध्येचें भवितव्य कायम झालें !

## स्लीमनचें काम पुरें करणारा औट्राम.

औट्रामनें आपला रिपोर्ट तपशिलवार केला, त्यांत खुद्द नबाब, उत्पन्न, न्याय, पोलीस, लष्कर, रस्ते, अपराधांची जंत्री, जुलूम-जबरदस्ती अशीं शीर्षकें केलीं होतीं. या रिपोर्टासंबंधानें खुद्द औट्राम म्हणतो,

" In the absence of any personal experience in the Country, I am of course entirely dependent for my information on what I find in Residency Records and can ascertain through the channels which supplied by my predecessor."

यावरून औट्रामनें स्लीमनचें काम पुरें केलें असेंच दिसून येतें.

असा प्रकार सुरू असतां त्याच सुमारास हनुमज्जयंति व मुसलमानांचे डोले एकाच दिवशीं आले. दोघांच्याहि मिरवणुकी निघाल्या. त्यांत दिल्ली, आग्रा, प्रयाग, अजमेर व इतर बऱ्याच ठिकाणीं दंगे झाले. तसाच थोडासा प्रकार लखनौलाहि झाला. नबाबानें मुसलमान गुंडांना अटक करून तात्काळ बंदोबस्त केला. दंगा वाढूं दिला नाहीं. परंतु हें एक मोठेंच कारण कंपनीला मिळालें.

## औट्रामच्या रिपोर्टाला डलहौसीचा पाठिंबा

पुढें ता० १८ जून १८५५ रोजीं डलहौसीनें औट्रामच्या

रिपोर्टावर एक मिनीट लिहिलें व अयोध्येच्या राजानें मागील सर्व तह रद्द समजून नवा तह करून द्यावा व यापुढें मुलकी व लष्करी कारभार कंपनीच्या स्वाधीन करावा, असा प्रश्न वरिष्ठ कौन्सिला-पुढें चर्चेसाठीं काढला. यावर पुष्कळ चर्चा झाली. अनेकांचीं अनेक मतें पडलीं; परंतु त्यांचीं मतें अनेक असलीं तरी राज्य खालसा करावें यासंबंधानें सर्वांचें च एकमत होतें. मतभेद होता तो मार्गासंबंधानें !

डल्हौसीनें औट्रामचा रिपोर्ट व त्यावरील चर्चा कोर्ट ऑफ डायरेक्टरांना कळविली. त्याबरोबर स्वतःच्या सूचनाहि केल्या व लागलीच अयोध्या प्रांतांतील रयतेला दहशत बसविण्यासाठीं व तेथें कदाचित् कांहीं दंगा झाल्यास प्रतिकारार्थ म्हणून बरेंच सैन्य पाठविण्यांत आलें.

## दरबारला दादहि लागूं दिली नाहीं.

आपल्याविरुद्ध अशा प्रकारची कांहीं कारवाई सुरू आहे अशी कुणकुण दरबारला लागली होती. परंतु ती काय होती याची दाद लागेना. पुढें औट्राम १८५६ मध्यें कलकत्त्यास डल्हौसीला भेट-ण्यास गेला. तेव्हां त्याच्या जागीं काम करणारा रेसिडेन्ट कॅ० टेस याजपाशीं कानपुरला इतकें सैन्य कां गोळा केलें, औट्राम कलकत्त्यास कां गेला याबद्दल दरबारनें विचारलें. परंतु त्यानें भीतीचें कांहींच कारण नाहीं अशी खातरजमा केली. इतक्यांत औट्राम परत आला व त्यानें सर्व संशयांची निवृत्ति करून कंपनीचा निर्णय स्पष्टपणें नबाबाच्या कानावर घालण्याचें ठरविलें या पूर्णाहुतीचा दिवस ता. ३० जानेवारी १८५६ हा ठरविण्यांत आला. त्या दिवशीं औट्रामनें मुख्य प्रधानास बोलावून आणून त्याच्या कानावर हा

निर्णय घातला व सांगितलें कीं, नबाबसाहेबांवर कंपनीसरकारची मेहेरनजर पूर्वीप्रमाणेंच कायम राहील. त्यावर प्रधानानें उत्तर दिलें. ‘ त्यांचें राज्य काढून घेतल्यानंतर कंपनीच्या कृपेची त्यांना गरजच काय ? ’ प्रधानानें आपल्या राज्याची इतर देशी राज्यांशीं तुलना केली व आपण अयोध्याराज्यांत काय काय सुधारणा केल्या, त्याहि औट्रामला सांगितल्या. परंतु अशा निरर्थक गोष्टी बोलण्यांत तात्पर्य नाहीं असें औट्रामनें प्रधानास बजावलें.

## नबाबास नोटीस.

प्रधानानें नबाबवझीराच्या कानीं ही सर्व हकीकत घातली. नबाबाला या सर्व प्रकारांमुळें अत्यंत आश्चर्य व परम दुःख झालें. त्यानें रेसिडेन्टला पत्र लिहून आपण कंपनीशीं आतांपर्यंत कसे निष्ठेनें वागत आलों हें कळविलें. यावर औट्रामनें कळविलें कीं, आतां या गोष्टी ऐकण्यास वेळ नाहीं. सरकारनें पूर्ण विचारांतीं सर्व गोष्टी करावयाचें ठरविलें आहे व तीन दिवसांच्या आंत आपण आपली मान्यता कळविली पाहिजे. हें उत्तर येतांच नबाबानें आपलें सर्व सैन्य व दारावरील सर्व पहारेकरी निःशस्त्र केले. अयोध्याप्रान्तावर जें इंग्रजांचें सैन्य चालून येत होतें त्याला दाणापाणी पाठविलें. आपण कंपनीशीं किती निष्ठेनें वागतों हें दाखविण्याचे सर्व उपाय त्यानें योजले; परंतु त्यांचा कांहींएक उपयोग झाला नाहीं.

ता. ४ फेब्रुवारी रोजीं औट्राम नबाबाकडे गेला व अयोध्याराज्य कंपनीच्या स्वाधीन करण्याचा हुकूम त्यानें नबाबावर बजावला. आपणांस हा हुकूम मान्य नसून त्याविरुद्ध आपण विलायतसरकारकडे दाद मागणार असें नबाबानें सांगितलें; परंतु त्याचा कांहीं उपयोग न होतां औट्रामनें तीन दिवसाच्या आंत नबाबानें राज्य-

कारभार कंपनीकडे न सोंपविल्यास कंपनी तो सक्तीनें घेईल असें बजावलें.

## कंपनीचा जाहीरनामा.

त्याप्रमाणें ता० ७ फेब्रुवारी १८५६ रोजीं औट्रामनें जाहीरनामा काढून अयोध्याप्रान्त खालसा केल्याचें प्रसिद्ध केलें. कंपनीचे अंमलदार सर्वत्र नेमण्यांत आले. जुन्या कामगारांना कामावर ठेवण्याचेंहि त्यानें आमिष दाखविलें; परंतु कोणींहि त्याच्या प्रलोभनास भुलला नाहीं. आपण या अन्यायाची दाद मागण्यास विलायतेस जाणार, तेव्हां परवानगी द्या, अशी नबाबानें मागणी केली; परंतु रेसिडेन्ट औट्राम यानें ती धुडकावून लावली इतकेंच नव्हे, तर नबाबाच्या विश्वसांतील अनेक माणसें ओलीस धरलीं व आपणाविरुद्ध नबाबाला कांहीं पुरावा जमा करतां येऊं नये म्हणून राज्यांतील मोठेमोठे अधिकारी नजरकैदेंत टाकले. नबाबाला राज्यच्युत केल्यानंतरहि त्यास मनस्वी मानहानी व त्रास सोसावा लागला.

## अयोध्येच्या राजलक्ष्मीचा लिलांव.

अयोध्याराज्य खालसा करण्यांत आल्यानंतर राजवाडे, बागबगीचे, जडजवाहीर, नानाप्रकारचीं मौल्यवान वस्त्राभरणें हीं जप्त करण्यांत आलीं हें सांगण्यास नको. राजाचा ग्रंथसंग्रह अत्यंत मोठा असून त्यांत सुमारें दोन लक्ष हस्तलिखित अमूल्य असे ग्रंथ होते. नबाबाच्या पागेंत अरबी, इराणी, इंग्लिश जातींचे नामांकित व मौल्यवान घोडे होते. हत्ती, उंट व त्यांचे अलंकार यांची लूट अमर्याद सांपडली. या व इतर सर्व वस्तूंचा मातीमोलानें जाहीर लिलांव करण्यांत आला. राजाचें शस्त्रागार अत्यंत प्रेक्षणीय होतें. त्यांत नानाप्रकारचीं कलाकौशल्याचीं

शस्त्रें होतीं, त्यांची हि विल्हेवाट लावण्यांत आली. जनान्यांतील स्त्रियांशींहि अत्यंत असभ्य वर्तन करण्यांत आलें. त्यांना छत्तरमंझील या राजप्रासादांतून जबरीनें काढण्यांत आलें. त्या वेळचें वर्णन काय करावें ?

कंपनी-सरकारनें 'आपल्या चिरसंबंधी परम मित्राची' ही अशी वाट लाविली ! !

[ आधारभूत ग्रंथ—

टॉरेन्स, पार्लमेन्टरी कागदपत्रें, गदरका इतिहास. ]

---

## प्रकरण सातवें

# १८५७ चें स्वातंत्र्य-युद्ध.

आतांपर्यंत इंग्रजांनीं, हिंदुस्थानास आपल्या पाशांत कोणत्या उपायांनीं गोविलें त्याचें वर्णन केलें. या पाशाच्या धाग्यादोऱ्यांचें स्वरूप, भारतांतील राजेरजवाड्यांना उकलण्यास जवळजवळ ७५ वर्षें लागलीं. श्रीरामचंद्राच्या अयोध्येनें, सन १८५६ मध्यें, त्यांचे डोळे खाडकन उघडविले. दृष्टि साफ झाल्यानंतर, त्यांनीं आपलें " हरपलेलें श्रेय " परत मिळविण्याचा प्रचंड उद्योग आरंभिला; पण ज्या दोषांनीं तें श्रेय हरवलें, ते दोष मात्र झाडून टाकले नाहींत. अर्थात् त्याचा जो परिणाम व्हावयाचा तोच झाला ! सन १८५७ चें स्वातंत्र्य-युद्ध फुकट गेलें आणि भारतदेश, इंग्रजांच्या पोलादी चौकटींत गच्च आवळला गेला. हें कसें घडलें, त्याचें, रोमहर्षणकारक पण तितकेंच दुःखकारक वर्णन या शेवटच्या प्रकरणांत दिलें आहे. वाचक यापासून योग्य तो बोध घेतील काय ?

**हिंदुस्थानाचा** आजपर्यंत लिहिला गेलेला बहुतेक सर्व इतिहास हिंदुस्थानच्या हितशत्रूंनीं लिहिला असल्यानें इतिहासलेखनाला जो निःपक्षपातीपणा व न्यायदृष्टि असणें जरूर असतें, ती दृष्टि व तो न्याय त्यांजकडून पाळला गेला नाहीं. हिंदी लोक इतिहासकर्ते असले तरी इतिहासलेखक नसल्यानें त्यांजसंबंधानें परकीय इतिहासकारांनीं केलेला अन्याय आजतागायत आम्हांस सोसावा लागत आहे. विशेषतः इंग्रज इतिहासकारांनीं हिंदुस्थानचा इतिहास केवळ पक्षपातित्वानें लिहिला आहे. या गोष्टीस अपवाद नाहींत असें नाहीं व त्यांबद्दल आम्ही अकृतज्ञहि नाहीं. परंतु बहुतेक आंग्ल-इतिहासकारांची हिंदुस्थानच्या इतिहासासंबंधानें समतोलवृत्ति मुळींच राहिली नाहीं, हें म्हणणें विशेष धाडसाचें मात्र खास नाहीं.

मराठ्यांचा श्रीशिवाजीमहाराजांपासून थेट पेशवाईअखेरपर्यंतचा इतिहास पाहिल्यास याच विधानास बळकटी येईल. मराठ्यांच्या स्वराज्यसंस्थापकास डोंगरांतील लुटारू, चोर, अक्षरशत्रु म्हणण्यापर्यंत ज्या इतिहासकारांनीं धाष्टर्य केलें त्यांनीं शेवटच्या बाजीरावास पळपुटा, भित्रा, व्यसनी इत्यादि विशेषणें लावावींत यांत आश्चर्य काय ! कारण बाजीरावापासून तर यांनीं राज्य घेतलें; तेव्हां तो दुष्ट, बदफैली, भित्रा, बाईलवेडा होता, अशा शेलक्या पुष्पांनीं हे इतिहासकार जर त्याची पूजा न बांधतील, तर मराठी—साम्राज्य रसातळास नेण्यासाठीं इंग्रजी मुत्सद्यांनीं जीं अनेकविध कुटिल कारस्थानें केलीं तीं समर्थनीय कशीं ठरतील ! परंतु या कारणांखेरीज हिंदुस्थानचा बनावट व आपल्या हितास पोषक असा इतिहास लिहिण्याचें आणखीहि दुसरें कारण आहे. इंग्रज, जेते असल्यानें त्यांनीं जित राष्ट्राचें जितकें हिडिस चित्र रंगवितां येईल तेवढें रंगविण्यांत आपली लेखणी शिणविली, याला फार महत्त्वाचें कारण आहे. आपल्या देशबांधवांच्या अंतःकरणांत स्वाभिमान उत्पन्न होऊन आपल्या पूर्वजांबद्दल आदर वाढावा यासाठींहि असा प्रयत्न आंग्ल इतिहासकारांनीं करणें शक्य आहे व तो त्यांच्या पुरता प्रशंसनीय असला तरी दुसऱ्याच्या चितेवर आपली पोळी भाजून घेण्याच्या कोटींतील ठरतो व त्यामुळें त्याचें महत्त्व सहजच कमी ठरतें. सुदैवानें अलीकडे महाराष्ट्रांत इतिहासाची योग्य साधनें व सामुग्री जमवून ‘ खरा ’ इतिहास मांडण्याकडे विद्वानांचें लक्ष वेधलें आहे ही गोष्ट अत्यंत आशाजनक आहे.

उदाहरणार्थ, श्री० आबा चांदोरकर यांनीं, “ श्रीशिवशाहीचा लेखनालंकार ” या महत्त्वाच्या पुस्तकांत खुद्द श्रीशिवाजीमहाराजांचें हस्ताक्षर प्रसिद्ध करून, त्यांचे वरील अक्षरशत्रुत्वाचा परकीय इति-

हासकारांचा सिद्धांत सपशेल व निःसंशयपणें पार धुडकाऊन लाविला आहे.

**सत्तावन्न सालाच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या** इतिहासाबद्दल आमची उपेक्षा सर्वस्वीं असमर्थनीय आहे. केवळ याच विषयावर आंग्ल इतिहासकारांनीं गाडांचें ओझें होईल इतके ग्रंथ अनेक रूपानें प्रसिद्ध केले आहेत. त्यांतील सर्वच 'इतिहास' या व्याख्येच्या कसो-टीस पूर्णपणें उतरणारे नसले तरी, **के** व **मॅलिसन** यांसारख्या निःपक्षपाती इंग्रजी लेखकांनीं साद्यंत इतिहास लिहून, हिंदी वाच-कांवर एकप्रकारें उपकारच केले आहेत. परंतु दुःखाची गोष्ट कीं, सत्तावन सालचें स्वातंत्र्ययुद्ध मराठी सेनानायकांनीं लढविलें असतां मराठींत मात्र त्याबद्दल मुबलक वाङ्मय उपलब्ध असूं नये ! नाहीं म्हणावयास **कै० पारसनीस** यांचें **"झांशीच्या महाराणी लक्ष्मी-बाईसाहेब"** यांचें चरित्र, **श्री. चिं० वि० वैद्य** यांचें **'माझा प्रवास'** व **प्रो० बेहेरे** यांचें १८५७ वरील पुस्तक इतकींच नांव घेण्याजोगीं पुस्तकें मराठींत उपलब्ध आहेत. म्हणजे या विषयाची परिपूर्ण माहिती, महाराष्ट्रीय आबालवृद्धांस यापेक्षांहि जास्त व्हावयास पाहिजे ही गोष्ट उघड आहे.

## इंग्रजीसत्ता कशी प्रस्थापित झाली ?

**इंग्रजांची** राजकीयदृष्ट्या सत्ता प्रस्थापीत झाली स. १७५८ सालीं व तेव्हांपासून हिंदुस्थानांत आपली सत्ता वाढविण्याकडे त्यांचें सर्व लक्ष लागलें होतें. तेव्हांपासून सर्व **हिंदुस्थान** त्यांनीं एकरंगी कसा केला ही सर्व कथा सांगण्याचें हें स्थान नव्हे. परंतु या लोभाचा अतिरेक झाला व त्यामुळेंच हें स्वातंत्र्ययुद्ध झालें. सन १७६१ मध्यें पानिपत बुडालें. **मोंगलाईसत्तेनंतर हिंदुस्थानांत** सर्वांत प्रबल अशी सत्ता **मराठ्यांचीच** होती व धूर्त **इंग्रज** व्यापारी हिंदुस्थानांत प्रवेश

झाल्यापासून आपल्या वखारींत बसून हिंदी राजकारणाचें सूक्ष्मपण अवलोकन करीत होते. मुसलमानी सत्ता, ऐश्वर्य शिखराला असलेली तेथून कोसळलेली त्यांनीं पाहिली. अशा प्रचंड मोगल सत्तेला धुडकावून लावून सह्याद्रीच्या कडेपठारांवरील मावळ्यांनीं स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा केलेली त्यांनीं पाहिली; त्या सत्तेचा विस्तार झालेला पाहिला व १७६१ मध्यें, आसेतुहिमाचल त्या सत्तेचा बोलबाला चालू असतांच पानिपतावर तिला कसा जबर धक्का बसला या गोष्टीहि त्यांनीं पाहिल्या. पानिपत बुडाल्यानंतर, मराठी-सत्ता आतां क्षीण झाली आहे, तेव्हां आपण दिल्लीवरच हल्ला करावा, अशी वाटाघाट त्या वेळीं कलकत्त्यास कंपनीच्या कचेरींत झाली. परंतु त्यावेळीं एका इंग्रजी मुत्सद्यानें जें उत्तर दिलें, त्यांत त्याचा दूरदर्शीपणा व हिंदी पारतंत्र्याचा सर्व इतिहास समाविष्ट झाला आहे. तो म्हणाला, आतांच दिल्लीवर जाण्याची घाई कां ? आणखी थोड्या काळांत दिल्लीच काय पण सर्व हिंदुस्थान आपल्या ताब्यांत आल्याखेरीज राहात नाहीं. कारण, क्लाइव्ह म्हणतो " ज्या देशांतील लोक स्वदेशबांधवांवर निर्विकारपणें हत्यारें चालवितात ते लोक कधीं स्वतंत्र राहणेंच शक्य नाहींत ! " किती कटु सत्य हें ! असो.

## देशी राज्यें खालसा कां केली ?

प्लासीनंतर ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांत कसकसें आक्रमण केलें, आपसांत भांडणें कशीं लाविलीं, इसापनीतींतील न्यायाधीश वानराप्रमाणें दोन्ही पक्ष नामोहरम कसे केले, हा सर्वच इतिहास मनोरंजक व वाचनीय आहे. पेशवाई बुडविल्यानंतर हिंदुस्थानांत एक मात्र प्रबल शक्ति इंग्रजांचीच राहिली. दुसरी कोणी प्रबल प्रतिस्पर्धी सत्ता न राहिल्यानें कर्तुं अकर्तुम् अशी त्यांची वृत्ति झाली असल्यास आश्चर्य

नाहीं. या मदाच्या भरांत त्यांनीं **सातारा, नागपूर, झांशी, तंजावर, पंजाब, अयोध्या,** हे देश गिळंकृत केले. राजकीय वर्चस्व गाजविणें, अखिल हिंदुस्थानभर एक इंग्रजी अंमलच स्थापन करणें, हा या कारवाईतील मुख्य उद्देश असला तरी त्याच्या पोटीं इतर व्यापारी हेतूहि होते. **सातारा** नाहींसा करण्यांत केवळ राजकीय श्रेष्ठत्व गाजविणें हा हेतु होता. कारण **पेशवाई** बुडाली तरी **सातारा** गादीकडे अखिल मराठामंडळ श्रेष्ठत्वाच्या भावनेनें पाही. साताऱ्याबद्दल अतिशय आदर **मराठामंडळांत** असे. ही गोष्ट इभ्रतीच्या दृष्टीनें **इंग्रज** सत्ताधाऱ्यांना मानहानीची वाटल्यानें **सातारा** नष्ट केला. **नागपूर** बुडविलें त्याचें कारण, त्या भूमींत कापूस सुंदर व मुबलक पिकतो. **इंग्रजांनीं हिंदुस्थानांतील** कापडाचा धंदाच बुडविला असल्याकारणानें हिंदी लोक कापडाच्या बाबतींत परावलंबी झाले व **मँचेस्टर** भरभराटीस येऊं लागलें. त्या **मँचेस्टरच्या** फायद्यासाठीं **नागपूर** प्रांत बुडविला. पंचनद्यांनीं जलपूरित असलेला देश धान्यसमृद्ध असल्यानें तो घेऊन आपल्या रोटीची कायमची व्यवस्था केली. सदर प्रान्त कोणत्याना कोणत्या कारणासाठीं घेतलेच पाहिजेत अशाबद्दल, **इंग्लंडमध्यें** व **हिंदुस्थानांतील इंग्रजांमध्यें** ते घेण्यापूर्वी फार दिवस चळवळ चालली होती व त्यांतच हे उद्देश त्यांनीं नमूद केले होते.

यांतील बरींच राज्यें योग्य वारसांच्या अभावीं खालसा करण्यांत आलीं, असें **डल्हौसी** म्हणतो. परंतु **अयोध्या-राज्य** किंवा **पंजाब** किंवा **सिंध** हे प्रांत कां खालसा केले ? तेथें तर योग्य वारसांचा प्रश्नच नव्हता. तथापि सदर प्रांत घेण्याचें बऱ्याच काळ आधीं ठरून ती गोष्ट **डल्हौसीच्याकडून** करवून घेतली, इतकाच त्याचा अर्थ.

## स्वातंत्र्ययुद्धाचीं कारणें.

स्वातंत्र्ययुद्धाचीं जीं अनेक कारणें घडलीं, त्यांत योग्य वारसाचा अभाव हें एक कारण आहे. वस्तुतः हिंदुधर्मशास्त्राच्या दृष्टीनें अस्सल वारस नसला तर दत्तक घेतल्यानंतर, तो औरस संततीइतकाच न्याय्य ठरत असतो. परंतु कंपनीच्या स्वाहाकाराच्या धोरणामुळें तिनें हिंदूंच्या धर्मप्रवृत्तीकडे बिलकूल लक्ष दिलें नाहीं. ईंग्रज, हिंदुस्थानांत एकमात्र सत्ताधारी झाल्यावर त्यांची अशी वृत्तीच झाली कीं, जित लोकांना कांहीं स्वतंत्र मतें, अगर धर्माचार असतांच कामा नयेत. लष्करी लोकांवरही यासंबंधांत त्यांचा जुलूम झाल्याखेरीज राहिला नाहीं. वेलोर येथें सन १८०७ मध्यें पलटणींत दंगा झाला, तो धर्माच्या बाबतींत गोऱ्या अधिकाऱ्यांनीं नसती ढवळाढवळ केली म्हणूनच. सन १८२४ मध्यें पहिलें ब्रह्मी युद्ध झालें, त्या वेळीं बंगालमधील बराकपूरच्या पलटणीची कत्तल करण्यांत आली. ती, ते आपल्या धर्मसमजुतीला चिकटून राहिले म्हणून.

हिंदी लोकांच्या धार्मिक मतांबद्दल इंग्रज लोक कसे बेफिकीर असतात हें मि० नोलन यानें सांगितलें आहे. तो म्हणतोः—

"The Government became less careful of offending the religious prejudices of the soldiers. Instances had occured of these prejudices having been invaded in various ways without creating revolt, but the Government did not know that in every such case bad feeling was created, which was quietly but actively diffused."

(History of British Empire Vol. II, P. 706.)

( शिपायांच्या धार्मिक समजुती दुखविण्याच्या बाबतींत सरकार निष्काळजी झालें. अशा समजुती नाना तऱ्हांनीं धुडकावून लाव-

त्याचीं उदाहरणें घडलीं तरी, बंड झालें नाहीं. पण अशा प्रत्येक वेळीं भावना बिघडत गेल्या हें सरकारला कळलें नाहीं.)

## देशी शिपायांना विषम वागणूक

याखेरीज लष्करी लोक बिघडण्यास दुसरेंहि एक कारण झालें. वस्तुतः **हिंदुस्थानांत इंग्रजी** सत्ता स्थापन झाली, ती हिंदी शिपायांच्या मदतीनें. हे हिंदी शिपायीहि अत्यंत शिस्तशीर, अत्यंत काटक, राजनिष्ठ, अल्पसंतुष्ट असे असून त्यांजवर अंमल गाजविणें फार सोपें असे. एक हजार **ब्रिटिश** शिपायांना ताब्यांत ठेवण्यापेक्षां पांच हजार हिंदी शिपायांना कह्यांत ठेवणें फार सुलभ असतें, असें १८३२ सालीं **कॉमन्स सभेनें** नेमलेल्या चौकशी-कमिटीपुढें, **सर जॅस्पर निकोल्स** यानें सांगितलें. त्यांना पगार तरी भरपूर असावा तर तेंहि नाहीं. चार रुपयांपासून वीस रुपयांपर्यंत भक्कम पगारावर त्यांनीं खूप चैन करावी ! पण **युरोपियन** शिपायांस अनेक सवलती मिळत; त्यांपैकीं कसलीहि सवलत देशी शिपायांना नसे. उलट सैन्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जावयाचें म्हणजे या देशी शिपायांना भत्ताहि न मिळतां सर्व सामानसुमान त्यांचें त्यांनाच वाहून न्यावें लागे. त्याबद्दल **कंपनी सरकार** त्यांना पैहि देत नसे, इत्यादि प्रकार वरील कमिशनपुढील साक्षींत बाहेर आले. परंतु कंपनीनें तिकडे सन १८१८ पर्यंत काडी-इतकेंहि लक्ष दिलें नाहीं. या विषम वागणुकीमुळें देशी शिपायांत असंतोष उत्पन्न झाला होता. राज्यें खालसा झाल्यानें त्यांवर अवलंबून असणारे लोक असंतुष्ट झाले होते. उरलेल्या देशी रजवाड्यांच्या मनांतहि सारखी धागधुग असे. सामान्य प्रजेवर कराचा बोजा वाढल्यानें व त्यांचे इतर धंदे बुडाल्यानें त्यांच्या पोटाला पुरेसें मिळत नाहींसें झालें व त्यामुळें तो वर्गहि जळफळत होता. अशा

रीतीनें देशांत सर्वत्र दारूचीं कोठारें भरून तयार होतीं. त्यांस ठिणगी लागण्याचाच काय तो अवकाश होता. ती चरबीच्या काडतुसांनीं लावली व एकच धूमधडाका झाला.

## चरबीचीं काडतुसें.

स्वातंत्र्ययुद्ध सुरू होण्यास वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें अनेक कारणें घडत आलेलीं होतीं, तरी तात्कालिक कारण घडलें, तें चरबीच्या काडतुसांचें, असें नेहमीं सांगण्यांत येतें. यासंबंधांत हिंदी शिपायांनीं घेतलेला आक्षेप अवास्तव नव्हता, असें खुद्द लॉर्ड रॉबर्ट्स् यानें म्हटलें आहे. तो म्हणतो:—

" I am not so much surprised at their objections to the cartriges, having seen them. I had no idea they contained or rather are smeared with such a quantity of grease, which looks exactly like fat....incredible disregard of the soldiers' religious prejudices was displayed in the manufacture of these cartriges."—Forty-one years in India.

[ सैनिकांनीं या काडतुसांसंबंधानें घेतलेला आक्षेप अगदींच वृथा नाहीं अशी माझी प्रत्यक्ष खात्री झाली आहे.........हीं काडतुसें करतांना सैनिकांच्या धार्मिक भावनांकडे किंचित्‌हि लक्ष दिलेलें नाहीं. ]

युद्ध सुरू होण्यापूर्वी लष्करी अधिकाऱ्यांच्या लक्षांत ही गोष्ट आली नव्हती असें नाहीं. कॅ० राइट नांवाच्या अधिकाऱ्यानें ता० २२ जानेवारी १८५७ मध्येंच याचा उल्लेख केला होता. परंतु सरकारनें बेपर्वाईनें या गोष्टीकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. कंपनी-सरकारचा अशा प्रकारचा जुलमी अंमल थैमान घालूं लागल्यानें देशांत सर्वत्र असंतोष माजला. इंग्रजांविषयीं द्वेषाग्नि धुमसूं लागला व त्याचा अखेर स्फोट झाला. Vengence sleeps long, but

never dies. सूडाची भावना दीर्घकालपर्यंत सुप्तावस्थेंत असली तरी ती मरत नाहीं, अशी इषारत ड्रमँड नांवाच्या पार्लमेंटच्या सभासदानें त्याच वेळीं सरकारला दिली होती.

## श्री० नानासाहेब पेशवे

सातारचें राज्य खालसा केलें त्याच वेळीं देशी रजवाड्यांमध्यें असंतोष उत्पन्न झाला होता; परंतु तो मूक होता, त्यास वाचा फुटली नव्हती. याचें कारण आत्मविश्वासाचा अभाव व परस्परां-विषयीं साशंकता. नंतर सन १८५१ मध्यें बाजीरावसाहेब कालवश झाले. त्यांना मिळत असलेली तैनात आपणांस मिळावी, असे प्रयत्न त्यांचे पुत्र श्रीमंत नानासाहेब यांनीं केले. परंतु कंपनीनें त्यांच्या तोंडास पानें पुसलीं. यासंबंधानें नानांनीं डायरेक्टरांशीं जो पत्रव्यवहार केला, त्यांत त्यांनीं असें स्पष्टच विचारलें होतें कीं, "वडिलांनीं वार्षिक आठ लक्ष रुपयांस राज्य विकलें, तें जोंपर्यंत तुमच्या ताब्यांत आहे, तोंपर्यंत तुम्हांला आठ लाखांचा तनखा दिलाच पाहिजे." परंतु कसलाहि उपयोग झाला नाहीं. तेव्हां नानांनीं अजिमउल्ला-खान नांवाचा एक हुशार मुसलमान विलायतेस खटपटीस पाठ-विला. तेथेंच सातारच्या महाराजांनीं पाठविलेला वकील रंगो बापूजी याची गांठ पडली. दोघांच्याहि प्रयत्नास यश न आल्यानें उभयतांहि निराश झाले होते. अजिमउल्लाखान हा हिंदुस्थानांत परत यावयास निघाला. तेव्हां येतांना यूरोपमधील अनेक देश त्यानें पाहिले. तेथील लोकस्थिति त्यानें समक्ष अवलोकन केली. याच वेळीं रशिया व इंग्लंड यांमध्यें युद्ध सुरू होतें. अजीमउल्लाखानानें वाटेंत इस्तंबूल येथें जाऊन तेथील खलिफाचीहि सहानुभूती संपा-दन केली व अशा रीतीनें तो हिंदुस्थानांत आल्यावर युद्धाच्या

तयारीस सुरुवात झाली. श्री० नानासाहेब स्वातंत्र्ययुद्धांत स्वेच्छेनें पडले असोत वा परच्छेनें पडले असोत, परंतु युद्धांत पडण्याचें ठरतांच त्यांनीं त्यांत मनःपूर्वक भाग घेतला ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. अयोध्येचें राज्य खालसा केल्यानंतर तेथेंहि अस्वस्थता उत्पन्न झाली होतीच. अशा रीतीनें एकंदर परिस्थिति सर्व प्रकारें अनुकूल असल्याचें नानांनीं पाहिलें. त्यांतच तात्या टोपे यासारख्या रणकुशल व कट्टया स्वामिभक्ताचें त्यांस प्रोत्साहन मिळालें. अजीमउल्लाखानानें नानांस भरहि दिली असण्याचा संभव आहे. कारण स्वातंत्र्ययुद्धाच्या अखेरपर्यंत अजीमउल्लाखानानें नानांस सर्वतोपरी सहाय्य केलें आहे.

अजीमउल्लाखान यूरोपांतून निराश होऊन आल्यानंतर नानांशीं व इतर सहकाऱ्यांशीं त्याचीं खलबतें होऊन नानांनीं हिंदुस्थानांतील सर्व राजेरजवाड्यांस गुप्तपणें खलिते लिहिले. त्यांत देशस्थितीचें यथातथ्य चित्र रेखाटलें असून, सर्वत्रांनीं एकसमयावच्छेदेंकरून उठावणी केल्यास हिंदुस्थान पूर्ण स्वतंत्र होणें कसें शक्य आहे, याचें मोठें मार्मिक व स्वाभिमानपूर्ण चित्र त्यांनीं रेखाटलें होतें. अशा प्रकारचे खलिते त्यांनीं काश्मीरपासून म्हैसूरपर्यंतच्या सर्व देशी राजांच्या दरबारीं पाठविण्याची योजना केली. इकडे हिंदी राजांना उठावणी दिली त्याबरोबरच हिंदी सैन्यहि आपणांकडे ओढून घेण्याचे प्रयत्न करण्यांत आले. सैन्यांत अनेक कारणांमुळें असंतोष होताच. त्यांत हा स्वातंत्र्यस्फुल्लिंग पसरला व अशा रीतीनें सर्वत्र तयारी झाल्यानंतर ता० ३१ मे रोजीं हिंदुस्थानांत एकदम उठावणी करावयाची असा कार्यक्रम निश्चित झाला. ही सर्व पूर्वतयारी करण्यांत नानांच्या बरोबरीनें, दिल्लीचा बहादूरशहा, मौ० अहमदशहा, खान बहादूरखान, दिल्लीची बेगम

जिन्नत महाल, अयोध्येचा पदच्युत नबाब व त्याचा वजीर अली नकीखान, तात्या टोपे इत्यादि प्रमुख पुढारी होते. यांनीं अनेक युक्त्याप्रयुक्त्या करून हिंदी लष्कर आपलेसें करून घेण्याचे प्रयत्न चालविले होते.

## युद्धास प्रारंभ.

अशा प्रकारें सर्व तयारी झाल्यानंतर सर्व हिंदुस्थानांत ता० ३१मे रोजीं एकसमयावच्छेदेंकरून युद्धास सुरुवात करावयाची, असेंही निश्चित झालें; परंतु कांहीं अकल्पित कारणानें अकस्मात् ता० १० मे रोजीं मीरत येथें या युद्धाची ज्वाळा भडकली. ज्या काडतुसांबद्दल शिपायांचें मन कलुषित, तींच काडतुसें वापरण्यास मीरत येथील सुमारें ९० शिपायांना ता० ६ मे रोजीं सांगितलें. पैकीं ८९ इसमांनीं तीं काडतुसें वापरण्याचें नाकारतांच त्यांची लष्करी कोर्टापुढें चौकशी करून त्यांस ता० ९ मे रोजीं जबरदस्त शिक्षा ठोठावल्या. यासंबंधानें 'के' हा प्रसिद्ध इतिहासकार म्हणतो.

"या ८९ लोकांना लष्करी पोषाकांत परेडच्या मैदानावर हजर केलें. नंतर त्यांना शिक्षा वाचून दाखविण्यांत आली. त्यांचे पोषाक मागच्या बाजूनें फाडून काढण्यांत आले. सभोंवार इतर सैनिक उभे होतेच. त्यांच्या डोळ्यांसमोर हा प्रकार घडवून आणला. शिक्षा झालेल्या सैनिकांत कित्येक अत्यंत बहादूर असून त्यांनीं अनेक बिकट प्रसंगीं सरकारासाठीं आपले प्राण धोक्यांत घातले होते. "असा आमचा अपमान करूं नका" अशी त्यांनीं सेनाध्यक्षांची परोपरीनें विनवणी केली. अखेरीस कसल्याही विनवणीचा उपयोग होत नाहीं, असें पाहतांच त्यांनीं आपल्या सहकाऱ्यांकडे तोंडें फिरवून त्यांस "तुम्हांला हा अपमान पाहवतो काय?" असा सवाल केला. हजर असलेला प्रत्येक शिपाई रागानें जळजळत होता. परंतु समोरच भर-

लेल्या तोफा व हत्यारबंद डूगून पलटण हजर असल्यानें त्यांस कांहीं करतां येईना. नंतर कैद्यांना कोठडींत नेलें व त्यांवर पाहाराहि त्यांच्याच जातभाईचा ठेवण्यांत आला." सरकारानें अशा प्रकारें बंड मुळांतच खुडण्याचा प्रयत्न केला परंतु तो साधला मात्र नाहीं. कारण, दुसऱ्या दिवशीं घोडदळ व पायदळाच्या दोन पलटणींनीं तुरुंगावर हल्ला करून, आपल्या सहकाऱ्यांची सुटका केली. गोऱ्या अधिकाऱ्यांचे बंगले जाळले व सांपडला तो गोरा ठार करून तेथून दिल्लीस कूच केलें. ही गोष्ट ता० १० मे १८५७ रोजीं झाली; म्हणून स्वातंत्र्ययुद्धाचा हा प्रारंभदिन म्हणून मानण्यांत येतो. मीरत येथील बंडाची वार्ता पसरतांच अनेक ठिकाणीं पलटणी बिथरल्या व त्यांनीं त्या त्या ठिकाणीं आपली सत्ता स्थापन केली.

## इंग्रजांनीं केलेले अत्याचार.

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाची हकीकत सांगताना हिंदी सैनिकांच्या क्रौर्याची हकीकत अत्यंत भडक प्रकारें रंगविण्यांत येते. इंग्रजांच्या दृष्टीनें ती गोष्ट इष्ट असली तरी हिंदी सैनिकांवर क्रूरपणाचे आरोप करणें केवळ एकतर्फी आहे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे; कारण यावेळीं गोऱ्या अधिकाऱ्यांनीं बिथरलेल्या शिपायांखेरीज सामान्य रयतेवर इतके अनन्वित जुलूम केले आहेत व निरपराधी लोकांचे त्यांनीं इतकें रक्त सांडलें आहे कीं, इतिहासांत क्रूरपणासाठीं गाजलेल्या नादिरशाहानेंहि त्यांच्या क्रौर्यापुढें मान खालीं घातली असती, असें खुद्द इंग्रज इतिहासकारच म्हणतात.

लष्करी पलटणींसंबंधानें एक उदाहरण पुरेसें होईल. पेशावर येथील एक पलटण बेदिल झाली अशी ता० १० जून रोजीं अधिकाऱ्यांस शंका आली. तेव्हां त्यांपैकीं १२० शिपायांना कैद कर-

ण्यांत आलें. या कैद्यांचें काय करावें असा प्रश्न उत्पन्न झाला. यासंबंधानें सर जॉन लॉरेन्स म्हणतो, " वास्तविक सर्वांनाच ठार मारण्यांत कांहीं हानि नाहीं; परंतु १२० ही संख्या जरा मोठी दिसते तेव्हां त्यांतील $\frac{१}{३}$ अगर $\frac{१}{४}$ निवडून काढून त्यांना ठार मारणें बरें."

यानंतर दुसऱ्याच दिवशीं लॉर्ड रॉबर्ट्स् यानें आपल्या आईला पत्र लिहिलें त्यांत तो म्हणतो,

" Well, the troops assembled at Jhelum, and we have come along thus far, doing little business on the road such as dis-arming Regiments and sentencing mutineers. The death that seems to have the most effect is being blown from a gun. It is rather a horrible sight, but in these times we cannot be particular-Drum Head Courts-martial are the order of the day in every station."

( दंगेखोर झेलमजवळ जमलेले असून आम्हीहि इतक्या लांब आलों आहों. वाटेंत बंडखोरांना निःशस्त्र करणें व शिक्षा देणें असलीं किरकोळ कामें केलीं. तोफेनें येणारें मरण फार परिणामकारक होतें. तो देखावा जरा भयानक खरा; पण ह्या परिस्थितींत आम्हांला विशेष दक्षता ठेवतां येत नाहीं. )

मिसेस कूपलन्ड नांवाच्या स्त्रीनें भेसूरपणानें ठार मारल्याचीं उदाहरणें आपल्या पुस्तकांत अनेक दिलीं आहेत. परंतु एवढ्यानें गोऱ्या अधिकाऱ्यांची रक्ततृष्णा शांत होईना. यासंबंधानें निकोलसन् नांवाच्या अधिकाऱ्याचा उतारा केनें आपल्या इतिहासाच्या ४ थ्या भागांत दिला आहे. त्यांत निकोलसन् म्हणतोः—

" Let us propose a bill for the flaying alive impalement, or burning of the murderers of the women and children at Delhi. The idea of simply hanging the perpetrators of such atrocities is

maddening. I wish I were in that part of the world, that if necessary I might take the law into my own hands."

ता० १३ मे रोजीं लाहोर येथील ३८०० हिंदी सैनिकांचीं हत्यारें काढून घेण्यांत आलीं व त्यांना पाहाऱ्यांत ठेवण्यांत आलें. त्यांनीं तेथून सुटून जाण्याचा प्रयत्न केला व ते रावी नदी ओलांडूं लागले. परंतु त्यांना या कामीं पुष्कळ प्रतिकार झाला. त्यांपैकीं १९० शिपाई गोळ्यांच्या जखमांनीं ठार झाले. बरेचसे नदींत बुडून मेले. बाकीचे शेजारच्या झाडींत पळाले. परंतु त्यांतील २८२ शिपायी पुनः गोऱ्या लोकांच्या हातीं लागले. आपली चौकशी होऊन आपणास योग्य न्याय मिळेल अशी त्यांची कल्पना झाल्यानें ते हात जोडून सरकारी अधिकाऱ्यांच्या स्वाधीन झाले. त्यांची वाट काय लावावयाची, हा प्रश्न अधिकाऱ्यांपुढें पडला. त्यांनीं त्या निःशस्त्र शिपायांस बांधून एका पोलिसचौकींत कोंबून भरले. तेथून थोड्या यार्डावर एक कोरडी विहिर होती. तेथें या कैद्यांतील दहा-दहाजणांना नेऊन ठार करण्यांत येई व नंतर त्यांचीं प्रेतें त्या विहि-रींत टाकण्यांत येत. अशा रीतीनें २३७ सैनिकांची चटणी उडविली. राहिलेल्या सैनिकांस आणण्यासाठीं अधिकारी परत पोलिसचौकी-जवळ गेले व त्यांस बाहेर येण्याबद्दल हांका मारल्या; पण कोणींच बाहेर येईनात. तेव्हां मोठ्या धाडसानें एका अधिकाऱ्यानें आंत डोकावून पाहिलें तों काय ? राहिलेले ४५ इसम गुदमरून मरण पावले होते. ब्लॅकहोलची काल्पनिक कथा उठविणाऱ्या गोऱ्या अधिकाऱ्यांनीं ही खरीखुरीच ब्लॅकहोल केली. ही हकीकत फ्रेडरिक कूपर, डे० कमिशनर अमृतसर यानें 'दि क्रायसीस् इन् दि पंजाब' या पुस्तकांत स्वतः नमूद केली आहे. कूपरच्या या परा-क्रमाबद्दल पंजाबचा ले० गव्हर्नर रॉबर्ट मॉंटगॉमेरी यानें कूपरची

पाठ थोपटली आहे, ही गोष्टहि लक्षांत घेण्यासारखी आहे. कूपरच्या पराक्रमाच्या अशा अनेक गोष्टी नमूद आहेत. कूपर तर मोठ्या प्रौढीनें म्हणतो, 'हो! कानपूरला एक विहीर असेल पण उजनाला (वरील प्रकार झाला तें गांव) येथेंहि पण एक विहीर आहे.'

सर जॉन के आपल्या हिस्टरी ऑफ सीपॉय वॉर च्या भाग २ मध्यें असें म्हणतो:—

"It has been stated in a book patronised by high official authorities, that 'for three months eight dead-carts daily went their rounds from sunrise to sunset to take down the corpses which hung at the cross-roads and market places and that, six thousand beings had been thus summarily disposed of and launched into eternity.

(सतत तीन महिने रोज बारा तास, याप्रमाणें आठ गाड्या सारखीं फांशीं दिलेलीं प्रेतें वाहून नेण्याचें काम करीत होत्या.)

## कानपूरची कल्पित कथा.

बंडखोरांनीं कानपुरास इंग्रज स्त्रीपुरुषांची व मुलाबाळांची अत्यंत निर्दयपणें कत्तल केली असा आरोप त्यांजवर करण्यांत येतो. परंतु कानपूरचें कल्पित हत्याकांड होण्यापूर्वीच गोऱ्या अधिकाऱ्यांनीं काय काय अमानुष प्रकार केले ते 'के' या इतिहासकारानें नमूद केले आहेत. तो म्हणतो—

"...Soldiers & Civilians alike were holding Bloody Assize, or slaying Natives without any assize at all, regardless of sex or age. Afterwards, the thirst for blood grew stronger still. It is on the records of our British parliament, in papers sent home by the Governor-General of India in Council, that 'the aged women and children are sacrificed, as well as those guilty of rebellion.

They were not deliberately hanged, but burnt to death in their villages, perhaps now and then accidentally shot.' Englishmen did not hesitate to boast; or to record their boasting in writing, that they had 'spared no one' and that 'peppering away at niggars' was very pleasant pastime, 'enjoyed amazingly.' ( Kaye, Book V, Chap. II )

कानपूरची कत्तल होण्यापूर्वी बनारस, प्रयाग, पाटणा, शहराणपूर, आग्रा, दिल्ली या ठिकाणीं सहस्त्रावधी निरपराधी लोकांची वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें इंग्रजबहाद्दरांनीं कत्तल केली. हे सर्व प्रकार कानपूरची कत्तल होण्यापूर्वी झाले होते, ही गोष्ट लक्षांत घेतली असतां देशी लोकांनीं कानपुरास कांहीं थोड्याशा गोऱ्या स्त्रीपुरुषांना कां मारलें, याचा उलगडा होण्यासारखा आहे. या युद्धांत हिंदी सैनिकांनीं गोऱ्या लोकांवर अनेक जुलूम केल्याचीं अनेक हृदयभेदक वर्णनें गोरे लोक करीत असतात. परंतु त्यांतहि कसा अर्थ नाहीं, यासंबंधानें जस्टिन मॅकॅर्थी हा म्हणतो:—

'The elementary passions of manhood were inflamed by the stories, ***happily not true***, of the wholesale dishonour and barbarous mutilation of women. As a matter of fact no indignities other than that of the compulsory corngrinding were put upon the English ladies. There were no outrages, in the common acceptation of the term, upon women. No English women were stripped or dishonoured or purposely mutilated ( History of our own times, Vol. III ).

( स्त्रियांवर नाना प्रकारचे अत्याचार केले, अशा प्रकारच्या क्षोभजनक उठविलेल्या कथा 'सुदैवानें खऱ्या नाहींत.' इंग्रज स्त्रियांचा कसलाहि अपमान करण्यांत आला नाहीं. )

सर जॉर्ज फॉरेस्ट, 'दि इंडियन म्यूटिनी' या पुस्तकाच्या

प्रस्तावनेंत म्हणतो, “ कैद्यांवरील (कानपूरच्या) पहारेकऱ्यांनीं त्यांस ठार करण्याचें नाकारलें. एका दरबाऱ्याच्या चिथावणीनें पांच दुष्ट लोकांनीं तें कृत्य केलें. एकाद्या राष्ट्रावर अशा प्रकारचा आरोप करणें, हें अनुदारतेचें व असत्य कृत्य आहे ” नानांवर हा दुष्ट आरोप करणारांनीं वरील विधान लक्ष्यांत घ्यावें.

स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेणारांनीं शत्रुपक्षाच्या स्त्रियांची किंचितहि विटंबना केली नाहीं. त्यांना मानानेंच वागविलें. परंतु **कानपुरास** गोऱ्या लोकांची जी कत्तल झाली, तिला पुढील कारणें झालीं.

**कानपूर** येथें स्वराज्य स्थापिल्याची वार्ता **प्रयाग** येथें **जनरल हॅवलॉक** याला समजली व तो **कानपुरास** जाण्यासाठीं तेथून निघाला. **मेजर रेनॉड** नांवाचा अधिकारीहि ससैन्य निघाला होताच. **रेनॉड फत्तेगडाजवळ** पोहोंचतांच त्यानें सर्व शहरांत लुटालूट केली. सांपडलीं त्या माणसांची कत्तल केली व शेवटीं सर्व शहराला आग लावून देण्यांत आली. ही वार्ता **कानपूरला** समजतांच सर्व दरबार प्रक्षुब्ध झाला. इतक्यांत तुरुंगांतील इंग्रज कैद्यांनीं फितूर करून कांहीं पत्रें **हॅवलॉक** व **रेनॉडकडे** पाठविलेलीं **कानपूरवाल्यांच्या** हातीं लागलीं. तेव्हां ते हेर व इंग्रज कैदी यांची चौकशी होऊन त्यांस ठार करण्यांत आलें. या ठार केलेल्यांत एकहि स्त्री नव्हती. परंतु नंतर **बेगमसाहेब** नांवाच्या स्त्रीनें—ती स्त्री कैद्यांवर देखरेख करणारी होती—गांवांतील खाटीक आणवून रात्रीच्या वेळीं त्यांच्याकडून **बिबिगडांतील** स्त्रियांची कत्तल करविली. **कानपूरची** ही कत्तल होण्यापूर्वींच **फत्तेगड** येथें हजारों स्त्रीपुरुष, लहान बालकें यांची कत्तल कंपनीच्या शूर सैनिकांनीं केली होती व बेगमनें कत्तल करविली याचें कारण फत्तेगड येथें निरपराधी सहस्रावधी स्त्रीपुरुषांची **निष्ठुरपणें इंग्रजांनीं** केलेली कत्तल व त्यानें उत्पन्न केलेला क्षोभ असें

म्हणणें गैर ठरेल काय ? कानपूरची कथा ही अशी आहे. वाचकांनींच याचा काय तो निष्कर्ष काढावा.

## स्वातंत्र्ययुद्ध कसें झालें ?

स्वधर्मरक्षणासाठीं, वीर मंगल पांडे यानें जो अपूर्व आत्मयज्ञ केला, त्यासाठीं त्याला ता० ८ एप्रिल १८५७ रोजीं बराकपूर–बंगाल–येथें फांशीं देण्यांत आलें. पलटणी बिथरण्यास सुरुवात झाली ता० १० मे १८५७ रोजीं. म्हणून हाच दिवस स्वातंत्र्ययुद्धाच्या सुरुवातीचा मानण्यांत येतो. मीरत येथून हिंदी सैनिकांनीं आपला मोर्चा दिल्लीकडे फिरविला व दिल्ली हें स्वातंत्र्ययुद्धाचें एक प्रमुख केंद्र झालें. बादशहाच्या नांवाचा सर्वत्र जयजयकार होऊं लागला. पंजाबमध्यें भडका उडाला; तेथें बंड नष्ट करण्यासाठीं इंग्रजांनीं घोर अत्याचार केले.

या स्वातंत्र्ययुद्धांत व्यक्तिशः अनेक वीरांनीं अतुल पराक्रम गाजविले आहेत. त्यांचा सर्वच इतिहास अत्यंत तेजस्वी व स्फूर्तिदायक आहे. त्या रोमहर्षक कथा साकल्यानें देण्यास येथें अवकाश नाहीं; तथापि प्रत्येक हिंदवासीयानें या असफल झालेल्या स्वातंत्र्ययुद्धाचा मनोरम इतिहास अवश्य वाचावा, इतका तो अपूर्व आहे.

कानपूरमध्यें बिबिजान नांवाची एक नर्तकी या स्वातंत्र्ययुद्धांत सामील होऊन अंगावर रणवेश चढवून हिंदी सैनिकांना स्फूर्ती देण्याचें काम करी. प्रयागला मौलवी लियाकतअल्ली यानें तेथील सैनिकांचें धुरीणत्व स्वीकारून इंग्रजी सैन्याला अनेकवार खडे चारले. रोहिलखंडचा राजवंशांतील शेवटचा पुरुष खान बहादूरखान यानें सर्व रोहिलखंड पादाक्रान्त करून बरेली येथें राजधानी स्थापन केली व आसपास आपला अंमल बसविला. सर्वत्र योग्य

अधिकारी नेमले, वसुलाची योग्य व्यवस्था लावली व दिल्लीच्या बादशाहाकडे नजराणा पाठवून बादशाही अंमल स्थापन झाल्याचें कळविण्यासाठीं आपला सेनापती बखतखान यास बादशाहाकडे पाठविलें. पुढें इंग्रजांचें व दिल्लीकरांचें दिल्लीजवळ जें घनघोर युद्ध झालें त्यांत या सेनानीनें चांगलीच मर्दुमकी गाजविली.

बनारस व प्रयाग या प्रांतांतील दंगे मोडण्यासाठीं जनरल नील यानें इतके भयंकर अत्याचार केले, इतकीं निरपराधी माणसें ठार केलीं कीं, अंतःकरण असलेल्या त्याच्या जातभाईंना त्याच्या असुरीपणाबद्दल लाजेनें खालींच मान घालावी लागेल !

अयोध्या प्रांतांत मौलवी अहमदशहा या तालुकदाराची सर्व मिळकत कंपनीनें जप्त केली होती. त्यानें त्या प्रांतांतील युद्धाचा पुढाकार घेतला व सर्व प्रांतांत युद्धाचा रंग चांगलाच उडाला. या नंतर दिल्लीचा सुप्रसिद्ध वेढा, हॅवलॉकनें केलेली फत्तेगड येथील कत्तल, कानपूरचा वेढा, इंग्रजांची कत्तल, तात्या टोपे यांचें अपूर्व युद्धकौशल्य, झांशीचा रणसंग्राम, ग्वाल्हेरचें अखेरचें युद्ध, महाराणी लक्ष्मीबाईचें स्वर्गारोहण इत्यादि सर्वच प्रसंग अत्यंत स्फूर्तिदायक आहेत. परंतु त्या सर्वांचें साकल्यानें वृत्त देतां येईल इतकें स्थल येथें नाहीं. म्हणून त्यांचा केवळ नामनिर्देश करावा लागला. यांतील प्रत्येक प्रसंग असा आहे कीं, तो ऐकून कवींची प्रतिभा खडबडून जागी व्हावी, कादंबरीकारांनीं कादंबऱ्या रचाव्या, शाहिरांनीं पोवाडे गावे !

अयोध्येचा नबाब वाजिदअल्ली शहा हा कलकत्ता येथें ब्रिटिशांच्या कैदेंत होता. स्वातंत्र्ययुद्धास सुरुवात होतांच त्याची लखनौ येथें असलेली बेगम हजरतमहाल इनें अयोध्याप्रांताचें राजकारण आपल्या हातीं घेतलें. मुख्य मंत्री महबुबखान असून

त्याच्याकरवीं तिनें अयोध्या प्रांतांत योग्य अधिकारी नेमले व राज्यकारभार चालविला. या ठिकाणींहि इंग्रजांना तुमुल युद्ध करावें लागलें. दिल्लीप्रमाणें प्रत्येक इंच जागा रक्तानें माखून हस्तगत करावी लागली व तीहि नेपाळी सैनिकांनीं ब्रिटिशांस मदत केली म्हणूनच. काल्पी, कानपूर येथील तात्या टोपे यांनीं गाजविलेली मर्दुमकी इतिहासतज्ञांस विदितच आहे. रोहिलखंडांत मौलवी अहमदशहा यानें गनिमी काव्यानें युद्ध करून अनेक इंग्रजी फौजांस दे माय धरणी ठाय करून टाकलें. ता० २० जून १८५८ रोजीं महाराणी लक्ष्मीबाईसाहेबांनीं ग्वाल्हेरजवळ धारातीर्थी शयन केलें व याच वेळीं स्वातंत्र्ययुद्धाचा खरा शेवट झाला. परंतु त्यांतील शेवटची आहुती ता० १८ एप्रिल १८५९ रोजीं पडली. सेनापती तात्या टोपे यांना फांशीं देण्यांत आलें व हिंदुस्तान स्वतंत्र करण्याचा हा प्रयत्न अशा रीतीनें अयशस्वी झाला.

## स्वातंत्र्ययुद्धांतील प्रमुख कार्यकर्ते.

हें स्वातंत्र्ययुद्ध हिंदु व मुसलमान या उभयतांनीं एकजुटीनें व एकोप्यानें केलें. हिंदुमुसलमान, असला अनिष्ट वाद त्यावेळीं उत्पन्न झाला नाहीं. हिंदु व मुसलमान या दोन्ही ज्ञातींचें रक्त केवळ एकाच हेतूसाठीं सांडलें. हिंदु सेनानायकांच्या बरोबरीच्या कुशल मुसलमान सेनानींचीं नांवें फारशीं ऐकूं न आलीं, तरी दिल्ली प्रयाग, इत्यादि ठिकाणच्या लढाया मुसलमान सेनानींनींच मोठ्या धैर्यानें लढविल्या. परंतु या सर्वांत प्रामुख्यानें नांवें चमकतात तीं, श्री० नानासाहेब, रावसाहेब व दादासाहेब पेशवे, सेनापती तात्या टोपे, महाराणी लक्ष्मीबाईसाहेब· बिहारचा केसरी कुमारसिंग व त्याचा बंधु अमरसिंग हीं होत. बादशहा शहाअलम

व त्याची वीरपत्नी **जिन्नतमहाल** यांनीं आपल्या कठीण अवस्थेंतहि हिंदी शिपायांस योग्य असेंच प्रोत्साहन दिलें.

कानपूर पडल्यानंतर **नानासाहेब पेशवे** आपला मुसलमान स्नेही **अजिमुल्लाखान** यास घेऊन नेपाळकडे वळले. त्यांजबरोबर बरीच फौजहि होती. हिंदुस्थानचा सर्व नकाशा एकाच रक्तवर्णाचा झाला. राहतां राहिलें एकमात्र हिंदुराज्य नेपाळचें. तेथें आपणांस खास आश्रय मिळेल व त्याच्या साहाय्यानें आपण आपलें गमावलेलें स्वातंत्र्य पुन: संपादन करूं, अशी **नानासाहेबांस** फार उमेद होती व त्यांनीं **नेपाळदरबारशीं** तसें बोलणेंहि चालविलें. **ब्रिटिश सैन्याला** ज्यानें एका काळीं धूळ चारली, त्या वीर **बळिभद्र-सिंगाला** नेपाळदरबारनें नानासाहेबांशीं वाटाघाट करण्यास पाठविलें. बरेच दिवस वाटाघाट सुरूं होती. परंतु त्यांतून अखेर कांहींच निष्पन्न न होतां, नेपाळनें त्यांस आश्रय देण्याचें नाकारून, उलट इंग्रजांना त्यांचा पिच्छा पुरविण्यास मदतच केली. पुढें नानांच्या सैन्याची पूर्णपणें वाताहात झाली व **नानासाहेबहि** बेपत्ता झाले.

झांशीची सिंहीण **महाराणी लक्ष्मीबाईसाहेब** यांचा शेवट कसा झाला ही गोष्ट इतिहासज्ञांस सुपरिचित अशी असल्यानें तिची पुनरुक्ति येथें करीत नाहीं. या स्वातंत्र्ययुद्धाला राणीसाहेबांच्या तोलाचे आणखी २–४ कुशल सेनापती लाभले असते तर युद्धाचा सर्वच रंग खात्रीनें पालटला असता, या एकाच गोष्टीवरून त्यांचें महत्त्व लक्षांत येईल. अवघी वीस बावीस वर्षांची तरुणी, पाठीशीं आठ वर्षांचा आपला छबकडा बांधून इंग्रजांच्या कसलेल्या सैन्याच्या हातांवर तुरी देऊन निसटते व इंग्रजी फौजांस दे माय धरणी ठाय करावयास लावून **सर ह्यू रोज** सारख्या सेनानीला पळाचीहि विश्रांति देत नाहीं त्या सिंहिणीचें वर्णन आम्हीं काय करावें!

दुर्दैवाची गोष्ट कीं, आम्ही आमच्या स्वातंत्र्याच्याबरोबर स्वातंत्र्याचें बीज करण्यासहि विसरलों ! !

बिहारचा वृद्ध वीर **कुमारसिंग** यानें तर सर्व **शहाबाद** जिल्हा काबीज करून आपणास राज्याभिषेक करून घेतला व स्वतंत्र राजा म्हणून तो मिरवला. त्याच्या मागून त्याचा कनिष्ठ बंधु **राणा अमरसिंग** यानेंहि इंग्रजांची त्रेधा उडवून टाकली. परंतु अखेरीस इतर ठिकाणचा वणवा विझूं लागला व इंग्रजी फौजांचें लक्ष त्याच्याकडेच वेधल्याकारणानें राणा अमरसिंह पारतंत्र्य नको म्हणून कोठें नापत्ता झाला. या उभय राजपुरुषांचे गुण आजतागायत त्या प्रांतांत लोक मोठ्या भक्तिभावानें गात असतात.

**ग्वाल्हेरच्या** युद्धांत **लक्ष्मीबाईसाहेबांची** आहुती पडल्यावर सेनापती **तात्या टोपे** व **रावसाहेब पेशवे** यांनीं राहिलेल्या फौजा एकत्र केल्या व ते गनिमीकाव्यानें युद्ध खेळूं लागले. परंतु पुढें एकत्र राहण्यानें बोजा वाढतो, हें ध्यानीं आणून त्यांनीं फौजेचे दोन भाग केले व दोघे एकमेकांशीं दळणवळण कायम राखून इंग्रजांस सतावूं लागले; खंडण्या वसूल करूं लागले. परंतु सेनापती **तात्या टोपे** यांना **नर्मदापार** होऊन दक्षिणेंत प्रवेश मिळाला नाहीं. तरी दक्षिणेंत अल्प प्रमाणांत का होईना असंतोष उत्पन्न झाला होता. त्यांतच तात्यांची भर पडली असती, तर मोठेंच स्वरूप प्राप्त झालें असतें. **नरगुंदचे** स्वाभिमानी **भास्करराव बाबासाहेब** यांनीं स्वातंत्र्य पुकारलें. परंतु त्याचें पर्यवसान **नरगुंदकर** घराणें नष्ट होण्यांत झालें. **कोल्हापुरासहि** ही वावटळ उठली परंतु ती थोडक्यांत मिटली.

**तात्या टोपे** यांनीं **होशंगाबाद** येथें नर्मदा ओलांडून दक्षिणेंत प्रवेश केला, त्याबरोबर इंग्रजांची छाती दडपून गेली. परंतु त्यांना लवकरच परत फिरावें लागलें. मागें इंग्रज फौजा लागल्याच होत्या.

**दिल्लीचा** राजपुत्र **फेरोजशहा** व **रावसाहेब** पेशवे यांच्या गांठी पडल्या. **देवास** येथें १६ जानेवारी १८५९ रोजीं त्यांची वाटाघाट चालली असतां, इंग्रजी फौजा आल्याचें समजतांच ते दोघेहि तेथून निघून अकस्मात् **सिकार** येथें गेले. तेथें इंग्रजी फौजेची गांठ पडून चांगली मातबर लढाई झाली. तींत **तात्यांचा** पराजय झाला. अखेरीस तात्यांनीं रावसाहेब पेशव्यांचा व सैन्याचा निरोप घेतला व स्वतंत्र मार्ग स्वीकारला. त्यावेळीं **ग्वाल्हेर** दरबारांतील **सरदार मानसिंग** नांवाच्या मानभावी माणसानें त्यांस साहाय्य करण्याचें आमीष दाखवून, अखेरीस ता० ७ एप्रिल १८५९ रोजीं मध्यरात्रीं, **तात्या** निद्रिस्त असतां त्यांस इंग्रजांच्या स्वाधीन केलें व ता० १८ एप्रिल रोजीं **सिप्री** येथें त्यांस फांशीं देण्यांत आलें.

**रावसाहेब पेशवे**, तात्यापासून निघाल्यानंतर वेषांतर करून बरेच दिवस भटकत होते. ते पुढें गोऱ्या लोकांच्या हातीं लागून त्यांस **कानपूर** येथें ता. २० ऑगस्ट १८६२ रोजीं फांशीं दिलें. राजपुत्र **फेरोजशाह** इराणांत जाऊन राहिला.

**दिल्ली** पडतांच मोगल घराण्यांतील सर्व राजपुत्रांची अमानुषपणें कत्तल करण्यांत येऊन, त्यांचीं प्रेतें कित्येक दिवस **दिल्ली** शहरांतील प्रमुख रस्त्यांवर टांगून ठेविलीं होतीं.

## युद्ध कां बुडालें ?

**नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, महाराणी लक्ष्मीबाई, अजीमुल्लाखान,** यांसारखे मुत्सद्दी व लढवय्ये या युद्धाचे नेते असतां, हें युद्ध बुडालें कां? हा प्रश्न मोठा विचारणीय आहे. त्याचें विवेचन करून हा लेख समाप्त करूं. पहिली गोष्ट अशी कीं, नानांनीं सर्व हिंदी रजवाड्यांना आग्रहानें या युद्धांत भाग घेण्याबद्दल विनंति

केली असतां, ती त्यांनीं मान्य केली नाहीं. याचें कारण, युद्ध अयशस्वी झाल्यास आहे तेंहि नष्ट होण्याची भीति व परस्परांविषयीं साशंकता. युद्धाच्या चालकांनीं ता० ३१ मे ही उठावणीची तारीख ठरविली असतां, कांहीं अकल्पित योगानें ता० १० रोजीं मीरतला स्फोट झाला. एकदम सर्वत्र उठावणी न झाल्यानें इंग्रज अधिकारी जास्त सावध राहिले व त्यांनीं युद्ध पसरूं नये, अशा बद्दल बरेच प्रयत्न केले.

परंतु या कारणांखेरीजहि दुसऱ्या अनेक व महत्त्वाच्या चुका घडल्या व त्यांचें पर्यवसान युद्ध बुडण्यांत झालें. सर्वांत मुख्य कारण हें कीं, युद्धांत एकसूत्रीपणा नव्हता. एखाद्या ठिकाणच्या पलटणीनें बंड पुकारावें, तेथील गोऱ्या अधिकाऱ्यांची कत्तल करावी, सांपडेल तो खजिना व दारूगोळा घ्यावा व लगेंच दिल्लीकडे कूच करावें अशी साधारणतः स्थिति झाली. एखाद्या ठिकाणचा ताबा घेतल्या-नंतर तें ठिकाण व त्याच्या आसपासचा मुलूख आपल्या स्वाधीन राहील, शत्रूच्या ताब्यांत न जाईल अशी व्यवस्था बंडवाल्यांनीं केली नाहीं. सर्वांचा ओघ दिल्लीकडे वाहूं लागला. परंतु दिल्लीला येणारे-जाणारे सर्व रस्ते, मोऱ्याच्या व नाक्याच्या जागा बंडवाल्यांनीं आपल्या स्वाधीन ठेवल्या नाहींत व त्यांचा ठेवावा तसा बंदोबस्त ठेवला नाहीं. सर्व मार्ग मोकळेच असल्यानें, त्यांच्या मागाहून येणाऱ्या इंग्रज सैन्यानें त्यांची नाकेबंदी करून उलट बंडवाल्यांचा कोंडमारा केला. प्रत्येक ठिकाणीं योग्य व लायक सेनानी नव्हता त्यामुळेंच हा अनिष्ट प्रकार ओढवला. ज्या ज्या ठिकाणीं लायक असे सेनानी होते तीं तीं ठिकाणें स्वातंत्र्ययुद्धकर्त्यांनीं बरोबर रीतीनें दाबून धरलीं. अशीच इतर प्रमुख ठिकाणचीं स्थिति असती तर त्यांना स्थानभ्रष्ट करण्याचें सामर्थ्य तत्कालीन इंग्रजसेनेंत खास नव्हतें.

**नानासाहेब, तात्या टोपी, महाराणी लक्ष्मीबाईसाहेब** यांनीं, कुशल सेनानी काय चमत्कार करूं शकतात हें इंग्रज सैन्याच्या चांगलेंच प्रत्ययास आणून दिलें होतें.

एकादें शहर ताब्यांत घेतलें असतां तेथील राज्यव्यवस्था करण्याकडे कोणींहि लक्ष दिलें नाहीं. उलट **नानासाहेबांनीं कानपुराहून** इंग्रजांची हकालपट्टी केल्याबरोबर तेथील कारभार लोकनियुक्त पंचांच्या स्वाधीन करून लोकांवर कसलाहि जुलूम न होईल अशी दक्षता घेतली. इतर ठिकाणीं ही व्यवस्था झाली नाहीं. बंडवाले निघून जातांच सर्वत्र अंदाधुंदी माजून सामान्य जनतेच्या मनांत स्थैर्याबद्दल शंका उत्पन्न होऊं लागली.

या स्वातंत्र्ययुद्धांत हिंदु-मुसलमान खांद्याशीं खांदा भिडवून लढले. हिंदु-मुसलमान असा द्वेषमूलक वादच उत्पन्न झाला नव्हता. हें युद्ध बुडविण्यास देशी लोकांपैकीं कोणी कारणीभूत झाले असल्यास, शीख लोकच झाले व शीख लोकांनींच इंग्रजांस या कामीं मनःपूर्वक साहाय्य केलें. हें स्वातंत्र्ययुद्ध सुरूं होण्यापूर्वीं अवघ्या दहा वर्षांपूर्वींच या शीख लोकांचें स्वातंत्र्यहरण केलें असतां, त्यांनीं इंग्रजांस स्वदेशबांधवांच्या या स्वातंत्र्यहरणाच्याच कामीं साहाय्य करावें ही गोष्ट विपरीत दिसते. परंतु शीख लोकांची विशिष्ट मनोभूमि येथें लक्षांत घेतली पाहिजे.

**गुरु गोविंदसिंग** व इतर कांहीं शीख गुरूंचा दिल्लीच्या बादशहांनीं अनन्वित प्रकारें छळ करून त्यांस ठार मारलें होतें. त्या वेळीं ‘ माझे रक्तबिंदु याचा सूड घेतल्याखेरीज राहणार नाहींत. ’ अशी गुरूंची एक प्रतिज्ञावाणी शीख समाजांत रूढ होती. ‘ तो सूड घेण्याची वेळ आतां आली आहे. चला व आपल्या गुरूंच्या वधाचा सूड घ्या, ’ अशी भावना धर्मवेड्या शीखांच्या अंतःकरणांत

भरवून दिली गेली व धर्मासाठीं प्राणहि समर्पण करणाऱ्या शीखांस ही गोष्ट पटून त्यांनीं या प्रसंगीं इंग्रजांस मनःपूर्वक साहाय्य केलें. ज्या वेळीं दिल्लीच्या राजपुत्रांना इंग्रज अधिकाऱ्यानें ठार करून त्यांचीं प्रेतें दिल्लींत भररस्त्यावर टांगलीं, त्या वेळीं तर शीख आनंदानें नाचूं लागले म्हणतात.

याखेरीज आणखी एक महत्त्वाचें कारण व तें म्हणजे ब्रिटिश मुत्सद्देगिरीचा एक अपूर्व नमुनाच म्हणतां येईल असें होतें. तें असें. सर्व **पंजाब** व **उत्तर-हिंदुस्थान** या युद्धाच्या वावटळींत सांपडला, तेव्हां सामान्य रयतेनें युद्धांत भाग घेऊं नये, म्हणून इंग्रज अधिकाऱ्यांनीं लोकांना सक्तीनें शें० ६ टक्के व्याजानें कर्जे द्यावयास लावलें. वॉरलोन कोणत्या रीतीनें घेण्यांत येतें याची सामान्य कल्पना गेल्या महायुद्धाच्या वेळीं लोकांना आली आहेच. १८५७ चा तर आणीबाणीचा प्रसंग होता. लोकांच्याकडून अशा रीतीनें कर्ज घेतल्याकारणानें या युद्धांत टोपीवाल्यांचा पराभव झाल्यास आपल्या रकमा बुडतील, अशी त्यांना भीति उत्पन्न झाल्यानें त्यांनीं या युद्धांत भाग घेतला नाहीं व शक्य तेथें गोऱ्या लोकांना साहाय्यच केलें. अशा रीतीनें इंग्रजांचा हा डावहि यशस्वी झाला.

नेपाळचें व इंग्रजांचें सूत नव्हतें व एक दोन वेळां तर नेपाळी सैन्यानें इंग्रजांस खरपूस चोपहि दिला होता. ज्या वेळीं अयोध्या प्रांतांत स्वातंत्र्ययुद्ध सुरू झालें, त्या वेळीं अयोध्येच्या बेगमेनें नेपाळजवळ मदतीची याचना केली. नेपाळचें व इंग्रजांचें सख्य नसल्यानें, या स्वातंत्र्ययुद्धांत नेपाळ सहज साहाय्य करील, अशी कल्पना. परंतु दुर्दैवानें तोहि प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. कारण ज्या वेळीं इंग्रजांचें नेपाळशीं युद्ध सुरू होतें त्या वेळीं अयोध्येच्या

राजानें इंग्रजांना नेपाळच्या विरुद्ध पुष्कळच मदत केली होती. तो राग मनांत ठेवून या वेळीं नेपाळनें सर्वस्वीं तटस्थ वृत्ति धरली.

उत्तर-हिंदुस्थानांत स्वातंत्र्ययुद्ध जवळ जवळ संपलें. दिल्ली पडली, नानासाहेब बेपत्ता झाले. झांशी पडली, लक्ष्मीबाई साहेबांनीं धारातीर्थीं शयन केलें. अशी सर्व बाजूंनीं निराशा पसरली असतांना, पेशव्यांचे सेनापति तात्या टोपे यांनीं ही आग पसरावी म्हणून आटोकाट प्रयत्न केला. ही आग दक्षिणेंत भडकली असती तर ती सर्वत्र ताबडतोब पसरून जें यश उत्तरेंत मिळालें नाहीं तें दक्षिणेंत साधेल अशी त्यांची कल्पना होती. म्हणून त्यांनीं तीन वेळां नर्मदा उतरण्याचा अट्टहास केला. त्यांत थोडेंफार यश आलेंहि. परंतु खालीं दक्षिणेंत येण्यास सवड न सापडतां, त्यांस पुनः नर्मदा उतरून उत्तरेकडे मोर्चा फिरवावा लागला. तात्या टोपे यांचा हा प्रयत्न साधला असता तर स्वातंत्र्ययुद्धास कांहीं वेगळाच रंग चढला असता, असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे.

अशा रीतीनें सन १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचा शेवट झाला. त्याची कार्यकारणमीमांसा वर दिली आहे. असो.

या प्रमाणें स्वातंत्र्यसंपादनाचे अत्याचारी व सशस्त्र बंडाचे मार्ग अयशस्वी ठरले. आजवर जगभर याच मार्गांनीं स्वातंत्र्यसंपादनाचे प्रयत्न झाले आहेत. परंतु हत्याकारक लढाईचा आतां सर्वांनाच वीट येत आहे. अशा वेळीं स्वातंत्र्यसंपादनाचा सर्वस्वीं नवीन व अपूर्व असा अनत्याचारी शांततेचा मार्ग पूर्वेस उदय पावला आहे. कणखर शिस्त, अचल सहनशीलता, निर्भय दृढता व दिव्य आत्मयज्ञ यांच्या चौ-खांबांवर आधारलेलें, शांततामय अनत्याचारी स्वातंत्र्ययुद्ध विजय संपादिल्याशिवाय राहणार नाहीं. हा नवा

मार्ग पाश्चात्यांना कल्पनेनें सुद्धां ठाऊक नाहीं. जगाच्या इतिहासांत हा अभिनव मार्ग चोखाळण्याचें श्रेय हिंदुस्थानच्या पदरींच पडणार आहे यांत शंका नाहीं. अर्थात् 'युद्धस्य कथा रम्या' या पलीकडे या ऐतिहासिक कथानकाला आज तरी महत्त्व नाहीं !

[ आधारभूत ग्रंथ·—

गदरका इतिहास, वैद्य, बेहरे, पारसनीस, के, मॅलिसन्, नोलन, रॉबर्ट्स्, निकोलसन्, मॅकॅर्थी, फॉरेस्ट, टॉरेन्स, थाम्सन इ० चे ग्रंथ.

## पुणें येथील प्रसिद्ध एनग्रेव्हर

संस्थानिक, राजेरजवाडे
यांच्या
शिफारसीस पात्र
झालेले

अखिल भारतीय हिंदु
महासभा, पुणें व
लाहोर येथील
अधिवेशनांत
प्रशंसिलेले

मार्तंड रघुनाथ अभोणकर

ज्युवेलर्स व एनग्रेव्हर्स

पत्ता : गणपती चौक लक्ष्मीरोड, पुणें २.

कानगो

# सायकल मार्ट

प्रभात टॉकीजजवळ, पुणें. २.

## सायकल डीलर्स व रिपेअरर्स

पुण्यांतच नव्हे तर परगांवचीही मागणी असलेली सायकल

## “ ओरायन ”

किं. ५५ रुपये, लॅंप, बेल, पंप टूलबॅगसह.

## शेंकडा १० टक्के बचत करा

रेडीमेड कपडे = साधारण शिलाईचे कपडे

हें समीकरण आपल्या मनांतून पूर्णपणें काढून टाका
कारण
महिंद्रकर ब्रदर्सनें दिवाळीच्या सुमुहूर्तावर अपटुडेट

# टेलरींग डिपार्टमेंट

सुरू केलें आहे. प्रत्यक्ष अनुभव घ्या व खूष व्हा. या सोयीमुळें कॉलेजांतील प्रोफेसर्स, लॉ व इतर कॉलेजांतील विद्यार्थी कापड पसंत करून व स्वतःचें माप देऊन, पैशांत बचत करून फॅशनेबल कपडे शिवून घेतात. मनपसंत शिलाई होईल याची खात्री बाळगा.

# महिंद्रकर ब्रदर्स

बंबखान्याचे माडीवर, बुधवार चौक, पुणें
गिरगांव मुंबई,